
सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
आज रक्षाबंधन
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, ९ ऑगस्ट २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २७१ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



हिंदू समाजाचे ऐक्य म्हणजे संघाचे ध्येय. जाती, भाषा, प्रांत या पलीकडे जाऊन हिंदू म्हणून एकत्र येणे आवश्यक आहे. स्वयंसेवक म्हणजे असा कार्यकर्ता जो संकटातही स्थिर राहतो, जो स्वहितापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य देतो.

**- हस्तीमल**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. संपर्क प्रमुख

## सलग पाचव्या वर्षी अंबानींनी घेतला नाही पगार

**नवी दिल्ली :** देशातील सर्वात श्रीमंत व्यक्ती मुकेश अंबानी यांनी सलग पाचव्या वर्षी पगार घेतलेला नाही. रिलायन्स इंडस्ट्रिजचे अध्यक्ष असताना त्यांनी कोविडदरम्यान पगार न घेण्याचा निर्णय घेतला होता. रिलायन्स इंडस्ट्रिजने त्यांच्या वार्षिक अहवालात ही माहिती दिली आहे. त्यांनी कंपनीकडून भत्ता, बोनस आणि कमिशन देखील घेतलेले नाही. पगार नसतानाही, मुकेश अंबानी जगातील १८ व्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती राहिले आहेत. याचे कारण रिलायन्स इंडस्ट्रीजमधील त्यांचा ५०.३३% हिस्सा आणि रिलायन्सचे कोट्यवधी शेअर्स आहे. २०२४-२५ मध्ये रिलायन्सने प्रति शेअर १० रुपये लाभांश जाहीर केला.

# शपथपत्र दाखल करा, अन्यथा माफीनामा द्या

### निवडणूक आयोगाचे राहुल गांधींना पत्र, मतचोरीचे आरोप फेटाळले

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**

तीन राज्यांमधील निवडणुकीत मतचोरी झाल्याचा आरोप करणारे काँग्रेस नेते व लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना कर्नाटक निवडणूक आयोगाने ' शपथपत्र दाखल करा अन्यथा माफीनामा सादर करा' अशा स्पष्ट शब्दात बजावत त्यांनी निवडणुकीतील घोळासंदर्भात केलेले सर्व आरोप फेटाळून लावले.

कर्नाटक राज्य निवडणूक आयोगाने शुक्रवारी राहुल गांधी यांना ई-मेलवरून एक प्रतिज्ञापत्र पाठविले. त्यात त्यांनी केलेले आरोप चुकीचे आढळल्यास कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचा उल्लेख आहे. स्वाक्षरी केलेले प्रतिज्ञापत्र आयोगाकडे सादर करण्यास त्यांना सांगण्यात आले. प्रतिज्ञापत्र आठवडाभरात सादर न केल्यास देशाची माफी मागण्याचे आणि आयोगाकडे माफीनाम्याची प्रत सादर करण्यास बजावले आहे. राहुल यांनी केलेल्या आरोपात तथ्य असल्यास त्यांना प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करण्यास कुठलाही आक्षेप असायला नको. याशिवाय मतदार यादीत चुकीच्या पद्धतीने समावेश करण्यात आलेल्या मदतदारांची नावे देखील मागितली आहेत जेणेकरून आवश्यक ती कार्यवाही सुरू करता येईल. दिलेल्या मुदतीत त्यांच्याकडे असलेले पुरावे आणि स्वाक्षरीसह प्रतिज्ञापत्र सादर न केल्यास माफीनामा सादर करावा, असा उल्लेख पत्रात आहे. *(वृत्तसंस्था)*



मी संसदेत संविधानाची शपथ घेतली आहे, त्यामुळे माझ्यावर अविश्वास दाखविण्याचा प्रश्नच येत नाही. प्रतिज्ञापत्र देण्यासंदर्भात मी आयोगाला बांधिल नाही. मतांची चोरी करणे संविधानाची पायमल्ली करण्यासारखे आहे. देशातील लोकशाही संस्था नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू आहे.
**- राहुल गांधी,** विरोधी पक्षनेते



अलिकडच्या काळात राहुल गांधी यांनी सलीम-जावेद यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याकडून स्क्रिप्ट लिहून घेतली आहे. अतिशय मनोरंजनात्मक अशा प्रकारची स्क्रिप्ट ते सगळीकडे मांडत आहेत. आरोप करण्याऐवजी त्यांनी निवडणूक आयोगाकडे त्यांच्याकडे असलेले पुरावे सादर करावे.
**- देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

### राहुल यांचा खोटेपणा उघड

दुबार मतदार यादीचा उल्लेख करत उदाहरण म्हणून राहुल यांनी आदित्य श्रीवास्तव याचे नाव घेतले होते. यावर आक्षेप घेत आदित्य यांनी म्हटले की, मी उत्तर प्रदेशातील लखनौ येथील रहिवासी आहे. २०१६ मध्ये मी मुंबईत राहत होतो, तर २०२१ साली बंगळुरू येथे राहण्यास आलो. जेव्हा मी मुंबईत नोकरी करत होतो तेव्हा मी तिथला मतदार होतो. २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत मी मुंबईत मतदान केले. त्यामुळे माझा मतदार क्रमांक तोच असल्याचे स्पष्ट करीत त्यांनी राहुल यांचा खोटेपणा उघड केला.

## भारतीय लष्कर आणि हवाई दलाला २०० नवीन हेलिकॉप्टर मिळणार

**नवी दिल्ली :** म भारतीय लष्कर आणि हवाई दल त्यांच्या जुन्या चेतक आणि चित्ता हेलिकॉप्टरच्या जागी सुमारे २०० नवीन हलके हेलिकॉप्टर खरेदी करण्याची तयारी करत आहेत. यासाठी संरक्षण मंत्रालयाने रिक्वेस्ट फॉर इन्फॉर्मेशन जारी केली आहे. या नवीन हेलिकॉप्टरना रिकॉनिसन्स अँड सर्व्हिलन्स हेलिकॉप्टर म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. यापैकी १२० हेलिकॉप्टर भारतीय लष्कराला आणि ८० हेलिकॉप्टर हवाई दलाला देण्यात येतील. हे हेलिकॉप्टर दिवसा आणि रात्री दोन्ही वेळी काम करू शकतील. संरक्षण मंत्रालयाचे उद्दिष्ट तांत्रिक आवश्यकता अंतिम करणे, खरेदी प्रक्रियेवर निर्णय घेणे आणि संभाव्य पुरवठादारांची ओळख पटवणे आहे.

|| जय मार्कंडेय जय पद्मशाली || || जय मार्कंडेय जय पद्मशाली || || जय मार्कंडेय जय पद्मशाली ||
अखिल भारत पद्मशाली संघम,
संलग्नित
अखिल भारत पद्मशाली युवजन संघम.
अखिल भारतीय पद्मशाली युवजन संघम तर्फे सोलापुरातील तमाम भाविकांना जाहीर आवाहन
पद्मशाली समाजाचे कुलदैवतश्री मार्कंडेय महामुनींच्या
रथोत्सवनिमित्त
अखिल भारतीय पद्मशाली युवजन संघमच्यावतीने रविवार पेठ येथील कुचन हायस्कूल मधील मैदानात
श्री मार्कंडेय यांची भव्य चित्रकृती (मोझेक आर्ट) साकारण्यात आली आहे.


"ही भव्य चित्रकृती सर्व भाविकांसाठी दि.९ ते ११ ऑगस्ट दरम्यान दररोज सकाळी ८ ते सायं.१० वाजेपर्यंत दर्शनासाठी खुली राहणार आहे."
तरी,हा भक्तिभाव व श्रमसाध्य कलाविष्कार पाहण्यासाठी बहुसंख्येयेने यावे ही नम्र विनंती.
श्री.श्रीनिवास किशोर संगा
प्रेसिडेंट
अखिल भारत पद्मशाली युवजन संघम
श्री. महेश अंबादास जिंदम
जनरल सेक्रेटरी
अखिल भारत पद्मशाली युवजन संघम



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



**सांगोला शहरात 'रक्षाबंधन' सणाच्या पूर्वसंध्येला लाडक्या भावासाठी 'राखी' खरेदी करण्यासाठी बहिणींची झालेली गर्दी. (छायाचित्र - दिपक भाकरे, सांगोला)**

### सततच्या पावसाने पिके धोक्यात

**अक्कलकोट, दि. ८ ऑगस्ट**

सतत पडत असलेल्या अति मुसळधार पावसामुळे किणी वागदरी मंडळातील अनेक पिके धोक्यात आले आहेत. अक्कलकोट तालुक्यातील घोळसगाव किणीवाडी किणी पालापुर वागदरी अशा अनेक गावांमध्ये दररोज पडत असलेला मुसळधार पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात पाणी लागून नुकसान होत आहे त्यामध्ये प्रामुख्याने तूर उडीद सोयाबीन मूगसारख्या पिके पाणी लागून वाळत आहे अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी साचलेले आहे नाले ओढे तुडुंब भरून वाहत आहेत आजूबाजूच्या एकमेकांच्या गावांमधील वाहतुकीचे संपर्क तुटलेला आहे कारण घोळसगाव बोरगाव पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे दोन दिवसापासून आजूबाच्या गावकऱ्यांचे वाहतुकीचे संपर्क तुटलेले आहे बोरगाव व घोळसगाव गावातील ग्रामस्थांनी फुलाचे उंची वाढवण्याचे मागणी करत आहेत काही शेतकऱ्यांच्या शेतामधील तूर सोयाबीन उडीद सारख्या पीक अक्षरशः पाण्यामध्ये बुडाले आहेत कधी कमी पाऊस कधी जास्तीचे पाऊस असे निसर्गाचे समतोल बिघडून शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान होत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्ज वाढत चालले आहे शासनाने शेतकऱ्यांचे समस्या कडे व ग्रामीण भागातील रस्ते फुल अशा समस्या कडे गांभीर्याने लक्ष द्यावे असे शेतकरी व ग्रामीण भागातील ग्रामस्थांनी मागणी करत आहेत

### कुसमोड पुलावरील खड्डा देतोय अपघाताला आमंत्रण

**पिलीव, दि. ८ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील कुसमोड गावाकडे जाणाऱ्या पुलावर मोठा खड्डा पडला आहे. या खडडयामुळे वारंवार अपघात होत आहेत.याठिकाणी अनेकांना रात्रीच्या वेळी प्रवास करीत असताना खडडयाचा कसलाच अंदाज येत नाही यामुळे याठिकाणी दररोज अपघात होत आहेत.याविषयी कुसमोडचे विद्यमान सरपंच शहाजी लेंगरे यांनी याबाबत अकलूज येथील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार केली असल्याचे सांगितले. तर याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता खडतरे यांना विचारले असता आजच याची पाहणी करुन लगेच दुरुस्ती करणार असल्याचे सांगितले.



### नाळे प्लॉट येथे तरुणाची आत्महत्या

**बार्शी, दि. ८ ऑगस्ट-**

मंगळवारी सकाळच्या सुमारास बार्शी शहरातील नाळे प्लॉट भागात एक ३२ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. बबलू ऊर्फ अमीर रफिक बागवान (वय ३२, रा. नाळे प्लॉट, बार्शी) असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेबाबत माहिती मिळाल्यानंतर नवाब शब्बीर शेख (वय ३३, व्यवसाय- रिक्षाचालक, रा. नाळे प्लॉट) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन खबर दिली. नवाब शेख यांनी दिलेल्या माहितीनुसार, नेहमीप्रमाणे त्यांनी मित्र बबलू उर्फ अमिर यास फोन केला; परंतु प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी आपल्या मित्रासह त्याच्या घरी जाऊन आवाज दिला. मात्र दरवाजा उघडला गेला नाही. दोघांनी मिळून दरवाजा ढकलून आत प्रवेश केला असता बबलू याने खोलीमधील लाकडी आडूला वडणीने गळफास घेत आत्महत्या केल्याचे दिसून आले.

# इक्रिसैटच्या आफ्रिका संचालकांची भेंड गावास भेट

**भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संलग्न इक्रिसैट संस्थेच्या शिष्टमंडळाचा पीक पद्धती व जलसंधारण प्रकल्प पाहणी दौरा**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.८ ऑगस्ट-**

माढा तालुक्यातील भेंड येथे अर्ध-शुष्क उष्ण कटिबंधांसाठी आंतरराष्ट्रीय पीक संशोधन संस्थेच्या आफ्रिका संचालिका रिब्बी हरावा व शिष्टमंडळाने भेट दिली. भूजल सर्वेक्षण संलंग्न ग्आंतरराष्ट्रीय अर्ध-शुष्क कटिबंधातील पीक संशोधन संस्था (इक्रिसैट) संस्थेच्या माध्यमातून भेंड येथे पिक पद्धती आणि जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत.त्या अनुषंगाने सदर शिष्टमंडळाचा संशोधन अधिकाऱ्यांचा पाहणी दौरा आयोजित करण्यात आला. सदर शिष्टमंडळात प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. कौशल गर्ग, डॉ. अनंथा के एच यांचा समावेश होता. इक्रिसैटच्या माध्यमातून गावातील पर्जन्यमानावर आधारित पीक पद्धती, जलसंधारण करणेसाठी कोअर वॉल बांधणी व पाणी पातळीसाठी नियोजन करण्यात येत आहे. त्यातून अंतरपीक, हंगामी पिके, फळपिके, मिलेट्स आदी जवळपास दीडशे ते दोनशे एकरावर क्षेत्र लागवडीखाली आले आहे. विज्ञान-आधारित पर्जन्य जलसंचयाच्या माध्यमातून आणि व्यवस्थापन तंत्रज्ञान वापरुन कोरडवाहू क्षेत्राची उत्पादकता सुधारण्याच्या अनुषंगाने संभाव्य सहकार्यासाठी आंतरराष्ट्रीय अर्ध-शुष्क



कटिबंधातील पीक संशोधन संस्था कार्यरत आहे. शेंगा असलेली धान्ये म्हणजेच हरभरा, तुरी तसेच कोरडवाहू तृणधान्ये म्हणजेच ज्वारी, बाजरी आणि नाचणी यांची उत्पादक क्षमता, जुळवून घेण्याची क्षमता आणि परिणाम तसेच गुणवत्ता वैशिष्ट्ये वाढवण्यासाठी या पिकांचा जनुकीय विकास करण्यासाठी काम करत आहे. धान्ये, कोरडवाहू तृणधान्यांची उत्पादक क्षमता, तसेच गुणवत्ता वैशिष्ट्ये वाढवण्यासाठी या पिकांचा जनुकीय विकास याचा समावेश आहे. यामुळं शेती पिकांच्या विकासासाठी मदत होणार आहे.यासोबतच संशोधन अधिकाऱ्यांनी कोअर वाल, स्वयंचलित हवामान केंद्र, पीक पद्धतीच्या अभ्यासासाठी तांत्रिक उपकरणे,ग्रामपंचायत कार्यालयाला भेट देऊन पाहणी केली. प्रारंभी शिष्टमंडळाचे आगमन होताच त्यांचे औक्षण करून शाल, श्रीफळ आणि पारंपरिक फेटा बांधून स्वागत करण्यात आले.याप्रसंगी या कार्यक्रमाला भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा चे वरिष्ठ भुवैज्ञानिक डॉ. मुश्ताक शेख, डॉ. संजय साबळे, माजी समाज कल्याण सभापती शिवाजी कांबळे, उमेदचे अवधूत देशमुख आदी उपस्थित होते. सदर महत्वाकांक्षी प्रकल्प भुजल सर्वेक्षणचे डॉ. प्रवीण कथने व अर्ध-शुष्क उष्ण कटिबंधांसाठी आंतरराष्ट्रीय पीक संशोधनचे डॉ. रमेश सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.कार्यक्रमाचे व भेटीचे नियोजनाबद्दल डॉ कौशल गर्ग यांनी सांगितले. प्रस्तावना प्रा. सुभाष रणदिवे सर यांनी केली , तर आभार डॉ. संतोष दळवी यांनी मानले. यावेळी ग्रामस्थ व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

#### पीक पद्धती व जलसंधारण प्रकल्पाची पाहणी

भेंड येथे पर्जन्यमानावर आधारित पीक पद्धती, जलसंधारण, कोअर वॉल बांधणी आणि पाणी पातळी व्यवस्थापन या कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा आणि इक्रिसैट यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प राबविला जात आहे.

#### १५० ते २००एकर क्षेत्र लागवडीखाली

अंतरपीक, हंगामी पिके, फळपिके आणि मिलेट्स मिळून १५० ते २००एकर क्षेत्र लागवडीखाली आणण्यात आले आहे.हरभरा, तूर, ज्वारी, बाजरी आणि नाचणी यांची उत्पादक क्षमता, गुणवत्ता आणि जुळवून घेण्याची क्षमता वाढवण्यासाठी जनुकीय विकासाचे संशोधन सुरू आहे.

भूजल सर्वेक्षण आणि इंटरनॅशनल क्रॉप रिसर्च इन्स्टिटयूट फॉर सेमी एरिड ट्रॉपिक्स' अंतर्गत भेंड(ता.माढा) येथे जलसंधारण आणि पर्जन्य मानावर आधारित पीक पद्धतीचे काम पूर्णत्वास येत आहे त्यामुळे जवळपास २०० एकर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. यंदा हंगामात सर्व मिलेट्स, नाचणी, तूर लागवड केली आहे. नवीन सुधारित वाणाच्या वापराने पाण्याची बचत व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात विक्रमी वाढ झाली.

**- डॉ. संतोष दळवी**
**माजी सरपंच, भेंड**

## कमळे गुरुजींचे कार्य नव्या पिढीने अजरामर करावे : प्रा. एम.आर. कांबळे




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

भंडारकवठे या खेडेगावातील तिपण्णा ऊर्फ दीनानाथ कमळे यांच्या कार्याची माहिती होणे सध्याच्या काळात गरज आहे. बेलाटी येथे शिक्षक म्हणून नोकरी करीत असताना समाजसेवा हे व्रत अंगी बाळगून त्यांनी ग्राम विकास मंडळाची स्थापना करुन जनजागृती केली. प्रबोधनासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना बेलाटी येथे मुक्कामी आणले होते. पुढे समाजकारणाला राजकारणाची जोड देत काँग्रेस जिल्हाध्यक्ष पद प्रामाणिकपणे सांभाळून इंदिरा गांधी यांचा विश्वास संपादन केला होता. कमळे गुरुजींनी माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर अ.र.अंतुले यांच्या काळात मंत्रीपद भुषवले होते. सोलापूर येथे कमला नगर वसाहतीची स्थापना करून प्रत्येक घर महिलांच्या नावे करणे हा अनोखा प्रयोग गुरुजींनी राज्यात प्रथम केला होता. नंतर सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ या संस्थेची स्थापना करुन शेती, आरोग्य व शिक्षण हि त्रिसूत्री मानून प्रबोधनाचे कार्य चालू ठेवले. दक्षिण सोलापूर तालुक्यात शिक्षणाची गंगा घरोघरी पोचवली.असे सांगून कमळे गुरुजींचे कार्य नव्या पिढीने अजरामर करणे गरजेचे आहे असे सोलापूर येथील ज्येष्ठ विचारवंत प्रा एम आर कांबळे यांनी प्रतिपादन केले. येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात दी.शि.कमळे गुरुजींचे शैक्षणिक व सामाजिक कार्य या विषयावर व्याख्यान पार पडले. महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सप्ताहानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत प्रा नरेश बदनोरे होते तर प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम एन जगताप यांची होती.




## सुरक्षेच्या देवदूतांना राखी बांधून सन्मान; लक्ष्मी-आनंद विद्यालयाचा अनोखा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.८ ऑगस्ट-**

श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित, लक्ष्मी- आनंद विद्यामंदिर व ज्यु.कॉलेज मधील विद्यार्थिनींनी रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने खऱ्या अर्थाने आपले रक्षण करणाऱ्या टेंभुर्णी पोलीस स्टेशन मधील सर्व पोलीस बांधवांना राखी बांधून हा उत्सव साजरा केला.

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रीदवाक्यांस अनुसरून नेहमीच तत्पर असलेले पोलीस खरे बांधव असतात. म्हणूनच याच कृतज्ञतेने विद्यार्थिनींनी पोलीस बांधवांना राखी बांधून हा अनोखा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा केला. यावेळी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा.नारायणजी पवार साहेब यांच्या नेतृत्वाखाली सदर कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी ते म्हणाले की, आम्ही कायम आपल्या सोबत आहोत. मुलींनी समाजामध्ये निर्भयपणे वागले पाहीजे, उतुंग यश संपादन केले पाहिजे. अशा आशयाचा ठाम विश्वास या निमित्ताने त्यांनी व्यक्त केला. संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे व टेंभुर्णी सरपंच सौ. सुरजा बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच संस्थेच्या संचालिका शाहिदा पठाण, प्राचार्य विकास करळे, पीआरओ सागर खुळे, प्रा.युवराज वजाळे, सहशिक्षिका गायत्री शहाणे व इतर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## वैरागच्या संतनाथ यात्रेतील दहीहंडी उत्साहात

**आज कुस्त्याने होणार यात्रेची सांगता**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ८ ऑगस्ट-**

वैराग (ता. बार्शी) चे ग्रामदैवत सदगुरू श्री. सच्चिदानंद संतनाथ महाराज यात्रेतील नारळीपौर्णिमेचा दहीहंडी कार्यक्रम ' संतनाथ महाराज की जय ' च्या जयघोषात हजारों भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. शनिवारी (९ ऑगस्ट) रोजी तीन ठिकाणी निकाली कुस्ती फडाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी यात्रेची सांगता होणार आहे. यात्रेनिमित्त सलग सहा दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात्रा अत्यंत शांततेत पार पडली.

शुक्रवार दि. ८ ऑगस्ट या यात्रेच्या मुख्य दिवशी नारळीपौर्णिमेच्या मुहूर्तावर पहाटे मंदिरामध्ये बोधले महाराज धामणगावकर यांचा नाथ पंथी जोगाचा धार्मिक कार्यक्रम झाला. दुपारी मानकऱ्यांचा मंदिर समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी झाली होती. दुपारी मंदिरातून श्री. संतनाथ महाराजांची पालखी नगर परीक्रमेसाठी रवाना झाली. या यात्रा काळात पालखी मार्गावर सलग पाच दिवस रांगोळीच्या आकर्षक पायघड्या घालण्यात आल्या होत्या. ही पालखी मलंगशहा दर्गा, गांधी चौक, वाणेगल्ली मार्गे गाव तळ्याजवळ विसावली. दहिहंडी काल्याचा कार्यक्रम सुर्यास्ताबरोबर पार पडला. यावेळी देवस्थान कमेटीचे अध्यक्ष रावसाहेब पाटील यांच्या हस्ते व मानकऱ्यांच्या उपस्थितीत छबीना प्रमुख प्रतापराव निंबाळकर, मंदिराचे सर्व मानकरी यांच्या उपस्थित काला प्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी तळ्याकाठी लाखोंचा भक्तसागर लोटला होता. दरम्यान पालखी समोर गांधी चौकात व तेथून पुढे विविध लेझीम मंडळाच्या पथकातील खेळाडूंनी, गोफ पथकांनी नेत्रदिपक पारंपारीक खेळाचे प्रदर्शन करून भाविकांच्या डोळ्याचे पारणे फेडले.



## युटोपियन शुगर्सचे मील रोलर पुजन

**यंदाच्या गळीत हंगामात सहा लाख टन गाळपाचे उद्दिष्ट**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.८ ऑगस्ट-**

कचरेवाडी (ता. मंगळवेढा) येथील युटोपियन शुगर्स लि. या कारखान्याचे यंदाच्या गाळप हंगाम साठी मील रोलर पुजन गुरुवार दि. ७ ऑगस्ट रोजी कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी बोलताना चेअरमन उमेश परिचारक म्हणाले की, आपल्या कारखान्याचा हा बारावा गळीत हंगाम असून मागील ११ ही हंगामात युटोपियन ने भरीव कामगिरी केलेली आहे. चालू गळीत हंगामात ६ लाख मे.टन ऊसाचे गाळप करणेचे उद्दिष्ट आहे. चालू गळीत हंगामात ऊसाची उपलब्धता चांगली आहे. यंदा पाऊस चांगला पडला असल्यामुळे ऊस मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. ऊस उत्पादकांनी आजपर्यंत ठेवलेल्या विश्वासास पात्र राहुन या गळीत हंगामात कारखान्याचे मार्गदर्शक आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या सुचने नुसार सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा व मोहोळ या तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा संपूर्ण ऊस गाळप केला जाईल. चालु गळीत हंगामात सर्व कामगारांच्या वतीने कारखान्याचे चिफ टेक्निकल ऑफीसर तुकाराम देवकते यांनी झिरो स्टॉपेज व झिरो लिकेज ही टॅगलाई तयार करुन काम करणार असलेचे सांगीतले.



# कासेगावच्या बालाजी चौगुलेंची निश्चयातून कार्यसिध्दी

**निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेची फळ ।।**

या संतोक्तीनुसार कोणत्याही कामाचे फळ हे त्याच्या निश्चयावर अवलंबून असते. निश्चय चांगला असेल तर फळ नक्की चांगलेच असते. त्यानुसार कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील **बालाजी लक्ष्मण चौगुले** यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीवर मात करत केलेल्या निश्चयातून उद्योजक होण्यापर्यंतची कार्यसिध्दी साधली आहे. खत निर्मिती उद्योगासह बालाजी चौगुले हे महाराष्ट्र राज्य फर्टिलायजर असोसिएशनचे उपाध्यक्ष, ऑल इंडिया फर्टिलायर असोसिएशनचे राज्य सदस्य तर सोलापूर जिल्हा फर्टिलायजर असो.चे जिल्हा सचिव आहेत. याबरोबरच सोलापूर द्राक्ष बागायदार संघाचे संचालकपद सांभाळत आहेत. त्यामुळे अत्यंत कमी वयातील त्यांची ही झेप सर्वांना थक्क करणारी आहे.

सोलापूर-तुळजापूर रोडवरील उळेपासून तीन किलोमीटरवरील श्रीक्षेत्र कासेगाव येथे महादेवाचे पुरातन हेमाडपंथी मंदिर आहे. या पावन नगरीत २ नोव्हेंबर १९७९ रोजी ज्नम झालेल्या बालाजी चौगुले यांनी अत्यंत हालाखीच्या परिस्थितीचा सामना करत एक उत्तुंग यश मिळवले आहे. कासेगाव येथील लक्ष्मण विठोबा चौगुले यांच्या पोटी बालाजीचा जन्म झाला. घरात आई, वडील दोन बहिणी व एक भाऊ. परंपरागत कोरडवाहू शेती. त्यामुळे उत्पन्न जेमतेमच. हातातोंडाची मिळवणी करता करता नाकीनऊ येत. आई व वडील दररोज मजूरी करूनच प्रपंचाचा गाडा चालवत होते. त्यामुळे लहानपणी बालाजीने गरीबीचे चटके अनुभवले. भावंडात मोठा असल्याने कायम जबाबदारीने वागणे आले. त्याचा परिणाम कायम वागण्या बोलण्यात झाला. जेमतेम शेती असल्याने उत्पन्न कमीच होते. त्यामुळे घरात एक ओआहे तर एक नाही अशी आवस्था. त्या परिस्थितीला तोंड देत त्यांनी गावातच प्रथामिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुढील शिक्षणासाठी सोलापूर येथे प्रवेश घेतला. पडेल ते काम करून शिक्षणासाठीचा खर्च भागवणे सुरू झाले. पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीनिमित्त कोल्हापूर गाठले. एका



कृषी व्यवसायाशी निगडीत खाजगी कंपनीमध्ये त्यांना नोकरी मिळाली. येथूनच त्यांच्या आयुष्याल वेगळी कलाटणी मिळाली. मुळात शेतीचा पिंड व नोकरी कृषी व्यवसायाशी निगडित त्यामुळे अधिक रस घेऊन कंपनीतील उत्पादनाबाबात चिकित्सक वृत्तीने ज्ञान प्राप्त केले. तेथे पडेल ती जबाबदारी स्वीकारली व त्यातूनच चांगला अनुभव आला. याच बळावर त्यांनी व्यवसायाची वाट धरण्याचे ठरवले अन नोकरी सोडून सोलापूर गाठले. २००१ मध्ये त्यांनी स्वतःच्या व्यवसायाचा श्रीगणेशा केला. **शिवशंभू ॲग्रो सीड्स** या नावाने खते, बी-बियाणे व कीटकनाशके विक्रीचा व्यवसाय चालू केला. तो करीत असताना त्या व्यवसायामध्ये आलेला अनुभव व सामाजिक बांधिलकी जोपासत आपल्याबरोबर इतरांनाही रोजगार मिळावा यासाठी त्यांनी सन २०१० मध्ये **महिंद्रा क्रॉप सायन्स** या कंपनीची स्थापना केली. या कंपनीमध्ये त्यांनी सुरुवातीला पीक संजीवके व दुय्यम अन्नद्रव्ये मायक्रोन्यूट्रन्स इत्यादी उत्पादन केले. त्यामध्ये त्यांचे अटॅक, मॅक्स डी एफ, बूमफ्लावर, अपटेक, फायर, बॅटरीनाशक, टायगर अशी प्रचलित उत्पाने लोकप्रियतेला आली. त्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणावर मागणी झाली. त्यातूनच त्यांनी दुय्यम अन्नद्रव्याचा कारखाना सन २०१७ मध्ये चालू केला. तो धाराशिव जिल्ह्यात तामलवाडी (ता. तुळजापूर) येथे **तेरणा व्हॅली फर्टीलायझर अँड केमिकल्स** या नावाने त्यांनी आपल्या पत्नी **सौ.स्वाती बालाजी चौगुले** यांच्या नावे हा उद्योग येथे कार्यरत केला आहे. त्यामध्ये बळीराजा, सुपर रिद्धी, सिद्धी पोटॅश, ईगल सुपर, दाणेदार सम्राट ऊस स्पेशल, संपन्न कांदा स्पेशल ,सिलिकॉन, मॅक्स फर्ट, बायो फर्ट, रूट फर्ट तसेच ड्रिप सोलोबल खते यामध्ये १९ १९ १९, १२ ६१ ०, १३ ०. ४५, ० ५२ ३४, ० ० ५०, कॅल्शियम नायट्रेट, अमोनियम सल्फेट असे नवनवीन उत्पादने त्यांनी बाजारात आणली. त्याला विशेष लोकप्रियता मिळाली आहे. त्यांची ही उत्पादने महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश येथे वितरित होतात. त्यास शेतकरी चांगला प्रतिसाद देत आहेत .अशा प्रकारे आपल्या कंपनीचा ते विस्तार करीत आहेत. याद्वारे लोकांना रोजगार उपलब्ध करत आहेत. त्यांची ही उत्पादने माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी साहेब यांनी विकसित भारत उद्दिष्ट ठेवून केलेल्या आवाहनाला अनुसरून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. ऑरगॅनिक म्हणजेच सेंद्रिय शेतीद्वारे लोकांना विषमुक्त अन्न मिळावे यादृष्टीने ते आपली सर्व उत्पादने ऑरगॅनिक फर्टीलायझर तयार करीत आहेत. सन २०४७ पर्यंत भारत जगातील प्रमुख एकमध्ये गणला जावा यासाठी आपले केंद्रिय कृषिमंत्री माननीय शिवराजसिंह चव्हाण व राज्याचे माजी कृषिमंत्री माननीय श्री माणिकरावजी कोकाटे तसेच विद्यमान कृषीमंत्री दत्तात्रय भरणे साहेब यांनी सेंद्रिय शेतीसाठी प्रबोधनात्मक कार्य अवलंबिले आहे. त्याला अनुसरून श्री बालाजी चौगुले यांनी आपल्या व्यवसायात नवनविन बदल केले आहेत. ऑरगॅनिक फर्टीलायझर मॅन्युफॅक्चरिंग करून देश हितासाठी पुढे योग्य ती दिशा घेऊन ते कार्यरत आहेत. अशा पद्धतीने त्यांच्या हातून पुढील शेतकरी सेवा व देश सेवा घडो हीच सदिच्छा. त्यांच्या या घोडदौडीत त्यांचे कुटूंबिय विशेषतः पत्नी सौ. स्वाती, मुले, आई श्रीमती मंगलबाई, भाऊ, बहिणी तसेच चौगुले कुटूंबिय व ग्रामस्थांची साथ महत्वाची आहे.

धन्यवाद...

**शब्दांकन - प्रमोद (श्याम) जोशी**
**उपसंपादक, दै. तरूण भारत, सोलापूर.**

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



## महत्त्वाचे

### कन्हैयालालवरील चित्रपट पाहून मुलगा भावुक

**उदयपूर** : राजस्थानमधील कन्हैयालाल हत्याकांडावर आधारित चित्रपट देशभरातील ४५०० स्क्रीनवर प्रदर्शित झाला. कन्हैयालाल साहू यांचे पुत्र यश आणि तरुण हे देखील उदयपूरच्या अर्बन स्क्वेअर मॉलमध्ये चित्रपट पाहण्यासाठी आले होते. चित्रपटात कन्हैयालालची मान कापल्याचे दृश्य आले तेव्हा, दोन्ही भावांना आपले अश्रू अनावर झाले. मुलगा यश तेली म्हणाला- खूप संघर्षानंतर आज हा चित्रपट लोकांसमोर आला आहे. या चित्रपटाला अनेक ठिकाणी आव्हान देण्यात आले. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्यानंतर त्याचा निर्णय केंद्र सरकारवर सोडण्यात आला.

### बाराबंकीत चालत्या बसवर झाड कोसळले; पाच जणांचा मृत्यू

**बाराबंकी** : उत्तर प्रदेशातील बाराबंकी येथे एका चालत्या रोडवेज बसवर झाड कोसळले. या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला. अनेक प्रवासी अजूनही अडकले आहेत. त्यांना बाहेर काढण्यासाठी बचाव कार्य सुरू होते. ६० जणांना घेऊन जाणारी बस बाराबंकीहून हैदरगढला जात होती. अपघात झाला तेव्हा मुसळधार पाऊस पडत होता. झाड इतके जड होते की बसचे छत कोसळले. स्थानिक प्रशासन आणि पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी लगेचच बचाव कार्य सुरू केले.

### गाझा ताब्यात घेण्यास मान्यता

**तेल अवीव** : इस्रायली मंत्रिमंडळाने शुक्रवारी लष्कराच्या कारवाईचे समर्थन करीत गाझा पट्ट ताबा मिळविण्यास मान्यता दिली. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या कार्यालयाने एक निवेदन जारी करून याची पुष्टी केली. यासोबत शस्त्रविरामासाठी हमाससमोर पाच अटी ठेवल्या आहे. पंतप्रधान नेतान्याहू यांच्या कार्यालयाने निवेदनात म्हटले की, इस्रायलचे गाझावर नागरी शासन राहणार नाही, तसेच पॅलेस्टिनी प्राधिकरणाला त्यात कोणतीही भूमिका दिली जाणार नाही. गाझाला हमासच्या दहशतीपासून मुक्त करणे, तेथील लोकांना स्वातंत्र्य देणे आणि नंतर प्रशासन एका जबाबदार सत्तेकडे सोपवणे याला प्राधान्य दिले जाणार आहे. यामुळे गाझामध्ये शांतता आणि लोकांना चांगले जीवन प्रदान करता येईल. गाझावर ताबा मिळविण्याच्या योजनेला बिग गाझा असे नाव देण्यात आले. इस्रायली संरक्षण दलाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल इयाल झमीर यांनी या योजनेला आक्षेप घेतला. यामुळे इस्रायली राजकीय आणि लष्करी नेतृत्वात संघर्ष निर्माण झाला. गाझा ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्यास तेथे ओलीस ठेवलेल्या २० इस्रायली नागरिकांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा झमीर यांनी दिला.

### मादुरोंच्या अटकेसाठी ४१६ कोटींचे बक्षीस

**वॉशिंग्टन** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष व हुकूमशहा निकोलस मादुरो यांच्या अटकेसाठी ५० दशलक्ष डॉलर्स अर्थात् ४१६ कोटींच्या बक्षीसाची घोषणा केली. मादुरो यांच्यावर ड्रग्ज तस्करी, अमेरिकेविरोधात कट रचणे, स्वयंचलित शस्त्रास्त्रे आणि विध्वंसक उपकरणांची बेकायदेशीर विक्री, असे आरोप करण्यात आले आहेत. ॲटर्नी जनरल पाम बॉन्डी यांनी सांगितले की मादुरो यांनी विदेशी दहशतवादी संघटनांसोबत हातमिळवणी केली आहे. दहशतवादी गट अमेरिका आणि जगभरात मादक पदार्थांची तस्करी आणि हिंसाचारात सहभागी आहे. मादुरो यांच्याशी संबंधित ३० टन कोकेन जप्त केले. जप्त केलेले कोकेन फेंटेनिल या अत्यंत घातक अमली पदार्थाने मिसळलेले असते, ज्यामुळे अमेरिका आणि जगभरात हजारो लोकांचे जीव गेले.

### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,०१,८०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु.१,१५,८०० |

### तापमान/पर्जन्यमान

| | कमाल | मिमी |
|---|---|---|
| सोलापूर | २८.४ | २४.१ |
| अमरावती | २८.८ | ०.० |
| भंडारा | ३१.७ | १.० |
| बुलडाणा | २८.२ | ०.० |
| चंद्रपूर | ३०.४ | ०.० |
| गडचिरोली | २८.६ | १.० |
| गोंदिया | ३२.६ | ५.० |
| नागपूर | २८.५ | ०.० |
| वर्धा | २७.० | १६.० |
| वाशीम | २५.६ | १५.० |
| यवतमाळ | २७.२ | ३.० |

# उद्धव ठाकरेंना राहुल गांधींच्या बैठकीत मागच्या रांगेत स्थान

- शिंदेंच्या शिवसेनेची सडकून टीका
- बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळावर माफी मागण्याचे आवाहन



**मुंबई, दि.८ ऑगस्ट-**
इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी उद्धव ठाकरे हे सध्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी दिलेल्या निमंत्रणावरून त्यांच्या घरी स्नेहभोजनासाठी देखील ते गेले होते. मात्र यावेळी झालेल्या बैठकीदरम्यान उद्धव ठाकरे यांना सर्वात मागच्या रांगेत बसवण्यात आले होते. त्याचे फोटो सध्या समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. या फोटोवरून एकनाथ शिंदे यांच्या नेत्यांनी ठाकरे गटावर टीका केली आहे.

अरे काय तुमची किंमत? असा प्रश्न शिवसेनेच्या नेत्यांनी विचारला आहे. थोडा जरी स्वाभिमान, आत्मसन्मान शिल्लक असेल तर जरा तरी पेटून उठा? असे आवाहन नरेश म्हस्के यांनी केले आहे. तर एकनाथ शिंदेंच्या शिवसैनिकांनी बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृतीस्थळावर जात 'उद्धव ठाकरेंना माफ करा, सडका मेंदू साफ करा' अशा घोषणा दिल्या. काँग्रेससोबत जाऊन उद्धव ठाकरे स्वतःचीच अवहेलना करून घेत असल्यामुळे त्यांनी बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळावर येऊन त्यांची माफी मागावी, अशी भूमिका शिंदे गटाने घेतली आहे.

या संदर्भात एकनाथ शिंदे यांच्या गटाचे नेते आणि ठाणे लोकसभा मतदारसंघातील खासदार नरेश म्हस्के यांनी उद्धव ठाकरे यांच्यासह आदित्य ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांचे या बैठकीमधील फोटो देखील नरेश म्हस्के यांनी शेअर केले आहेत. यामध्ये त्यांनी हा महाराष्ट्राचा अपमान असल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्राची लाज तुम्ही दिल्लीत जाऊन घालवली, अशा शब्दात नरेश म्हस्के यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. बाळासाहेबांनी आम्हाला आत्म सन्मान, स्वाभिमान शिकवला. अपमान विरुद्ध पेटून उठवण्याचा धडा आम्हाला शिवरायांनी आणि बाळासाहेबांनी दिला. तुम्ही यातले काहीच घेतले नाही का? असा प्रति प्रश्न देखील नरेश मस्के यांनी विचारला आहे. राहुल गांधी यांच्या सादरीकरणाच्या वेळी उद्धव ठाकरे यांच्या आसन व्यवस्थेवरून झालेल्या या टीकेला ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिले आहे. या संबंधीत आरोप त्यांनी फेटाळले आहेत. स्क्रीनसमोर बसून पाहणे त्रासदायक असल्याने आम्ही मागे बसलो होतो, असे त्यांनी स्पष्ट केले. उद्धव ठाकरे यांना तांत्रिक गोष्टींची जाण असल्याने त्यांनी मागे बसून सादरीकरण पाहणे पसंत केले, असल्याचा दावा देखील राऊत यांनी केला आहे.

**महाराष्ट्राचा कणा गहाण ठेवला**
कशी नशिबाने थट्टा आज मांडली, अशा शब्दात नरेश म्हस्के यांनी ठाकरेंवर निशाणा साधला. ठाकरे यांची अवस्था पिंजरा चित्रपटातील मास्तर सारखी झाली असल्याचा आरोप मस्के यांनी केला आहे. उद्धव ठाकरेंना सहाव्या रांगेत बसवले असल्याचे म्हस्के यांनी म्हटले. उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राची परंपरा धुळीस मिळवली. खुर्चीसाठी त्यांनी महाराष्ट्राचा कणा गहाण ठेवला असल्याची टीका मस्के यांनी केली आहे. ज्या पक्षांचे एक-एक खासदार आहेत. अशी मंडळी पुढे बसली आहे. मात्र, कधी काळी माजी मुख्यमंत्री अशा माणसाला सातव्या रांगेमध्ये बसवले जाते? हा महाराष्ट्राचा अपमान असल्याचेही मस्के यांनी म्हटले आहे.

# माधुरी हत्तिणीला परत कोल्हापुरात आणण्यास पेटा इंडियाचा आक्षेप

**वनतारा सारखी सुविधा महाराष्ट्रात नसल्याचा दावा**



**मुंबई, दि.८ ऑगस्ट-**
कोल्हापूर मधील माधुरी हत्तिणीला परत आणण्यास पेटा इंडियाने आक्षेप घेतला आहे. माधुरीला मुक्तपणे फिरण्यासाठी एक शांत जागा, तिच्या वेदना कमी करण्यासाठी आणि तिच्या आजारी पायांना व्यायाम देण्यासाठी एक तलाव आणि तिच्या अनेक आरोग्य समस्यांपासून मुक्त होण्यासाठी प्रगत पशुवैद्यकीय उपकरणे आणि कौशल्याची आवश्यकता आहे. वनतारा हे सर्व प्रदान करते आणि सध्या महाराष्ट्रात अशी दुसरी कोणतीही सुविधा नसल्याचा दावा पेटाने केला आहे. जर हे चित्र बदलले आणि महाराष्ट्रात तशा सुविधा तयार झाल्या तर, पेटा इंडिया तिच्यावर उपचार करण्यास विरोध करणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

या संदर्भात पेटा इंडियाने म्हटले की, माधुरीच्या, हत्तीच्या अंतिम भवितव्याबद्दल सुरू असलेल्या चर्चांची आम्हाला जाणीव आहे आणि तिच्यासाठी सर्वोत्तम मिळले अशी आशा आहे. १६ जुलै २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाशी आम्ही सहमत आहोत. तिची खराब प्रकृती पाहता, सर्वात महत्त्वाचे म्हणजे, माधुरीच्या आरोग्याला इतर सर्व गोष्टींपेक्षा प्राधान्य दिले पाहिजे. ज्याप्रमाणे मानवांना कधीकधी रुग्णालयात दाखल करणे, त्यांची व्यापक स्वरुपात काळजी घेणे आणि कामातून काही काळानंतर निवृत्तीची आवश्यकता असते. तसेच हत्तींना देखील असते.

ज्याप्रमाणे मानवांना आपल्या जवळ इतर मानवांची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे हत्तींना इतर हत्तीसोबत राहण्याची आवश्यकता असते. हत्तींमध्ये मातृसत्ताक कुटुंब आहेत जे कौटुंबिक नातेसंबंधांना खूप महत्त्व देतात. माधुरीला वनताराच्या राधे कृष्ण मंदिर एलिफंट वेल्फेअर ट्रस्टमध्ये तिच्या इतर हत्ती मित्रांना भेटताना एकदा पहा, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. मुख्य चिंतेची बाब म्हणजे माधुरीला तिच्या आरोग्यासाठी विशेष पशुवैद्यकीय काळजी आणि इतर हत्तींच्या सहवासाची फार पूर्वीपासून गरज आहे. म्हणूनच तिला उच्च दर्जाचे पशुवैद्यकीय उपचार, साखळदंडांपासून मुक्तता आणि काळजी मिळावी यासाठी आम्ही मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे मनापासून समर्थन करतो. तिला ग्रेड-४ चा संधिवात आहे.

यामध्ये वेदनादायक पाय कुजणे यासारखे लक्षणे दिसून येतात. हे हत्तींमध्ये गंभीर मानसिक त्रासाचे लक्षण असल्याचेही पेटा इंडियाने म्हटले आहे. ३३ वर्षे एकाकीपणात आणि कडक काँक्रीट वर राहिल्यानंतर न्यायालयाने तिला नवीन जीवन देण्याचा निर्णय दिला आहे.

# 'उज्ज्वला'ची सबसिडी कायम

### केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय, १२ हजार ६० कोटींची तरतूद

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**
गरिबांसाठी सुरू असलेल्या उज्ज्वला योजनेतंर्गत सुरू असलेले अनुदान कायम ठेवण्यात आले आहे. यासाठी १२ हजार ६० कोटी रुपयांची तरतूद केंद्र सरकारने केली आहे. तसेच स्वयंपाकाच्या गॅसच्या सबसिडीसाठी दोन वेगवेगळ्या निर्णयात केंद्रीय मंत्रिमंडळाने आज ४२ हजार कोटी रुपयांना मंजुरी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज संसदभवन परिसरात केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीला संरक्षणमंत्री राजनाथसिंह, भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, यांच्यासह सर्व मंत्री उपस्थित होते. बैठकीनंतर आयोजित पत्रपरिषदेत या निर्णयांची माहिती देतांना रेल्वे तसेच माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना २०२५ २६ साठी ९ महिन्यापर्यंत प्रतिसिलेंडर ३०० रुपयांची सबसिडी दिली जाईल. यासाठी १२ हजार ६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.याआधी ऑक्टोबर २०२३ पासून १२ महिन्यांसाठी प्रतिसिलेंडर ३०० रुपयांची सबसिडी दिली जात होती.

सार्वजनिक क्षेत्रातील भारत पेट्रोलियम, इंडियन ऑईल आणि हिंदुस्थान पेट्रोलियम या तीन कंपन्यांना एलपीजी गॅसच्या विक्रीतून झालेल्या तोट्याची भरपाई करण्यासाठी ३० हजार कोटी रुपये द्यायलाही केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली, असे वैष्णव यांनी सांगितले.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय १२ महिन्यात ही भरपाई करणार आहे, असे स्पष्ट करत वैष्णव म्हणाले की, २०२४ २५ मध्ये आंतरराष्ट्रीय बाजारात एलपीजी गॅसच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली, मात्र या दरवाढीचा बोझा ग्राहकांवर पडू नये, म्हणून सरकारने नियंत्रित दरात एलपीजी गॅस देण्याचा निर्णय घेतला,

**२७५ महाविद्यालयांसाठी ४२०० कोटी**
१७५ अभियांत्रिकी तसेच १०० तंत्रशिक्षण महाविद्यालय अशा एकूण २७५ तंत्रविषयक महाविद्यालयात बहुस्तरीय शिक्षण तसेच संशोधनासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने ४२०० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचे वैष्णव यांनी सांगितले.
(तभा वृत्तसेवा)

# संघटन, संस्कार, शिक्षणाचा जिवंत अनुभव

### यात्रेत सहभागी कार्यकर्त्यांची प्रतिक्रिया ● सरस्वती शिक्षा यात्रेचा समारोप



सरस्वती शिक्षा यात्रेत समारोपीय कार्यक्रमात बोलताना शैलेश जोशी.सोबत व्यासपीठावर समीर थोडगे, धर्मेंद्र गुर्जर व मान्यवर

**नागपूर, ८ ऑगस्ट**
विद्या भारती, विदर्भ प्रांताच्या वतीने आयोजित करण्यात आलेली सरस्वती शिक्षा यात्रा ३ ते ७ ऑगस्ट या कालावधीत पार पडली. या यात्रेत विदर्भ प्रांतातील १२ शैक्षणिक संस्थांचे अध्यक्ष, सचिव, विश्वस्त, प्राचार्य, आचार्य तसेच विद्या भारतीशी संलग्न अशा ३७ कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. संघटन, संस्कार आणि शिक्षणाचा अनुभव या यात्रेदरम्यान आल्याचे मत सहभागी कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

या प्रतिनिधी मंडळाने मध्यभारत प्रांतातील विद्या भारतीच्या महत्त्वपूर्ण शैक्षणिक प्रकल्पांचा प्रत्यक्ष अभ्यास केला. या अभ्यासातून त्या संस्थांची कार्यपद्धती, वैशिष्ट्ये, शैक्षणिक उपक्रम, व्यवस्थापन प्रणाली आणि सामाजिक भान यांचा अनुभव घेतला.

या यात्रेची सुरुवात बैतूल येथील भारत भारती प्रकल्पापासून झाली, जिथे गुरुकूल परंपरा आणि आधुनिक शिक्षण यांचा सुरेख संगम पाहायला मिळाला. त्यानंतर चिचोट येथील वैदिक विद्यापीठम् येथे भेट दिली. येथे चालणाऱ्या वैदिक अभ्यासक्रम आणि शिस्तबद्ध वातावरणाने सर्वांनाच भारावून टाकले. पुढे हरदा येथील सरस्वती विद्या मंदिरात शहरी भागातील उत्कृष्ट शैक्षणिक कार्य पाहता आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी होणाऱ्या प्रयत्नांची साक्ष सहभागी कार्यकर्त्यांनी घेतली.

भोपाळमधील शारदा विहार आणि शारदा प्रकाशन यांच्या कार्याचा परिचय करून देताना राष्ट्रनिर्मितीसाठी सुरू असलेल्या साहित्यसेवा व बालक-बालिकांचे समन्वय शिक्षण, गोविंद नगर येथील सैनिक विद्यालयात देशभक्ती, शिस्त आणि समर्पण भावनेच्या आधारे घडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची प्रचिती सर्वांना आली.

ही यात्रा विद्या भारती, विदर्भ प्रांताचे संघटन मंत्री शैलेश जोशी व यात्रा संयोजक प्रांत सहमंत्री समीर थोडगे यांच्या नेतृत्वात पार पडली. यात्रेच्या विविध टप्प्यांवर विद्या भारतीचे अखिल भारतीय उपाध्यक्ष अवनीश भटनागर, मध्यभारत प्रांताचे संघटन मंत्री निखिलेश माहेश्वरी, सहसंघटन मंत्री अनिल अग्रवाल तसेच भाऊसाहेब भुस्कुटे लोक न्यास समितीचे प्रबंधक हेमेंद्र गुर्जर व जनजाती शिक्षाचे अखिल भारतीय सह संयोजक बुधपाल सिंह यांचे मार्गदर्शन लाभले.

गोविंद नगर येथे झालेल्या समारोप कार्यक्रमात सर्व कार्यकर्त्यांनी आपले अनुभव कथन करताना या यात्रेला केवळ अभ्यास यात्रा न मानता, ती आत्मिक, बौद्धिक आणि संघटनात्मक नवचेतना घडवणारी यात्रा ठरल्याचे मत व्यक्त केले. (तभा वृत्तसेवा)

# विरोधकांच्या गदारोळामुळे लोकसभेचे कामकाज स्थगित

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**
बिहारमधील मतदार यादी पुनरीक्षणाच्या मुद्यावरुन झालेल्या गदारोळामुळे आधी दोनवेळा स्थगित झालेले लोकसभेचे कामकाज नंतर दिवसभरासाठी स्थगित करावे लागले.

दोन स्थगित झाल्यानंतर दुपारी ३ वाजता लोकसभेचे कामकाज सुरु होताच विरोधी सदस्य हातात पोस्टर्स घेऊन अध्यक्षांसमोरील मोकळ्या जागेत आले आणि जोरदार घोषणा देऊ लागले. या गोंधळातच तालिका अध्यक्ष कृष्णप्रसाद तेन्नटी यांनी सभागृहाचे कामकाज चालवण्याचा प्रयत्न केला. तुमचे म्हणणे ऐकण्याला मी तयार आहे, पण तुम्ही घोषणा थांबवत आधी आपल्या जागेवर जा, असे आवाहन ते करत होते , पण सदस्य ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. नियमानुसार सरकार तुमच्या सर्व मुद्यांवर चर्चा करायला तयार आहे, असे ते सांगत होते. (तभा वृत्तसेवा)

# ...तर मुली पिसाटांच्या भक्ष्यस्थानी पडतील

### संमतीच्या वयाबाबत केंद्राची भीती

### सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र सादर



**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**
लैंगिक संबंधांसाठी संमतीचे वय १८ वर्षावरून १६ केले तर तरुण मुली त्यांच्या कुटुंबात आणि बाहेरील भक्षकांचे बळी ठरतील, अशी भीती केंद्राने व्यक्त केली आहे. पण कथित बलात्कार हा प्रत्यक्षात किशोरवयीन मुलांमधील प्रेमसंबंध होते की नाही हे ठरवण्यासाठी न्यायालये न्यायालयीन विवेकाचा वापर करू शकतात, ज्यामध्ये सौम्यता दाखवता येते, असेही सरकारने नमूद केले आहे.

केंद्राने न्यायालयाला सांगितले की, किशोरवयीन प्रेमसंबंधामुळे संमतीचे वय कमी करणे अथवा अपवाद निर्माण करणे हे केवळ कायदेशीरदृष्ट्या अयोग्यच नाही तर धोकादायकदेखील ठरू शकते. असे केल्याने मुलांचे लैंगिक शोषण करणाऱ्यांना बचावाचा मार्ग मिळेल. अशाने मुलांच्या भावनेचा अथवा त्यांच्या परिस्थितीचा फायदा घेणाऱ्यांना संरक्षण मिळेल. सरकारच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी हे उत्तर सादर केले आहे.

काही प्रकरणात भावनिक आकर्षण अथवा कुतूहलापोटी किशोरवयीन मुले प्रेमसंबंध अथवा शारीरिक संबंध ठेवू शकतात. अशा घटनांची प्रकरणनिहाय न्यायालयांनी काळजीपूर्वक चौकशी करायला हवी. अशावेळी न्यायालये त्यांचा विवेक आणि तथ्यांच्या आधारावर निर्णय घेऊ शकतात. पण, सरकारने असेही स्पष्ट केले आहे की, संमतीचे वय कमी करण्याबाबत संसदेत कायदा आणण्याचा त्यांचा कोणताही हेतू नाही. न्यायिक विवेकाचा वापर करणे आणि कायद्यामध्ये बदल करणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. जर कायद्यात बदल करून काही प्रकरणांमध्ये सुट दिली तर मुलांना संरक्षण देणारे नियम कमकुवत होतील. जे मुलांना लैंगिक शोषणापासून संरक्षण प्रदान करतात. (वृत्तसंस्था)

# मोर्शी एसडीओंची बंदूक चोरीला

### गाडीची काच फोडली


**मोर्शी, ८ ऑगस्ट**
येथील उपविभागीय अधिकारी महसूल प्रदीप पवार यांच्या घरी चोरी झाली असून, चोरट्याने रिव्हॉल्वर चोरून नेल्याची घटना शुक्रवारी उघडकीस आली. घटनास्थळी पोलिस दाखल झाले होते.

शुक्रवारी सायंकाळी प्रदीप पवार यांचा शिपाई शासकीय निवासस्थानी आले. त्यावेळी त्यांना घरच्या दरवाजाचे कुलूप तोडलेले दिसले. त्यांनी याबाबतची माहिती पवार यांना दूरध्वनीवरून दिली. ते वरुड येथील कार्यालयीन कामकाजाकरिता गेले होते. घरात चोरी झाल्याची माहिती मिळताच लगेच त्यांनी निवासस्थानी येऊन घराची पाहणी केली. घरातले साहित्य विखुरलेले होते.

अज्ञात चोरट्यांनी पवार यांच्या खाजगी गाडीच्या डाव्या बाजूच्या दरवाजाचे काच फोडून त्यातील बंदूक चोरून नेल्याचे समोर आले. घटनास्थळी उपविभागीय पोलिस अधिकारी रवींद्र खांडेकर, पोलिस निरीक्षक राहुल आठवले व गुन्हे शाखेच्या पथक दाखल झाले होते. पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होती. (तभा वृत्तसेवा)

# मजा, मस्ती, धमाल घेऊन येतोय् सिद्धार्थ जाधव

### 'आता होऊ दे धिंगाणा'चा चौथा सीझन आजपासून



**मुंबई, ८ ऑगस्ट**
'आता होऊ दे धिंगाणा'च्या तिन्ही पर्वांना प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिले. रोजच्या धकाधकीच्या जीवनात निखळ मनोरंजनाचे क्षण घेऊन येणारा हा कार्यक्रम फक्त महाराष्ट्रातच नाही तर सातासमुद्रापलीकडेही आवडीने पाहिला जातो. प्रेक्षकांचा हा लाडका कार्यक्रम चौपट मजा आणि चौपट धमाल घेऊन पुन्हा धिंगाणा घालण्यासाठी सज्ज झालाय. ९ ऑगस्टपासून रात्री ९ वाजता 'आता होऊ दे धिंगाणा'चे चौथे पर्व सुरू होत आहे.

चौथ्या पर्वात प्रेक्षकांना थीमपार्कची जादू अनुभवता येणार आहे. थीमपार्क मध्ये ज्याप्रमाणे अद्भूत आणि अविश्वसनीय गोष्टींची सफर घडते अगदी त्याप्रमाणेच धिंगाणाचा मंच भन्नाट गेम्सच्या माध्यमातून मनोरंजनाची धमाल सफर घडवणार आहे. मागच्या पर्वात सुपरहिट ठरलेल्या स्मायली काय गायली, धुऊन टाक, गोरी गोरी पान गाते किती छान या सुपरहिट फेऱ्या नव्या ट्विस्टसोबत या पर्वातही असणार आहेत. एनर्जेटिक सुपरस्टार आणि सर्वांचा लाडका होस्ट आणि दोस्त सिद्धार्थ जाधव या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुन्हा एकदा धिंगाणा घालण्यासाठी सज्ज आहे. चौथ्या पर्वाविषयी सांगताना सिद्धार्थ जाधव म्हणाला, तुमचा कार्यक्रम कधी बंद होणार यापेक्षा तुमचा कार्यक्रम कधी सुरू होतोय याची जेव्हा प्रेक्षकांकडून विचारणा होते तेव्हा तेच त्या कार्यक्रमाचं यश असतं. मी स्वप्नातही विचार केला नव्हता की इतकं यश आता होऊ दे धिंगाणाला मिळेल. या कार्यक्रमाचा चौथा सीझन करताना अतिशय आनंद आणि अभिमान वाटतोय. वा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अग्रलेख...

# शेतकरीहितैषी मोदी

शेतकरी, मासेमार आणि दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताशी सरकार कधीच तडजोड करणार नाही, यासाठी वाट्टेल ती किंमत चुकवायची माझी तयारी आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले. देशातील कृषी क्रांतीचे प्रणेते डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राजधानी दिल्लीत आयोजित त्रिदिवसीय संमेलनाचे उद्‌घाटन करताना मोदी यांनी देशातील शेतकऱ्यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे असल्याचा निर्वाळा दिला. मोदी यांचे हे विधान देशातील शेतकऱ्यांना दिलासा देणारे आणि त्यांच्या आशा-अपेक्षा उंचावणारे म्हटले पाहिजे. भारत हा कृषिप्रधान देश असल्याचे म्हटले जाते. शेतकऱ्यांचा उल्लेख 'बळीराजा' असा केला जातो. काही जण शेतकऱ्यांना 'अन्नदाता' असेही म्हणतात. शेतकरी जर शेतात राबला नाही तर आपल्याला पोटभर खायला मिळणार नाही. देशातील १४० कोटी जनतेला पोटभर खायला मिळावे म्हणून शेतकरी दिवसरात्र आपल्या शेतात राबत असतो, काबाडकष्ट करीत असतो. दुसऱ्याला पोटभर अन्न मिळावे म्हणून त्याला वेळप्रसंगी अर्धपोटी राहावे लागते. देशात आतापर्यंत होऊन गेलेल्या राज्यकर्त्यांच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांवर ही वेळ आली, असे दुर्दैवाने म्हणावे लागते. बळीराजा म्हणवणाऱ्या शेतकऱ्यांचा बळी सरकारी चुकीच्या धोरणामुळे जाऊ लागला.

आपली अर्थव्यवस्था कृषिआधारित आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १८ टक्के आहे. देशातील जवळपास अर्धी म्हणजे ४४ टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील ७० टक्के अर्थव्यवस्था कृषी आणि त्याच्याशी संबंधित उद्योगांवर अवलंबून आहे. तरीसुद्धा आमच्या देशाच्या आतापर्यंत होऊन गेलेल्या धोरणकर्त्यांनी कृषी क्षेत्राकडे पाहिजे तसे लक्ष दिले नाही; त्याकडे दुर्लक्ष केले, असे अतिशय खेदाने आणि नाईलाजाने म्हणावे लागते. २०१५-१६ मध्ये कृषी क्षेत्रात झालेल्या जनगणनेनुसार देशातील ८६ टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत, म्हणजे त्यांच्याकडे २ हेक्टरपेक्षाही कमी शेतजमीन आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती दयनीय झाली आहे. गेल्या काही वर्षांत देशात सर्वाधिक आत्महत्या या शेतकऱ्यांच्या आहेत. आत्महत्या हा कोणत्याही समस्येवरचा उपाय नाही; उलट आत्महत्येने आहे त्या समस्या आणखी गंभीर रूप धारण करत असताना शेतकरी आत्महत्या करतात, याचाच अर्थ त्यांच्या जीवनातील सर्व उमेद संपली असणार, ते आपल्या आयुष्याला कंटाळले असणार, असा काढायला हरकत नाही. कोणीही आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय सहजासहजी घेत नाही. जगण्याचे सर्व मार्ग बंद झाल्यानंतर नाईलाजाने या मार्गाची निवड केली जाते. मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्या पूर्णपणे थांबल्या नसल्या तरी कमी मात्र झाल्या आहेत, हे मान्य केलेच पाहिजे. ५६ इंची छातीवाल्या मोदी यांची ही मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. शेतकऱ्यांची स्थिती 'आई जेवू घालिना आणि बाप भीक मागू देईना' अशी असते. म्हणजे शेतीतून त्याला चटणी-भाकरी खाऊ शकेल, एवढेही उत्पन्न मिळत नाही. बाहेरूनही कोणी त्याला मदत करत नाही. परिणामी शेतकऱ्याला ताठ मानेने आणि स्वाभिमानाने जगता येत नाही. देशातील कोणत्याही वस्तूच्या उत्पादकाला जो तयार करत असलेल्या वस्तूची किंमत ठरवण्याचा अधिकार असतो. वस्तूच्या उत्पादनासाठी येणारा खर्च, वाहतूक खर्च, सर्व प्रकारचे सरकारी कर, वितरकाचा तसेच स्वतःचा नफा धरून उत्पादक त्या वस्तूची विक्री किंमत ठरवत असतो. पण हे स्वातंत्र्य आणि अधिकार शेतकऱ्यांना नाही. शेतकरी आपल्या शेतात पिकवत असलेल्या कृषी उत्पादनाची किंमत शेतकरी नाही तर सरकार ठरवत असते. शेतकऱ्यावर पहिला अन्याय याच ठिकाणी होत असतो. शेतकऱ्यांकडून किमान हमी भावात एखादे कृषी उत्पादन घेतल्यानंतर बाजारात ते किती किमतीत विकले जाते, यातील तफावत लक्षात घेतल्यावर शेतकऱ्यांची कशी लूट होत आहे, हे आपल्या लक्षात येईल. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने अनेक निर्णय घेतले गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी पंतप्रधान किसान सन्माननिधीसारखी योजना सुरू केली. ही योजना देशभरात यशस्वीपणे आणि प्रभावीपणे राबविली जात आहे. या योजनेत देशातील शेतकऱ्यांना दर तीन महिन्यांनी दोन हजार रुपये दिले जातात. या योजनेतील विसावा हप्ता नुकताच वाराणसी येथे आयोजित कार्यक्रमात मोदी यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने मोदी सरकारने अनेक निर्णय घेतले. अनेक पिकांच्या किमान हमी रकमेत (एमएसपी) लक्षणीय वाढ केली. ज्यांच्या नावाने आयोजित कार्यक्रमात मोदी यांनी शेतकऱ्यांच्या हिताशी कदापि तडजोड करणार नाही, अशी खात्री दिली, ते डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांना शेतकऱ्यांचे हितचिंतक म्हटले पाहिजे. एमएसपीची संकल्पना ही डॉ. स्वामीनाथन् यांचीच म्हटली पाहिजे. कृषी उत्पादनाची किंमत ठरवताना त्यात उत्पादन खर्चासोबत किमान ५० टक्के नफाही जोडला पाहिजे, हा आग्रह डॉ. स्वामीनाथन् यांनी धरला होता आणि सरकारला तो मान्य करावा लागला होता. स्वामीनाथन् यांनी देशात खाद्यान्न सुरक्षेचा आग्रह धरला; एवढेच नाही तर कृषी क्षेत्राला आत्मनिर्भर करण्यासाठी अनेक पावले उचलली. गहू आणि तांदळाचे हेक्टरी उत्पन्न वाढवणारे वाण विकसित केले. यामुळे देशातील अन्नधान्याचा दुष्काळ नेहमीसाठी संपला. कृषी उत्पादनात भारत आत्मनिर्भर झाला. अमेरिका आणि अन्य पाश्चात्त्य देशांचे हेच खरे दुखणे आहे. कधीकाळी आपल्याला अमेरिकेतून तेथील जनावरेही खात नव्हती, अशा निकृष्ट प्रतीच्या धान्याची म्हणजे मिलोची आयात करावी लागली होती. देशातील शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी मोदी अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राला टक्कर देत आहे. दूध, डाळी आणि ज्यूट उत्पादनात भारत जगात आघाडीवर आहे तर गहू, तांदूळ, कापूस, फळ आणि भाज्यांच्या उत्पादनात जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हडेलहप्पी करत भारतावर आधी २५ आणि नंतर पुन्हा २५ असा ५० टक्के आयात कर लादला आहे. याचा सरळ फटका भारतातील कृषी क्षेत्राला आणि शेतकऱ्यांना बसणार आहे. म्हणजे आम्ही भारतातून जी कृषी उत्पादने अमेरिकेला पाठवू, त्यांच्या किमती तेथे ५० टक्क्यांनी वाढणार आहेत. याचा अर्थ आम्ही आज जे कृषी उत्पादन अमेरिकेत १०० रुपयात पाठवत होतो, त्यासाठी आता १५० रुपये खर्च करावे लागणार. परिणामी या कृषी उत्पादनांच्या अमेरिकेतील किमती वाढतील, त्या महाग होतील. एखादी वस्तू महाग झाल्यावर त्याची मागणी कमी होते. मागणी कमी झाल्यावर त्याची आपल्या देशातून होणारी निर्यात कमी होईल. अमेरिकेला आपल्या देशातील कृषी उत्पादन आणि दुग्ध उत्पादनासाठी भारतीय बाजारपेठ हवी आहे. त्यामुळे अमेरिकेतून भारतात येणारा मका, सोयाबीन, सफरचंद, बदाम आणि इथेनॉलवरील आयात कर कमी करण्याची मागणी अमेरिका करत आहे. अमेरिकेतील कृषी उत्पादन जेनेटिकली मोडिफाईड (जीएम) आहेत आणि भारतात अशा प्रकारच्या कृषी उत्पादनावर बंदी आहे. त्यामुळे अमेरिकेतील जीएम कृषी उत्पादनाच्या आयातीला भारत परवानगी देऊ शकत नाही. अमेरिकेतील दुग्ध उत्पादनातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तेथे जनावरांना चाऱ्यातून मांसाहार दिला जातो. आपल्या देशात दूध हे पूर्णपणे शाकाहारी समजले जाते. कारण आपल्याकडे पशू म्हणजे गायी आणि म्हशी चारा खातात, तर अमेरिकेत तेथील गायी-म्हशींना चाऱ्यातून मांसाहार दिला जात असल्यामुळे त्यांचे दूध भारतीय मानसिकतेला पचणारे नाही. आपल्याकडच्या सर्व धार्मिक विधीत आपण दुधाचा तसेच दुग्धजन्य उत्पादनाचा वापर करीत असतो. त्यामुळे अमेरिकेतील दूध भारतात आले तर आपल्या धार्मिक भावनांना धक्का बसू शकतो आणि ट्रम्प तर यासाठी अडून बसले आहेत. त्यामुळेच भारतातील शेतकऱ्यांच्या हिताशी कोणतीही तडजोड करणार नाही; त्यासाठी कोणतीही किंमत मोजायची माझी तयारी आहे, असे मोदी यांना सांगावे लागले. मोदी देशाचे पंतप्रधान आहेत, तोपर्यंत शेतकऱ्यांच्या हितसंबंधांना धक्का लागणार नाही आणि देशाच्या प्रतिष्ठेला, स्वाभिमानाला आणि आत्मसन्मानाला तडा जाणार नाही, याबाबत शंका नाही.

## यंगिस्तान

# समता आणू समरसतेतून...

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

२ आणि ३ ऑगस्ट २०२५ या दोन दिवसांत श्री गुरुगोविंदसिंगजी साहित्यनगरी, भक्ती लॉन्स, मालेगाव रोड, नांदेड या सांस्कृतिक भूमीवर एक वेगळा, विचारस्पर्शी आणि हृदयाला भिडणारा साहित्यिक सोहळा साकारला गेला - २० वे समरसता साहित्य संमेलन! हे संमेलन म्हणजे केवळ व्यासपीठावर साहित्यिक भाषणांचा कार्यक्रम नव्हता, तर तो सामाजिक संवाद, बंधुत्व, समता, समरसता यांचे भावविश्व मांडणारा आणि साहित्यिक आकर्षणांनी परिपूर्ण असलेला अनुभवही होता. या साहित्य संमेलनाचा विषय होता 'नव्वदोत्तर काळातील साहित्य आणि समरसता.' या दोन दिवसांत साहित्यिक, कवी, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत आणि रसिक प्रेक्षक एकत्र आले आणि सर्जनशील, विचारप्रवृत्त चर्चांनी समाजाला संवादाच्या व समरसतेच्या माध्यमातून एक नवी दिशा दिली. पद्मश्री नामदेव कांबळे हे संमेलनाध्यक्ष होते, ज्यांची साहित्यसेवेतील निष्ठा आणि सामाजिक संवेदनशीलता दोन्हीच समर्पक ठरतात. तसेच खासदार डॉ. अजित गोपछडे हे स्वागताध्यक्ष होते, ज्यांनी आयोजनाला सामाजिक पातळीवर महत्त्वपूर्ण पाठबळ दिले. विशेष म्हणजे या संमेलनाला संत श्री बाबा बलविंदरसिंगजी यांचे आशीर्वचन लाभले. या साहित्य संमेलनात मी 'नव्वदोत्तर काळातील मराठी चित्रपट, कथा, नाटक इत्यादी माध्यमातून दलित, वंचित व महिलांचे चित्रण' या विषयावर भाषण केले.




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला सन्मानाने जगण्याचा मंत्र दिला आणि त्या मंत्राचा जप करत आपण अथक प्रयत्नाने समाजात सन्मानाने उभे आहोत. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र म्हणजे पाठीवर हात ठेवून लढायला प्रवृत्त करणारा महामंत्र आहे. संमेलनाचे उद्‌घाटन भदंत डॉ. राहुल बोधी महाथेरो यांच्या हस्ते होणार होते. मात्र, समाजातील विघातक लोकांच्या धमक्यांमुळे ते संमेलनात उपस्थित राहू शकले नाहीत, अशी चर्चा सामाजिक पटलावर होत आहे. या संमेलनाला विघ्नसंतोषी लोकांनी जरी विरोध केला, नांदेडमध्ये हे संमेलन होऊ देणार नाही अशा थेट धमक्या दिल्या, तरी आयोजकांनी अतिशय सज्जनतेने याकडे दुर्लक्ष केले आणि विघातक घटकांचा विरोध न करता आपली रेष मोठी केली आणि संमेलन व्यवस्थित व सुरक्षित पद्धतीने पार पाडले. यासाठी पोलिसांचे आभार मानावे लागेल. पद्मश्री नामदेव कांबळे यांचे अध्यक्षीय भाषण अतिशय सुरेख झाले. त्यासोबत सर्वच मान्यवर-वक्त्यांची भाषणे उत्तम झालीत. डॉ. ईश्वर नंदापुरे आणि डॉ. प्रसन्न पाटील यांच्या भाषणांमुळे एक वैचारिक बैठक प्राप्त झाली. या संमेलनात अनेक सामाजिक कार्यकर्ते व विचारवंतांनी उपस्थिती लावली. शेषराव मोरे, रमेश पांडव, गिरीश प्रभुणे, रमेश महाजन अशा दिग्गजांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला शोभा आली. संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे शिस्त आणि उत्कृष्ट आयोजन. या संमेलनाचे आयोजक समरसता साहित्य परिषदेच्या कार्यकर्त्यांनी आयोजनात कोणतीही उणीव ठेवली नाही. ट्रेन व बसमधून नांदेड येथे उतरलेल्या सर्वांचे स्वागत करण्यापासून त्यांना हॉटेलमध्ये सोडण्यापर्यंत, त्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेपासून जेवण, चहापान व अगदी लहानसहान प्रत्येक गोष्टीपर्यंत कार्यकर्त्यांनी काळजी घेतली. पहाटेपासून रात्रीपर्यंत हे कार्यकर्ते आयोजन व्यवस्थित होईल याकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष देत होते. ते रात्री झोप घेत होते की नाही, असाही प्रश्न आपल्या मनात येतो. कारण इतकं सुंदर नियोजन त्यांनी केलं होतं. ही ऊर्जा त्यांना कुठून मिळाली, असा प्रश्न मनात येताच उत्तरही सापडते की, समरसता या शब्दांतच किती क्षमता आहे! समाजाला समरस करण्याची ही भावनाच किती अद्‌भुत आहे की तुम्ही तहान-भूक विसरून तल्लीन होऊन कार्यमग्न होता.

संमेलनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे किन्नर समाजाने हे संमेलन पार पाडण्यासाठी विशेष पुढाकार घेतला. 'किन्नर विकास परिषदे'च्या माध्यमातून हा समाज मुख्य प्रवाहात विहार करत आहे. या संमेलनात त्यांनी कार्यकर्ता म्हणून आपली भूमिका बजावलीच; त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येही सहभाग नोंदवला. नृत्य, कविता या माध्यमातून किन्नर समाजाने आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली आणि उपस्थित लोकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचा सन्मान केला. त्यामुळेच हे साहित्य संमेलन समाजातील प्रत्येक स्तरातील घटकाला जोडणारे होते. 'समरसता साहित्य संमेलनात सहभागी होणाऱ्याला बुटाने हाणा' अशी हीन भाषा काहींनी वापरली. आयोजकांवर गलिच्छ आरोप केले. पण जेव्हा तुम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गौतम बुद्ध यांच्या विचारांवर चालत असता तेव्हा या समाजविघाती प्रवृत्तींकडे लक्ष न देता समरस होऊन अविरतपणे प्रवास करत राहता.

या संमेलनाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे भाषणांमध्ये, चर्चासत्रांमध्ये आणि कविता वाचनामध्ये मूल्याधिष्ठित साहित्यिक विचारसरणीचा अभूतपूर्व प्रत्यय आला. साहित्य हे केवळ शब्दांचे जग नसून ते भावना, वेदना आणि वास्तवाचा आरसा दाखवणारे असते. या संमेलनाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना समरस करण्याची भावना प्रतिबिंबित झाली. या सर्व भाषणांमध्ये विरोधाचा सूर नव्हता तर समाज जोडणारी भावना होती. भिन्न मत, भिन्न पक्षांना एकत्र आणून संवादातून समरसता निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली. 'समरसता साहित्य संमेलन २०२५' ही फक्त साहित्याची मैफिल नव्हती, तर संवादातून समाज जोडण्याची भावना, विघातक धमक्यांना आणि विरोधांना सामोरे जाण्याची शांत पण दृढ प्रेरणा, सकारात्मकतेचा निश्चय आणि समता आणण्यासाठी समरसतेचा महायज्ञ होता. या संमेलनाचा भाग होण्याची संधी मला मिळाली याबद्दल मी कृतज्ञ आहे.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# भूतदया अंगीकारा; पण सांभाळून

भूतदया पाळली पाहिजे, असे आपल्या संस्कृतीमध्ये म्हटले आहे. याचा विचार केला तर प्राणिमात्रांवर दया केलीच पाहिजे. म्हणजे त्यांना विनाकारण मारू नये. शिकार करू नये. प्राण्यांचा छळ होईल, अशी वागणूक देऊ नये. हे सर्व म्हणजे भूतदयाच आहे.

पण, आपण याचा वेगळा अर्थ लावून एकप्रकारे प्राणी आणि मानव या दोघांच्याही आरोग्याला अपायकारक असे कृत्य करतो. सुट्यांमध्ये आपण काही लोक जंगल सफारीला जातो. जंगलात असलेल्या विविध प्राण्यांना आपल्याकडील अन्नपदार्थ खायला घालतात. वास्तविक जंगलात किंवा अभयारण्यात वन्यजीव संरक्षण विभागाने ठिकठिकाणी जंगलातील प्राण्यांना आपल्याकडील अन्नपदार्थ खायला घालू नये, अशा सूचना असलेले फलक लावलेले असतात. तरीही आपण आपल्या मुलांना गंमत वाटावी म्हणून माकड किंवा पक्ष्यांना आपल्याकडील अन्नपदार्थ खायला देतो. तसेच, अभयारण्याच्या प्रवेशद्वारावरच आपल्याकडील अन्नपदार्थ काढून ठेवण्याची व्यवस्था केलेली असते. तरीही काही जण ते लपवून जंगलात आपल्या सोबत नेतात. ते नेण्यासाठी प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर केला जातो. त्यातील पदार्थ संपल्यावर त्या पिशव्या जंगलातच टाकून दिल्या जातात. त्या पिशव्यांना अन्नाचा वास लागलेला असतो. त्यामुळे अनेकदा जंगली प्राणी त्या पिशव्या खातात. त्यामुळे अनेकदा त्यांचा मृत्यू होतो. प्राण्यांना खाऊ घालणे. त्यांच्यासाठी घराच्या परसबागेत किंवा व्हरांड्यात पाण्याची व्यवस्था करणे यामागची भावना चांगली आहे. उन्हाळ्यात अनेक संस्था-संघटना पक्ष्यांसाठी बर्ड फिडिंग किंवा पाणी पात्राचे वितरण करतात. पशुपक्षी वाचावे, हा त्यामागचा त्यांचा उदात्त उद्देश असतो. कारण पक्ष्यांचे खाद्य मुख्यत: कृमी, कीटक, अळ्या हेच असते. पक्षी वाचले तर या कीटकांपासून पिकांचे होणारे नुकसान टाळता येते. पक्षी शेतातील कृमी-कीटक खातात. शेती आणि शेतकऱ्यांसाठी ते लाभदायकच ठरते. सकाळी घराच्या अंगणात आपण ठेवलेल्या पाणीपात्र आणि धान्य खाण्यासाठी पक्षी जमल्यामुळे त्यांचा किलबिलाट कानाला आल्हाददायक वाटतो. त्यामुळे मन प्रसन्न होते. सकाळी सकाळी पक्ष्यांचा किलबिलाट ऐकल्याने हृदयविकाराचा धोका कमी होतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. पण, काही पक्ष्यांपासून मानवाला गंभीर आजार जडण्याची शक्यता देखील असते. आपल्या घराच्या भोवती कबूतर जास्त संख्येत वास्तव्य करीत असतील तर त्यापासून धोका निर्माण होण्याची शक्यता असते. कारण, त्यांच्या शरीरातून एक विशिष्ट प्रकारचा भुगा (पावडर) हवेत पसरते. त्यामुळे मनुष्याला श्वसनाचे आजार जडण्याची शक्यता असते. कुत्र्यांपासूनही मानवाला अपाय होऊ शकतो. कुत्रा इमानदार प्राणी असल्याने आपण त्यांना पाळतो. पण, कुत्र्यांपासून रेबीज हा आजार होण्याची शक्यता असते. लेप्टोस्पायरोसिस हा आजार कुत्र्यांच्या मूत्रातून पसरणाऱ्या जीवाणूंमुळे होतो. खरुज हा त्वचारोग होऊ शकतो. खामगावात तीन महिन्यात भटक्या कुत्र्यांनी ५८ जणांना चावा घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. निसर्गाने प्रत्येक प्राण्याला जन्म देताना त्याचे अन्नदेखील निर्माण केले आहे. वन्यप्राण्यांना आपण खातो ते धान्य किंवा अन्नपदार्थ खाऊ घालण्याची गरज नसते. माणसाने जास्त जेवण केले की अजीर्ण होते. त्यामुळे पोटाचे विकार जडतात. त्याचप्रमाणे पक्ष्यांना एकच धान्य खाऊ घातले तर त्यांनादेखील ते पचत नाही. खरे म्हणजे आपण खातो ते धान्य त्यांना केवळ १० ते २० टक्केच हवे असते. त्यांचे खाद्य ते स्वत:च शोधतात. कृमी-कीटक खाऊन ते जगतात. त्यांना जर आयते खाद्य मिळू लागले तर त्यांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होईल. आज जंगलात किंवा शेतशिवारात हरणांचे कळप, माकडांच्या टोळ्या दिसतात. हरणाचा कळप एखाद्या शेतात घुसला की पिकांचे नवीन कोंब फस्त करतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. परंतु, शेतात बाराही महिने पीक नसते. त्यामुळे त्यांना त्यांचे अन्न शोधावे लागते. आपण त्यांना जर खाऊ घातले तर त्यांचे आयुष्यमान वाढून त्यांची संख्या भरमसाट वाढेल. एकंदर विचार केला तर प्राणी, पशू, पक्षी हे निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे त्यांचे रक्षण आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांच्यापासून मानवालादेखील अपाय होऊ शकतो. मानवी जीवन धोक्यात येऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या मनात भूतदया असलीच पाहिजे. मुक्या प्राण्यांचा कोणी छळ करीत असेल तर त्याविरुद्ध आवाज उठवलाच पाहिजे. वन्यप्राण्यांची शिकार करू नये आणि कोणालाच करू देऊ नये. पिसाळलेला कुत्रा, नरभक्षी वाघाचा बंदोबस्त केलाच पाहिजे. प्राणिमात्रांवर दया करताना ते आपल्या जिवावर उठणार नाहीत आणि आपल्यापासूनही त्यांच्या जिवाला धोका पोहोचणार नाही, याचे तारतम्य राखून प्रत्येकाने भूतदया अंगीकारावी.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

# गोंधळलेले गोंधळी!

**नागेश दाचेवार**

रोज उठायचं आणि रोज सकाळी सकाळी निराधार आरोप करायचे अशी सवय जडलेल्या दोन व्यक्ती आपल्या समाजात वावरत आहेत. एकाचा देशात तर दुसऱ्याचा राज्यात वावर नव्हे उपद्व्याप चालला आहे. तेच ते अर्थहीन आरोप करताना यांना कंटाळादेखील येत नाही. याचेच नवल आहे. सातत्याने अपयश पदरी पडत असल्याने कदाचित मानसिक संतुलनात फरक पडला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, देशात वावर असलेल्या व्यक्तींकडे बरेच विचारी आणि समज असलेले लोक आहेत. त्यांच्याकडून माहिती घेतल्यास अशा तोंडावर आपटण्याच्या घटना किमान टळतील. प्रत्यक्षात दोन्ही उपद्व्यापी लोक आणि त्यांचे नेते, कार्यकर्ते यांच्या लक्ष्यावर निवडणूक आयोग, न्यायालये, केंद्रीय यंत्रणा असतात. हे करत असताना सगळी मंडळी कोणतेही पुरावे देणार नाहीत. न्यायिक प्रक्रिया अवलंबणार नाही, वैधानिक मार्ग स्वीकारणार नाही. केवळ रस्त्यावर उतरून छाती तेवढी बडवणार. साहेबांना देशात कोणी विचारत नाही म्हणून ते अमेरिकेत जाऊन ऊर बडवतात. आता नुकतीच इंडिया आघाडीची बैठक झाली यातदेखील पुढील निवडणुकांची रणनीती ठरवायची सोडून पुन्हा एकदा ईव्हीएम आणि मतदारयादी घोटाळ्याचा राग आलापला. त्यामुळे धन्य तो विरोधी पक्ष आणि धन्य त्यांचे नेते. असेच म्हणावे लागेल.

यांच्या बौद्धिक दिवाळखोरीची अनेक उदाहरणे आहेत. रोगावर उपचार करण्याऐवजी, बाकी साऱ्या गोष्टी हे लोक करतात. मात्र, रोग बरा व्हावा यासाठी प्रयत्न करावे असे यांना कधीही वाटले नाही. त्यामुळे निवडणुका जिंकण्यासाठी काय करावे आणि निवडणुका आपण सतत का हरत आहोत? याची कारणमीमांसा करावी याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. यांच्यातला बुद्धिभेद कधी, संपेल असे वाटत नाही. नुकताच एक आरोप केला जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजपा घेत नाही.

निवडणुका घ्यायला घाबरत आहे. त्याचवेळी निवडणूक आयोगात आपली माणसे बसवून ईव्हीएम घोटाळा करून भाजपा निवडणुका जिंकते, असा दुसरा आरोप केला जात आहे. यापूर्वी महाराष्ट्रात ईव्हीएम घोटाळा



करून भाजपा जिंकली असा आरोप सातत्याने केलाच जात असतो. यातून यांच्या बुद्धीची प्रचीती येते. कुठल्यातरी एका गोटीवर ठाम राहिले पाहिजे. परस्परविरोधाभासी असे वक्तव्य हे लोक स्वतःच करतात. भाजपा जर ईव्हीएम घोटाळा करूनच निवडणुका जिंकते तर, मग त्यांना निवडणुकांची भीती कसली? ते तुम्हाला आणि निवडणुकांना का घाबरतील?, त्यांचा तर विजय पक्काच आहे. प्रशासकाच्या माध्यमातून लूट करण्यापेक्षा स्वतःच्या कार्यकर्त्यांना सोयीचा मार्ग उपलब्ध करून देण्यात भाजपाचा तोटा कुठे आहे? मुळात कुठलीतरी एक गोष्ट शक्य होऊ शकते. ती म्हणजे भाजप पराभवाच्या भीतीने निवडणूक आयोगाला हाताशी धरून निवडणुका लांबणीवर टाकत असेल. तर तो ईव्हीएम मॅनेज करत नाही असा त्याचा सरळसोपा अर्थ होतो. आणि ईव्हीएम मॅनेज करत असेल तर मग निवडणुका लांबणीवर टाकण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे गोंधळ मांडलेल्या या गोंधळींना स्वतःचा गोंधळ दूर करून नेमकं म्हणायचं काय ते स्पष्ट करणं गरजेचं आहे.

ईव्हीएम मशीन म्हणजे जगातल्या लोकशाहीतील सर्वांत मोठा घोटाळा असल्याचा आणखी नवा एक आरोप केला जात आहे. खरं तर निवडणूक आयोगाने जेव्हा ईव्हीएम हॅक करून दाखविण्याचे आव्हान दिले तेव्हा ईव्हीएमवर आगडोंब उसळवणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाने आव्हान स्वीकारले नाही. नुकतेच बिहार मतदारयादी अद्ययावतीकरण सुरू असताना निवडणूक आयोगाने काही आक्षेप असल्यास कळविण्यास सांगितले, तेव्हा बिहारमध्ये आयोग घोळ करत असल्याचा डांगोरा पिटणाऱ्या विरोधी पक्षापैकी एकानेही अजूनपर्यंत एकही आक्षेप घेतलेला नाही. केवळ प्रसारमाध्यमांमधून आणि समाजमाध्यमांमधून समाजात संभ्रम पसरविण्यासाठी खोटे आरोप करत हे लोक फिरताना दिसतात. प्रत्यक्षात जर ईव्हीएम, निवडणूक आयोग आणि भाजपाच्या भूमिकेसंदर्भात जर या लोकांना खात्रीलायक माहिती असेल तर, मग विरोधकांना अर्थात ज्यांना भाजपा ईव्हीएम घोटाळा करते अशी खात्री असलेल्यांनी निवडणुकांच लढू नये.

जेव्हा तुम्हाला जिंकूच दिले जाणार नसेल तर, उगाच निवडणुका लढून पैसा आणि शक्ती दोन्ही खर्च करणे व्यर्थ आहे. पण नाही हे निवडणुका लढणार यांच्या मस्तीने ते हरणार आणि मग ईव्हीएमच्या, भाजपाच्या, निवडणूक आयोगाच्या नावावे रुदाली करणार. सध्या काम नसल्याने यांचा हा धंदा झाला आहे. काहीही केलं यांनी तरी यातदेखील विरोधाभास आहे. प्रत्येक निवडणुकीत यांचे काही लोक निवडून येतात, याचा अर्थ या लोकांनी ईव्हीएम हॅक करून विजय मिळवलाय का? असा प्रश्न निर्माण होतो? मग तेथील ईव्हीएम का हॅक केली नाही भाजपाने, वरुण सरदेसाई, आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, सुनील राऊत, सुनील प्रभू त्यातल्यात्यात एकनाथ शिंदेंना धोका देणारे नितीन देशमुख यांच्यासह एकूण २० आमदार ठाकरेंच्या पक्षाचे, काँग्रेसच्या, शरद पवारांच्या निवडून आलेल्या आमदारांनी कसा विजय संपादित केला? या प्रश्नाचे उत्तर यांच्याकडे असेल तर त्यांनी द्यावे...

मुळात स्वतःला काहीही करता येत नाही, सपशेल अपयशी झालो आहोत. हतबल आहोत हे माहिती असल्याने, आपल्या अपयशाचे खापर कोणाच्यातरी माथ्यावर फोडत राहून आपलीच पाठ थोपटून समाधान मानत राहण्याचा हा केविलवाणा प्रयत्न, हे लोक करत राहतात. यांच्या चेहऱ्यांवर आणि यांच्या कृत्यांवर देशातील आणि राज्यातील जनतेला वीट आलाय्. विरोधकांच्या चाललेल्या या बालिशपणामुळेच की काय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गोंधळ्यांच्या मेंदूची चीप चोरीला गेली आहे, हार्डडिस्क चोरीला गेली आहे असे म्हणत असावेत.

९२७०३३३८८६

### रक्षाबंधन : भाऊ-बहिणीच्या पवित्र बंधनाचा सण

रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या पवित्र बंधनाचा सण मानला जातो. रक्षाबंधन या दिवसाला नारळी पौर्णिमा असेही संबोधले जाते. रक्षाबंधन सण आपल्यात कौटुंबिक आणि सामाजिक एकता वाढवतो. या दिवशी बहीण आपल्या भावाला राखी बांधते. सख्ख्या बहिणीने सख्ख्या भावाला राखी बांधावीच पण एखाद्या बहिणीने दुसऱ्या भावाला राखी बांधल्यास त्यामध्ये शील रक्षणाची जबाबदारी येते. रक्षाबंधन म्हणजे समाजात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता आहे. रक्षाबंधन म्हणजे भावाने बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी घेणे, रक्षाबंधन म्हणजे बहीण-भावाच्या शुद्ध प्रेमाचा वाहता निर्झर भाऊ आणि बहीण परस्पर प्रेरक, पोषक आणि पूरक आहेत हा संदेश देणारा हा उत्सव भारतीय संस्कृतीची अमूल्य देण आहे.

रक्षाबंधन केवळ बहीण-भावाच्या नात्याचे प्रतीक नाही, तर सामाजिक बांधिलकीचे आणि परस्परांच्या जबाबदाऱ्या स्वीकारण्याचेही स्मरण करून देणारा सण आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाला राखी बांधून त्याच्याकडून संरक्षणाचे वचन घेते आणि भाऊ देखील आपल्या बहिणीच्या सुरक्षिततेसाठी वचनबद्ध होतो. हे नाते केवळ वैयक्तिक न राहता, समाजातील सर्व लोकांच्या परस्पर विश्वास आणि एकोप्याचे प्रतीक आहे. रक्षाबंधन फक्त भावंडांमध्येच नाही, दतर तो आपले कुटुंब, समाज आणि राष्ट्राशी असलेल्या प्रेम व एकतेचेही प्रतीक आहे. हा सण एकत्रित कुटुंबसंस्थेचे महत्त्व आणि सामाजिक बांधिलकीचेही स्मरण करून देतो. या सणाने सामाजिक बंध आणि नात्यांमधील प्रेम वृद्धिंगत होते, त्यामुळेच रक्षाबंधनाला भारतीय संस्कृतीत खूप महत्त्व आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात देखील रक्षाबंधनाचा सण आपली परंपरा, सांस्कृतिक मूल्ये आणि बंधुभाव जपण्याचं महत्त्व कायम ठेवतो. हा सण फक्त भिंतींवर राखी टांगण्याचा नाही, तर आपुलकी, प्रेम आणि संरक्षणाची भावना व्यक्त करण्याचा देखील एक शुभ दिवस आहे. तसेच, डिजिटल युगात सोशल मीडियाच्या मदतीने राखी पाठवणे, व्हिडीओ कॉलद्वारे भावना व्यक्त करणे यासारख्या नवनवीन मार्गांनीही हा सण साजरा केला जात आहे. त्यामुळे, तंत्रज्ञान आणि परंपरेचे सुंदर मिलन या सणाला अधिक खास बनवत आहे. हा सण भाऊ-बहिणीच्या नात्याच्या प्रेम, विश्वास आणि सुरक्षा यांचे प्रतीक आहे. जर आपल्याला भारतीय संस्कृतीचे रक्षण करावयाचे तर जुन्या पद्धती अनुसार सण-उत्सव साजरे करायला हवे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेस आणि सुविधा

महाराष्ट्रातील अंदाजे ८०० किलोमीटर दूर असलेली दोन मोठी शहरे पुणे ते नागपूर प्रवास करणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. रेल्वे गाड्या तसेच असंख्य खाजगी बसेस असूनही प्रवास साधने अपुरीच वाटतात. ऐनवेळी प्रवासाला जायचं असेल तर रेल्वेचे तिकीट मिळणे अशक्य होते. रेल्वेचा अंदाजे १५ तासांचा प्रवास बघता दोन्ही शहरातल्या प्रवाशांनी अति तीव्र गतीने चालणारी वंदे भारत एक्सप्रेस सुरू करावी अशी मागील दोन वर्षांपासून मागणी होती आणि आता रेल्वेमंत्र्यांनी वंदे भारत सुरू करण्याची घोषणा केली आहे. समाज माध्यमात ही बातमी वाचताच अनेकांना आनंद झाला, मात्र दोन्ही शहरातून गाडी सुटण्याची वेळ पाहून गाडी आपल्याला किती सोयीची आहे याच्यावर प्रश्न पडला. या गाडीला शयिका (स्लीपर) ऐवजी बसून प्रवास करण्याचे आसन आहे. दोन्हीकडून गाडीचा प्रवास दिवसभराचा बारा तासांचा आहे. या प्रवासात नोकरी करणाऱ्या तरुणांची संख्या जास्त असते. पुण्याहून नागपूरला येणे व परत जाण्यास दोन दिवसांच्या जादा सुट्या मोजाव्या लागतील. तसेच वयस्कर लोकांना बारा तास प्रवास बसून करायचा म्हणजे शारीरिक दुखणे होय. दोन शहरातला प्रवास करण्यासाठी लोक रात्रीच्या प्रवासाला जास्त पसंती देतात. रेल्वेने प्रवासकाळ कमी करण्याचा प्रयत्न करावा. या गाडीने प्रवास करणे लोकांसाठी शेवटचा पर्याय ठरू शकतो. दोन शहरात जाण्यासाठी अजून एका गाडीची भर पडली याचे मात्र समाधान आहे.

**अमोल पाठक**/९५४५८९८४४६

### ट्रम्प यांचा खटाटोप

आतापर्यंत भारत हा गरीब देश आहे. गुलामगिरी आणि मागासलेपण यामुळे देश चालविण्यासाठी अमेरिकेचे वर्चस्व मानून सवलती पदरात पाडून घेण्याचे धोरण राज्यकर्त्यांनी अवलंबिले होते. त्यावेळी अमेरिकेतील 'मिलो' गहू आणून देशातील जनतेला जगविले जात होते. परंतु भारतातील राजकीय सत्ता बदलानंतर यात आमूलाग्र बदल दिसू लागले. जागतिक स्तरावर शांतता आणि विकासाचे मॉडेल भारताचे पंतप्रधान मोदी यांनी उभे केले. कोणत्याही बाहेरील राष्ट्राचे, कोणत्याही एका देशाचे वर्चस्व नको, कोणाच्याही दबावाखाली झुकणार नाही असे कणखर निर्णय घेण्याचे धोरण ठामपणे जगासमोर ठेवण्यात आले. आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया अशा योजनांमुळे भारताची अर्थव्यवस्था बळकट झाली. जगात याची सर्वत्र दखल घेण्यात आली. त्यातच ब्राझीलच्या राष्ट्रपतींनी ब्रिक्स देशांनी वेगळे चलन आणण्याचे सुतोवाच केले. या ऐतिहासिक बदलामुळे अमेरिकन डॉलरचे महत्त्व कमी होईल. जगातील आपले वर्चस्व कमी होणार असे अमेरिकेला वाटू लागले. त्यातच रशिया, चीनसारखी बलाढ्य सत्ता भारताच्या भूमिकेशी सहमत झाली. या सर्व जागतिक बदलामुळे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व्यथित झाले. त्या नैराश्यातून भारतातील आयातीवर एकूण ५० टक्के शुल्क लावण्याचे घोषित करण्यात आले. यामुळे प्रत्येक देशाने आपल्या देशात तयार होणाऱ्या वस्तूंनाच प्राधान्य देऊन गरजा भगवाव्यात असा संदेश सर्वत्र पोचला आहे.

**ॲड. बळवंत रानडे**/९८८१४७३५८०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉटस ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# आ. पडळकर समर्थक शरणु हांडेंचे अपहरण करून खूनाचा प्रयत्न

## चार तासात पोलिसांकडून अपहरणकर्त्यांना अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार रोहित पवार यांच्या समर्थकांमधील वाद टोकाला पोहोचला असून काही दिवसांपूर्वी झालेल्या मारहाणीची व बदनामीचा बदला घेण्यासाठी रोहित पवार समर्थकांनी पडळकर समर्थक शरणू हांडेंचं अपहरण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या अपहरणाच्या घटनेबाबत माहिती मिळताच सोलापूर पोलिसांनी तात्काळ ४ पथके आरोपींच्या शोधासाठी रवाना करून आरोपींना अटक केली. या आरोपींना शुक्रवारी दुपारी न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयानो त्यांना ४ दिवसाची पोलिस कोठडी सुनावली.

अमित म्हाळप्पा सुरवसे (वय २९, रा. मणिधारी सोसायटी, अक्कलकोट रोड, सोलापूर), सुनिल भिमाशंकर पुजारी (वय २०, रा. साईबाबा चौक, सेलापूर), दिपक जयराम मेश्राम (वय २३, रा. लोकमंगल हॉस्पीटलजवळ, आशा नगर, सोलापूर), अभिषेक गणेश माने (वय २३, रा. एकता नगर, सोलापूर) अशी पोलिस कोठडी मिळालेल्यांची नावे आहेत. याबाबत विष्णु शिवराया हांडे (वय ३५, रा. साई नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर शरणु शिवराया हांडे (वय ३६) असे अपहरण करून जखमी करण्यात आलेल्या पडळकर समर्थकाचे नाव आहे. अमित सुरवसे आणि शरणु हांडे या दोघांविरोधात शहर पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहेत.

**आरोपीविरोधात गुन्हा दाखल**

दरम्यान, जखमी शरणु हांडे याचा भाऊ विष्णू शिवराया हांडे याने एमआयडीसी पोलिसात फिर्याद दाखल केली आहे. आरोपी अमित म्हाळप्पा सुरवसे (वय २९, रा. मणिधारी सोसायटी, अक्कलकोट रोड, सोलापूर), सुनिल भिमाशंकर पुजारी (वय २०, रा. साईबाबा चौक, सेलापूर), दिपक जयराम मेश्राम (वय २३, रा. लोकमंगल हॉस्पीटलजवळ, आशा नगर, सोलापूर), अभिषेक गणेश माने (वय २३, रा. एकता नगर, सोलापूर) यांच्यासह ४ अनोळखी साथीदारांविरोधात भारतीय न्याय संहिता १४० (१), १८९ (२), १८९ (४), १९१ (२), १९१ (३), १९० आणि शस्त्र अधिनियम कलम ४, २५ अनुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**आरोपींना ४ दिवसांची पोलीस कोठडी**

सोलापुरातील गोपीचंद पडळकर यांचे समर्थक शरणू हांडे अपहरण व मारहाण प्रकरणातील चारही आरोपीना पोलिसांनी न्यायालयात केले असता, न्यायाने आरोपींना ४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणाच्या अधिकचा तपासासाठी पोलिसांनी आरोपीच्या ७ दिवसांच्या पोलीस कोठडीची केली मागणी होती. मात्र, पोलीस कोठडीच्या मागणीला आरोपीचे वकील ॲड.शरद पाटील यांनी युक्तिवाद करत विरोध केला. आरोपीकडून सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आल्याने पोलीस कोठडी ऐवजी न्यायालयीन कोठडी द्यायची विनंती केली होती. दोन्ही बाजूचे युक्तिवाद न्यायमूर्ती वी. ए. कुलकर्णी यांनी आरोपी अमित सुरवसे, सुनील पूजारी, दीपक मेश्राम आणि अभिषेक माने या चौघाना ४ दिवसाची पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. याप्रकरणी पुढील सुनावणी १२ ऑगस्ट रोजी होणार आहे.


शरणु हांडे


अमित सुरवसे









### नेमकं प्रकरण काय?...

आरोपी अमित सुरवसे याने २०२१ साली गोपीचंद पडळकर यांच्या गाडीवर दगडफेक केली होती. याचा बदला म्हणून मे महिन्यात शरणु हांडे याने अमित सुरवसे याला मारहाण केली होती. या मारहाणीचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात वायरल झाल्यानंतर शरणु हांडे आणि अमित सुरवसे यांनी वाद मिटवून घेतला होता. पण अमित याने याच मारहाणीचा आणि अपमानाचा बदला घेण्यासाठी आपल्या मित्राच्या मदतीने शरणु याचे ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास साई नगर येथील राज बिअर शॉपी येथून अपहरण केले. यासाठी त्याने सुरुवातीला पुण्यातून एमएच १२ एक्सएक्स ६५४७ क्रमांकाची कार भाड्याने घेतली. मित्रासह तो सोलापुरात आला आणि शरणु हांडे याला घराजवळून शस्त्राचा धाक दाखवून अपहरण केले. काही महिन्यांपूर्वी झालेल्या मारहाणीचा बदला घेण्यासाठी हांडे यांचे अपहरण करुन हत्येचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे.

### शहर पोलिसांची तात्काळ कारवाई

अपहरणची माहिती मिळताच सोलापूर पोलिसांनी ४ पथके तात्काळ आरोपींच्या शोधासाठी रवाना करण्यात आली. गुरुवारी रात्री १० च्या सुमारास अमित सुरवसे आणि त्याच्या साथीदारांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. सोलापूर शहर पोलीस दलाच्या सतर्कतेमुळे गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकाचा जीव थोडक्यात वाचला. रात्री १० च्या सुमारास अमित सुरवसे आणि त्याच्या साथीदारांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. यावेळी शरणु हांडे हा गंभीर अवस्थेत असल्याचे पोलिसांना लक्षात आल्याने त्याला तात्काळ सोलापुरात आणून उपचारासाठी दाखल करण्यात आले.

### जखमी शरणु हांडे यांनी सांगितली आपबिती...

मी पानटपरीच्या इथे उभा असताना गाडीतून ते लोक आले. माझ्यावर वार केले. त्यानंतर मला पायाला बांधून गाडीत बसवले आणि त्यांनी मला नेले. ते सात जण होते. कोयता, हॉकी स्टिक आणि तलवारीने मला मारहाण करण्यात आली. मला मारहाण करत होते, त्यांना फोन आला, मला घेऊन गेल्यानंतर दहा ते पंधरा मिनीटांनी व्हिडीओ कॉल आला. व्हिडीओ कॉलवर त्यांनी मला जखम वगैरे झालेली पाहिली, मला माफी मागायला सांगितली त्यांनी, मी माफी मागितली नाही. मला त्या अमितची माफी मागायला सांगितली, रोहित पवारांनी, ते मला बोलले माफी माग, मी त्यांना नाही सांगितलं, त्यानंतर त्यांनी म्हटलं, त्याला फार मस्ती आहे, तुम्ही पाहून घ्या आणि फोन कट केला. अपहरण करणाऱ्यांपैकी तिघे जण मारायचं नाही म्हणत होते, ते तिघे जण निबांळ म्हणून स्टेशन आहे, तिथे उतरले, ते पुण्याचे होते बहुतेक, त्यांच्या भाषेवरून ते पुण्याचे वाटतं होते, तिघे मारू नका म्हणत होते, तर बाकीचे मारा म्हणत होते, अशी माहिती शरणु हांडे यांनी पडळकरांना दिली. अपहरण करणारे गाडीच्या बाहेर चर्चा करत होते, तिघे मारू नका म्हणाले, तर बाकी मारा म्हणत होते, पोलिसांमुळे मी वाचलो, पोलिसांनी चांगलं काम केलं. डोक्यात मारहाण झाली, थोडा मुक्कामार लागला आहे, अशी माहिती शरणु हांडे यांनी पडळकरांनी दिली.

**कंडोम, साडी, फटाक्यांची माळ, ट्रायपॉड आरोपींकडून जप्त**

शरणू हांडेप्रकरणात विविध वस्तू पोलिसांच्या हाती लागल्या आहेत. पोलिसांनी आरोपींकडून साडी, ट्रायपॉड, फटाक्यांची माळ आणि कंडोमची पाकिटेही जप्त केल्याने खळबळ उडाली आहे. त्यामुळे, आरोपींचा नेमका काय प्लॅन होता, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मात्र, ज्याप्रमाणे काही दिवसांपूर्वी व्हायरल झालेल्या एका व्हिडिओतून रोहित पवार समर्थकांची बदनामी करण्यात आली होती, त्याचप्रमाणे पडळकर समर्थकांची बदनामी करायची होती का? व्हिडिओ बनवून तो व्हायरल करायचा असल्यानेच ट्रायपॉडसह, साडी अन् कंडोमची पाकिटेही आरोपींनी बाळगली होती का? अमितने शरणूला साडी नेसवून, त्याचे केस कापून तसेच फटाके फोडून त्रास देणे आणि या सगळ्याचा व्हिडिओ करून अपमानाचा बदला अपमानाने घ्यावा, असा तर हेतू बाळगला नव्हता ना? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे. अर्थात या प्रकरणात पोलिसांनी कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही.

**यांनी केली कारवाई...**

पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, सहायक पोलिस आयुक्त सुधीर खिरडकर, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे, विजय खोमणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक शंकर धायगुडे, एमआयडीसीचे सहायक पोलिस निरीक्षक भरत चंदनशिव, एमआयडसीचे पोलिस उपनिरीक्षक महेंद्र गाढवे, हवालदार सचिन भांगे, नाईक मंगेश गायकवाड, शैलेश स्वामी, अमोल यादव, अमसिध्द निंबाळ, सुहास अर्जुन, शंकर याळगी, कुमार बोल्ली, अमर शिवसिंगवाले, किशोर व्हनगुंटी, अविनाश डिगोळे, सकलेन मुकादम तसेच गुन्हे शाखेकडील हवालदार अंकुश भोसले, शैलेश बुगड, शिपाई काशिनाथ वाघे, अभिजित धायगुडे, राजकुमार वाघमारे यांनी केली.

### अपहरणानंतर जवळपास ४ तासात सुटका - पोलिस आयुक्त

भाजप नेते आणि आमदार गोपीचंद पडळकर यांचे समर्थक शरणू हांडे अपहरण प्रकरणावर पोलीस आयुक्तांनी प्रतिक्रिया देताना हांडे यांच्या अपहरणानंतर जवळपास ४ तासात त्यांची सुटका करण्यात आल्याची माहिती दिली. अपहरणाची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली सोलापूर पोलिसांनी चार पथक तयार करून कर्नाटकच्या दिशेने रवाना केली. तात्रिंक गोष्टींच्या मदतीने पोलिस आरोपींपर्यत पोहोचले. आरोपींचे लोकेशन कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्ह्यातील इंडि तालुक्यामध्ये मिळाले. त्या लोकेशनवर पोलिस पथक पोहोचले. यावेळी पीडित शरणू हांडे याला मारहाण तसेच चाकूने जखमी करण्यात आले होते. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने आरोपींना ताब्यात घेतले आणि जखमीला सुरक्षित शासकीय रुग्णालयात दाखल केले, अशी माहिती पोलीस आयुक्त एम. राजकुमार दिली. तर यामध्ये मुख्य आरोपी अमित सुरवसे, सुनील पुजारी, दीपक मेश्राम आणि अभिषेक माने यांना अटक करून गुन्ह्यातील वाहन तसेच हत्यार जप्त करण्यात आले आहे. एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे हत्या करण्याच्या उद्देशाने अपहरण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चार तासांत या घटनेचा सोक्षमोक्ष लावण्यात आला. पोलिसांच्या तात्काळ कारवाईमुळे मोठी घटना टळली. अपहरणकर्ते आणि अपहरण झालेले दोन्ही वेगवेगळ्या पक्षांचे कार्यकर्ते आहेत. पिडीत असलेल्या कार्यकर्त्यांने आधी आरोपींना मारहाण केली होती व त्याचे व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल केले होते, अशी माहिती समोर आली आहे.

### जशास तसे उत्तर देण्याच्या प्रयत्नातून घटना

आमदार गोपीचंद पडळकर यांच्या वाहनावर दगडफेक करणाऱ्या रोहित पवारांच्या समर्थकाना बेदम मारहाण केल्याची घटना मे महिन्यात घडली होती. विशेष म्हणजे या मारहाणीचा व्हिडीओ तयार करून सोशल मीडियावर व्हायरलही करण्यात आला होता. यापुढे पडळकरांच्या विरोधात काही कृत्य केल्यास त्याला अशाचप्रकारे धडा शिकवला जाईल, अशी धमकीही त्यावेळी पडळकर समर्थकांनी दिली होती. या घटनेमुळे पवार समर्थकांची मोठी बदनामी झाली, पण कुठलीही पोलीस तक्रार न करता, त्यांनीही जशास तसे उत्तर देण्याचं मनाशी ठरवलं अन् त्यातूनच, मारहाण करणाऱ्या शरणू हांडेचे अपहरण करुन व्हिडिओ बनविण्याचा प्लॅन आखला होता का? अशी शंका व्यक्त होत आहे.

---

## शरणू हांडे प्रकरणाचे रोहित पवार मास्टरमाईंड : आ. पडळकर

### कार्यकर्त्यांत वाद कशाला लावता? मी बारामतीत कोठे येऊ सांगा?

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

शरणू हांडे याच्या अपहरणप्रकरणी भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवारांवर गंभीर आरोप केले आहेत. पडळकरांनी रोहित पवारांचा फोटो दाखवत शरणू हांडे अपहरण प्रकरणाचा 'मास्टर माईंड' असल्याचा आरोप केला आहे. तसेच, रोहित पवार तुम्ही कार्यकर्त्यांमध्ये वाद कशाला लावता?, त्यापेक्षा मला सांगा मी बारामतीमध्ये येतो. रोहित पवार यांनी मला वेळ आणि ठिकाण सांगावं, मी तिथे येतो, असे आव्हान दिले.



गोपीचंद पडळकर यांचे कार्यकर्ते शरणू हांडे याचे सोलापूर शहरातून गुरुवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास अपहरण झाले होते. मात्र, पोलिसांनी सतर्कता दाखवून कर्नाटकातील झळकीजवळ अपहरणकर्त्यांच्या ताब्यातून हांडे याची सुटका केली. हांडे याच्या पायावर कोयत्याने वार केले आहेत, त्याच्यावर सोलापूर शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे.हांडे याची गोपीचंद पडळकर यांनी शुक्रवारी सकाळी सोलापूर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये जाऊन विचारपूस केली. त्यानंतर माध्यमांशी बोलताना पडळकर यांनी आमदार रोहित पवार यांच्यावर आरोप केले आहेत. ते म्हणाले, पोलिसांच्या सतर्कतेमुळे शरणू हांडे वाचला आहे. पोलिसांनी सीसीटीव्हीची तपासणी केली, गाडी भाड्याने कुठून घेतली, त्याचे लोकेशन पोलिसांनी घेतले, त्यामुळे शरणू सुखरूप मिळाला. माझ्या गाडीवर २०२१ मध्ये अमित सुरवसे याने मोठा दगड टाकला होता. मात्र, विरोधकांनी आरोप केला की मी पब्लिसिटी स्टंट केला आहे. अमित सुरवसे याच्या छातीवर शरद पवारांचा फोटो आहे, त्याने माझ्या गाडीवर टाकला आहे. विरोधक हे महाराष्ट्राबाबत गळा काढत आहेत की, आमदारांच्या सुरक्षेबाबत काहीतरी करा. त्यावेळी ३०७ कलम दाखल करणे गरजेचे होते, मात्र तसे झाले नाही, असेही पडळकर यांनी नमूद केले.

## गृहमंत्र्यांच्या सांगण्यावरून पडळकर सोलापुरात

## तमाशा करून मला अडकवण्याचा प्रयत्न : रोहित पवार

### संपूर्ण प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याची पवारांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

आ. पडळकर यांच्या सोलापुरातील शरणु हांडे या कार्यकर्त्याच्या अपहरण प्रकरणामध्ये जखमी हांडे याने आ. रोहित पवार यांच्यावर आरोप केले आहेत. त्या आरोपाला रोहित पवार यांनी चांगलेच उत्तर देत पडळकर हे गृहमंत्र्यांच्या सांगण्यावरूनच तिकडे गेले आहेत आणि तिकडे जाऊन हा तमाशा तिथं करून मला अडकवण्याचा प्रयत्न करत असाल तर याप्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याची मागणी पवार यांनी केली.



याप्रकरणात करण्यात आलेल्या आरोपांवर रोहित पवार यांनी पडळकरांना सणसणीत उत्तर दिलं आहे. मी सरकारच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर बोलतो आहे. पुराव्यासहित मी त्यांच्याविरोधात बोलतो आहे. सरकारची मोठ्या प्रमाणात अडचण होत आहे आणि ती मी केलेली आहे. काल मी फोन केला असं ते म्हणतात, मी काल छत्रपती संभाजीनगरला होतो, त्यानंतर वाशिमला आलो, आज अमरावतीला आलो आहे. मी अजून कुठे कोणाशी फोनवर बोललेलो नाही, व्हिडिओ कॉलवर मी त्या कार्यकर्त्याला बोललो असतो ते म्हणाले, मी माझ्या घरच्यांशीच व्हिडिओ कॉलवर बोलत नाही तर हा कोण लागून गेला आहे, याच्यासोबत व्हिडिओ कॉलवर बोलायला, असंही रोहित पवारांनी म्हटलं आहे.

### चौकशी करा खरं काय ते लोकांसमोर आलं पाहिजे

राहिला प्रश्न तो ज्या कार्यकर्ता, ज्याने ही चूक केली आहे त्याचा, जो व्यक्ती कायदा सुव्यवस्था हातात घेतो, त्याच्या बाजूने आम्ही राहत नाही. त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे, तुमच्याकडे पोलीस प्रशासन आहे, तुमच्याकडे गृहमंत्री आहे. गृहमंत्र्यांच्या सांगण्यावरूनच पडळकर तिकडे गेले आहेत आणि तिकडे जाऊन हा तमाशा तिथं करून मला अडकवण्याचा प्रयत्न तुम्ही करत असाल तर एसआयटी चौकशी करा, याची मी मागणी करतो. चौकशी करा खरं काय ते लोकांसमोर आलं पाहिजे. उगाच एखाद्या विषयात कोणावर अन्याय झाला असेल, मारहाण झाली असेल तर माझी सहानभूती त्या मुलाबरोबर आहे, त्या कार्यकर्त्या बरोबर आहे. तो आमच्या विरोधातला असला तरी चालेल. विषय एवढाच आहे की, जर खोटं बोलून कोणी वेगळ्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करत असेल, कोणी किती प्रयत्न केला तरी मला फ्रेम करू शकत नाही. कारण मी यामध्ये काही चुकी केली नाही. मी सरकारच्या विरोधात बोलतच राहणार. तुम्हाला जे काही एसआयटी चौकशी करायची करा. पण कालच्या प्रकरणांमध्ये उगाचच माझं नाव तिथे घेत आहात. ते योग्य नाही. राजकारणाला एवढ्या खालच्या लेवलला तुम्हाला न्यायचं असेल तर तो तुम्ही प्रयत्न करा. आम्ही लोकांच्या बाजूने, महाराष्ट्राच्या बाजूने लढत राहणार असेही पुढे रोहित पवारांनी म्हटलं आहे.


**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः मौजे बार्शी, ता. बार्शी जिल्हा सोलापूर येथील लोकांना कळविण्यात येते की, ता. बार्शी, जि. सोलापूर यापैकी मौजे बार्शी येथील मिळकत जुना गट नं. ९२१/१/५, यांसी नवीन गट नं. ९२१/१/५ या मधील प्लॉट नं. ६२ याचे क्षेत्रफळ ९२.९३ चौ.मी. अथवा १०० चौ. फुट आहे. पुर्व-पश्चिम २५ फुट व दक्षिण-उत्तर ४० फुट आहे. सदर मोजमापामध्ये खंड रजिस्टरप्रमाणे आरसीसी स्वरुपाचे बांधकाम ५८.३६ चौ.मी. असुन त्याची **चतुःसिमा पुढीलप्रमाणे :- पुर्वेस** - गट नं. ९२१/१/४, **दक्षिणेस** - गट नं. ९२१/१/५ पैकी प्लॉट, **पश्चिमेस** - फुले यांचा प्लॉट, **उत्तरेस** - २० फुटी रुंदीचा रस्ता आहे. तसेच पाणी वागणूक उत्तर बाजूने जाते.

सदरहु मिळकत ही धानाप्पा कृष्णाजी सानप यांचे कब्जे मालकी वहिवाटीची आहे. सदरची मिळकत ही त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेवरून त्यांचे बरोबर आमचे अशिलाचा खरेदीचा व्यवहार ठरलेला असून त्यांनी इसारा दाखल रक्कमही घेतलेली आहे व वर नमुद मिळकत हि निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची अशी असल्याची ग्वाही दिलेली आहे.तरीही वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, खरेदीखत, वारसा, फेडपत्र, पोटगी, टाच, कर्ज-बोजा, जप्ती, करार, नोटरी, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध तसेच वादविवाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशीही नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०८ (आठ) दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमुद मिळकतीबाबत आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन ही खरेदीपुर्वी जाहीर नोटीस दिली असे. ता. ०८/०८/२०२५

सही/-
ॲड. पी.पी. वाघमारे
बी.एससी., एलएल.बी.
नोटरी भारत सरकार
बार्शी जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
मो.. ९९७५१२०७७४/९६०४५६६७७१



**उपअधीक्षक भूमि अभिलेख उत्तर सोलापूर**
जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार सोलापूर
दुरध्वनी क्रमांक ०२१७-२७२३३३६
ई-मेल :- dyslrnorthsolapur@gmail.com

क्रमांक/भूमापन/मौजे बाळे/स.नं. १७५,३९/२०२५ सोलापूर दिनांक :- २८/०७/२०२५

**सुनावणी नोटीस**

प्रति,
**१)** अनिल विनायक काकडे, रा. ६२, भगवानदास कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर, **२)** किसन नामदेव दुपारगुडे रा. चौदा कमानजवळ, बाळे, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर, **३)** अलका विश्वास काकडे, **४)** विशाखा श्रीपाद जोशी, **५)** मानसी रोहित कुलकर्णी, **६)** पोपट नारायण चव्हाण, **७)** रुपाली पोपट चव्हाण, **८)** संजय रामचंद्र बाबर, **९)** काकासो लक्ष्मण खांडेकर, **१०)** संतोष मारुती पुजारी, **११)** विठ्ठल चंदू व्हनमाने, **१२)** बाळू पांडूरंग कोळेकर, **१३)** विष्णु नामदेव गोरे, **१४)** नाना कुंडलिक मेटकरी, **१५)** चेतन शामराव जावीर, **१६)** रखमाजी बाबासो बंडगर, **१७)** राजाराम सिताराम पडळकर, **१८)** रामचंद्र नामदेव दुपारगुडे **१९)** लता विनायक मासाळ, **२०)** सविता तुकाराम पडळकर, **२१)** राजेश रामचंद्र मोटे, **२२)** धोंडीबा संदिपान बुरुंगले, **२३)** सुशिलकुमार दत्तात्रय डोईफोडे, **२४)** महादेव आण्णा कटरे, **२५)** अजय ज्ञानेश्वर चोपडे, **२६)** अमरिष तुकाराम अर्जून २७) कल्पना एकनाथ सातपुते, **२८)** किरण ज्ञानु कारंडे, **२९)** कौशल्या शंकर नरबट, **३०)** छाया ज्ञानु पवार, **३१)** दत्तात्रय अशोक पवार, **३२)** परमेश्वर शिवाजी जाधवर, **३३)** भगत बिरा कटरे, **३४)** भिमराव गुंडा सलगर, **३५)** माउली नामदेव मुंडे, **३६)** लक्ष्मण शंकर खांडेकर, **३७)** वैभव रामहरी माळी, **३८)** सचिन ज्ञानु गारले, **३९)** विष्णु नामदेव दुपारगुडे, **४०)** रामचंद्र नामदेव दुपारगुडे, **४१)** राजु नामदेव दुपारगुडे, **४२)** चित्राबाई भोजप्पा गायकवाड, **४३)** सुमन वसंत कडचे, अ.क्र. ३ ते ४३ सर्वजण रा. बाळे, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर. यातील अपीलदार नं. ६ ते ३६ यांचे नोटीसा त्यांचे अधिकार पत्र धारक
१) विनायक प्रारुती मासाळ,
रा. मु.पो. मासाळवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली
२) श्री. दत्तात्रय अशोक पवार,
रा. खवासपूर रोड, काटकर मळा, दिघंची, सांगली
**- सर्व अपीलदार**

विरुध्द
१) सुधीर वामनराव काकडे, २) सुहास वामनराव काकडे,
३) प्रकाश कृष्णराव काकडे, ४) पवन जयंत काकडे,
५) वंदना जयंत काकडे, ६) प्रशांत जयंत काकडे
सर्वजण रा, बाळे, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
**- सर्व जाबदार**

**विषय :-** मौजे बाळे, ता. उत्तर सोलापूर येथील स.नं. १७५ व ३७ पोटहिस्सा मोजणीबाबत.

**संदर्भ :-** मा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सोलापूर यांचेकडील अपील आदेश क्रमांक/न.भू/अपील एस.आर.४१०७/२०२४ सोलापूर दिनांक ०४/०६/२०२५

उपरोक्त संदर्भीय आदेशास अनुसरुन विषयांकित बाबत आपणास कळविणेत येते की, मौजे बाळे ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर येथील स.नं. १७५ व ३७ पोटहिस्सा मोजणीबाबत संबंधीत अपीलदार यांनी मा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सोलापूर यांचेकडे अपील दाखल केले होते. सदरचे अपील अर्जाचे अनुषंगाने मा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सोलापूर यांचेकडून संदर्भीय आदेश पारित झाला आहे. सदरचे आदेशामध्ये नमुद केलेनुसार यापूर्वी इकडील कार्यालयाकडून स.नं. ३९ व १७५ मधील झालेल्या हद्द कायम व पोटहिस्सा मोजणीची चौकशी करणे कामी इकडील कार्यालयाकडून दिनांक १९/०८/२०२५ ही तारीख नेमणेत आली आहे. सदर नेमले तारखेस आपण समक्ष ठिक सकाळी ११.०० वाजता इकडील कार्यालयात उपस्थित राहून सदरचे मोजणीबाबत माहीती द्यावी. आपण सदर नेमले तारखेस गैरहजर राहिल्यास नियमानुसार चौकशीची कार्यवाही पूर्ण करणेत येईल. नंतर कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
(नितीन सावंत)
उपअधिक्षक भूमि अभिलेख
उत्तर सोलापूर



**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग**
इंद्रभवन, रेल्वे लाईन्स, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ,
सोलापूर-४१३००१ ई-मेल : drainsmc@gmail.com टेलिफोन नं:-०२१७-२७४०३५०

**जाहीर निविदा नोटीस**

सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय ड्रेनेज विभाग व विभागिय कार्यालय क्र. १ ते ८ कडिल दैनंदिन देखभाली करिता ५४० मि.मि हेवी ड्युटी राऊंड आर.सी.सी मॅनहोल कव्हर्स पुरविणेकामी सोलापूर महानगरपालिकेमार्फत निविदा https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**Tender ID: 2025_SMC_1209147_1**

सदर कामाची सविस्तर माहिती https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर दि. ०९/०८/२०२५ रोजी पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
(संदीप कारंजे) अतिरिक्त आयुक्त -
२ तथा नियंत्रण अधिकारी, सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर



**भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर**
**ICAR - National Research Centre On Pomegrante**
(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

**WALK-IN-INTERVIEW**

A Walk in interview will be held on **10/09/2025 11:00 AM** at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sr. no | Name of the Project | Name of Post | Number of Post |
|---|---|---|---|
| 1. | Externally funded project titled "Efficacy and Phytotoxicity Evaluation of Icafolin-Methyl 200 SC for Weed Management in Pomegranate Orchards" sponsored by Bayer Crop Science Ltd. | Young Professional - I | 01 |
| 2 | Evaluation of SPB01 (Foliar) on Bacterial Blight of Pomegranate sponsored by Sea6Energy | Technical Assistant/ Field Assistant | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website: nrcpomegranate.icar.gov.in.

Sd/-
DIRECTOR

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### दुचाकीच्या धडकेत शाळकरी विद्यार्थी जखमी; नळबाजार येथील घटना

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

शाळेतून घराकडे पायी जाताना दुचाकीची धडक बसल्याने शाळकरी विद्यार्थी जखमी झाला. हा अपघात शुक्रवारी रोजी दुपारी १.१५ च्या सुमारास घडला. कुणाल मुकेश बंबेवाले (वय ९ वर्षे, रा. बेडर पूल, लष्कर सोलापूर) असे जखमी विद्याथ्याचे नाव आहे. कुणाल हा मॉडर्न हायस्कूलमध्ये शिक्षण घेतो. शुक्रवारी दुपारी १.१५ च्या सुमारास शाळा सुटल्यानंतर तो पायी चालत घराकडे जात होता. दरम्यान नळ बाजार चौक येथे आल्यानंतर पाठीमागून आलेल्या दुचाकीची त्याला धडक बसली. त्यात त्याच्या डोक्याला आणि छातीला मुकामार लागल्याने तसेच डाव्या पायाला जखम झाल्याने आई ज्योती यांनी त्याला शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### आजाराला कंटाळून बांगड्याच्या काचा खालल्या

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

आजाराला कंटाळून एका ५२ वर्षीय महिलेने बांगड्या फोडून त्याचा काचा खालल्या. गुरुवारी दुपारी १२ च्या सुमारास जुना विडी घरकुल परिसरातील राघवेंद्र नगरात हा प्रकार घडला. अनुराधा श्रीनिवास कटकम (वय ५२) असे बांगड्याच्या काचा खाललेल्या महिलेचे नाव आहे. अनुराधा या कोणत्यातरी आजाराने त्रस्त आहेत. त्यातून बरे होत नसल्याच्या कारणातून त्या मानसिक तणावाखाली असल्याने त्यांनी गुरुवारी दुपारी बाराच्या सुमारास हातातील बांगड्या फोडून त्या काचा खालल्या. तसेच शुगरच्या १० ते १५ गोळ्या खालल्याने त्यांना त्रास होऊ लागल्याने रात्री ७.४० वाजता मुलगी जयंती आडम यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### वडील रागावल्याने प्राशन केले विषारी औषध; नांदणी येथील घटना

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

घरगुती कारणातून वडीलांनी रागावल्याने मुलाने गोचिड मारण्याचे औषध प्राशन केले. हा प्रकार २६ जुलै रोजी दुपाररी दोनच्या सुमारास घडला असून तो तरुण शुध्दीवर असला तरी बोलत नाही. काशिनाथ सुरेश टेळे (वय २५, रा. नांदणी ता द सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. घरगुती कारणातून काशिनाथ यास वडील सुरेश हे २६ जुलै रोजी दुपारी दोनच्या सुमारास नांदणी शिवारातील शेतात रागावले होते. याचा राग आल्याने काशिनाथ याने गोचिड मारण्याचे औषध प्राशन केले. त्यांनतर त्यास त्रास होऊ लागल्याने खासगी दवाखान्यात त्याच्यावर उपचार करण्यात आले. तेथून गुरुवारी रात्री १०.४५ च्या सुमारास मामा भारत खरात यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु रुग्ण शुध्दीवर असला तरी बोलत नसल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




### वंचित महिलांना शिधापत्रिकांचे वितरण

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

महसूल सप्ताहाच्या अनुषंगाने सोलापूर पुरवठा विभागाच्या वतीने समाजातील वंचित घटकांपर्यंत शिधापत्रिकांचा लाभ पोहोचविण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांच्या हस्ते विधवा, परितक्त्या आणि अनाथ महिलांना शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. अप्पर जिल्हाधिकारी यांच्या दालनात आयोजित शिधापत्रिका वितरण कार्यक्रमास जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, निरीक्षण अधिकारी प्रफुल्ल नाईक, तसेच सामाजिक कार्यकर्ते नितीन कांबळे उपस्थित होते. यावेळी एकूण १९ लाभार्थी महिलांना शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले. लाभार्थींची नावे: रेश्मा शेडम, जया चव्हाण, वर्णा वाघमारे, पूजा पेद्दी, प्राजक्ता कांबळे, अंबिका देवकते, गायत्री विटकर, शशिकला देवकरे, अलका मेलगिरी, पूजा चव्हाण, मंगल लोंढे, लानुबाई दुपारगुडे, दिलशाद शेख, तहेरा बक्षी, रेश्मा शेख, शामल रणदिवे, विमलाबाई कांबळे, नौशाद बी. कातनकर, कल्याणी रमेजा.



### मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये संविधान जागृती

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

हत्तुरे नगर येथील श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व अनुलोम अनुगामी लोकराज्य महाभियान यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान जागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी धरेप्पा हत्तुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रमुख वक्ते ॲड.दिनेश अय्यर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्याकडून संविधानावर आधारित प्रश्नावली सोडवून घेण्यात आली. प्रास्ताविक अनुलोमचे द.तालुका प्रमुख आदित्य शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन अनिलकुमार गावडे यांनी केले,तर आभार अनिता हौदे यांनी मानले.

## निधन वार्ता

### सुमनताई रोडगे



**सोलापूर दि.८ ऑगस्ट-**

शहरातील मुरारजी पेठ परिसरातील मंगळवेढेकर चाळीतील रहिवासी श्रीमती सुमनताई प्रभाकर रोडगे (वय-८६) यांचे शुक्रवारी दि.८ ऑगस्ट रोजी रात्री आकस्मित निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी सकाळी लकी चौकातील रोडगे निवास येथून सकाळी दहाच्या सुमारास निघणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले ,सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### धर्मराज कोळी



**सोलापूर दि.८ ऑगस्ट-**

देना बँकेत विविध पदांवर सेवा बजावलेले, निवृत्त अधिकारी व कोळी समाजाचे नेते धर्मराज कोळी यांचे गुरुवार दि.७ ऑगस्ट २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७५ वर्षांचे होते. सोलापूर जिल्ह्याच्या कोळी समाज चळवळीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.



**मार्कंडेय रथोत्सवाची तयारी**

सोलापूर : मार्कंडेय रथोत्सवानिमित्त मार्कंडेय मुनी पुत्र विवाह सोहळ्याचा देखावा साकारण्यात आला असून मूर्तिकार प्रकाश माने शेवटचा हात फिरवताना टिपलेले छायाचित्र.



**रक्षाबंधनसाठी सुरू आहे राखीची पारख...**

सोलापूर : शुक्रवारी सायंकाळी राखी पौर्णिमेच्या पूर्वसंध्येला राखी खरेदीसाठी महिलांची गर्दी दिसून आली पूर्व मंगळवार पेठ परिसरात टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र केवल तिवारी)

# प्रत्येक गावात हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता मोहीम उत्साहाने राबवा

### सीईओ कुलदीप जंगम यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ ऑगस्ट-**

देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा मोहीम जिल्ह्यातील प्रत्येक गावात प्रत्येक सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने राबवावी असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केला आहे.



यावर्षी सांस्कृतिक मंत्रालय देशभरात हर घर तिरंगा मोहिमेचे नेतृत्व करत आहे. मोहीम आता राष्ट्रीय अभिमान आणि लोकांच्या सहभागाचा उत्सव




बनली आहे.यावर्षीच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिना निमित्त,हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता , स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग या टॅग लाईन अंतर्गत पेयजल व स्वच्छता विभाग, जलशक्ति मंत्रालय व सांस्कृतिक मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८ ऑगस्ट २०२५ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत मोहीम राबविण्याच्या सूचना आहेत.

यासाठी गावागावात या मोहीमेची जनजागृती करण्यात येणार आहे.या मोहिमेची संकल्पना लोकसहभागातून उत्सव व नागरी एकतेच्या भावनेवर आधारित आहे. ज्यामध्ये स्वातंत्र्याचा सार 'स्वच्छता व सुजलता' या संकल्पनेशी जोडली गेली आहे.

ग्रामीण भागात स्वच्छ पाणी पुरवठा, शाश्वत स्वच्छता व आरोग्य सुनिश्चित करण्यासाठी वाश (पाणी, स्वच्छता आणि आरोग्य) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या मोहिमेत स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) व जल जीवन मिशन अंतर्गत गावे/ ग्रामपंचायतमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत .त्यामध्ये स्वच्छ सुजल गाव प्रतिज्ञा,सार्वजनिक स्वच्छता मोहीम, वाश मलमत्तेची स्वच्छता, जनजागृती उपक्रम, जलसंवर्धन व दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी सार्वजनिक स्थळे आदी प्रमुख पायाभूत सुविधांच्या ठिकाणी ध्वजारोहण करावा, यासाठी गट विकास अधिकारी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन ही मोहीम पार पाडणार आहेत, असेही प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सांगितले.

> याबाबत मोहिमेसाठी हॅशटॅग HarGharSwachhta व HarGharTiranga आहे.या करिता मोहिमेच्या अनुषंगाने केंद्र शासन स्तरावरून साहित्य व डिझाईन तालुक्यांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.या मोहिमेत जिल्हा,तालुका,ग्रामपंचायत,गावागावांमधील लोकांचा सक्रिय आणि उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे. स्थानिक स्वराज्य संस्था तसेच शालेय विद्यार्थी,स्वयंसेवक तसेच सर्वांनी या मोहिमेत सहभागी व्हावे
>
> **- अमोल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)**



# जबरी चोरी करणाऱ्या दोघांना अटक

### ▸▸२ लाखांचा मुद्देमाल जप्त; शहर गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण धुम स्टाईलने जबरदस्तीने चोरून नेणाऱ्या दोघांना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून २ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आदित्य रमेश कोणदे (वय १९, रा. हत्तुरे वस्ती, सोलापूर) आणि पृथ्वीराज श्रीशैल पुजारी (वय १९, रा. सैफुल, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत इंदुबाई तानाजी कांबळे (रा. विष्णुमिल चाळ, डोणगाव रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ ऑगस्ट रोजी सायंकाळी इंदुबाई कांबळे या त्यांचा भाऊ यांच्यासोबत मोटारसायकलवरून विष्णु मिल चाळीकडे येत होत्या. त्यावेळी नागोबा मंदीरजवळ दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी कांबळे यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसका मारून चोरून नेले होते.

या गुन्ह्याचा तपास करताना गुन्हे शाखेच्या पोलिसांना या गुन्ह्यातील संशयित हे होटगी रोडवरील तुळजाई लॉन्सजवळच्या मोकळ्या मैदानात थांबलेले असताना दोघांना दुचाकीसह ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यावेळी त्यांनी जबरी चोरीचा गुन्हा केल्याचे कबुल करून गुन्ह्यातील सोन्याचे गंठण काढून दिले. या दोघांना सलगर वस्ती पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विजय पाटील, दत्तात्रय काळे, अमंलदार जावेद जमादार, महेश शिंदे, अजिंक्य माने, राजु मुदगल, धीरज सातपुते, आबाजी सावळे, कुमार शेळके, महेश पाटील, विठ्ठल यलमार, काटे, काळे व सायबर पोलिस ठाण्याकडील प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.

# ठोकळ प्रशालेतील विद्यार्थ्यांनींनी बनवल्या भारतीय जवानांसाठी राख्या



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात रक्षाबंधनाच्या निमित्ताने एक आगळावेगळा आणि देशप्रेम जागवणारा उपक्रम राबवण्यात आला. इयत्ता पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांनींनी आपल्या कुशलतेचा वापर करून भारतीय जवानांसाठी स्वहस्ते ७०० राख्या तयार केल्या.

या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी अल्प वेळेत आणि सहज उपलब्ध साहित्याचा वापर करून अत्यंत आकर्षक आणि सृजनशील राख्या तयार केल्या. विद्यार्थ्यांमधील कलेला चालना देत त्यांच्यात देशभक्तीची भावना जागवण्याचा हा प्रयत्न होता. राखी तयार करण्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये सहशिक्षिका चव्हाण पी.एच. यांनी विद्यार्थ्यांनींना मार्गदर्शन केले. सहशिक्षिका जे.व्ही. शाबादी, व्ही. एस. गायकवाड व जाधव ए.यू.यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम साकार करण्यात मोलाची भूमिका बजावली.

उपक्रमाचे आयोजन प्राचार्य श्री. डी. डी. गाजरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. आयोजनाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती निर्मला ठोकळ, अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे व संचालिका शिल्पा ठोकळ यांनी विद्यार्थी तसेच शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.



**धावत्या ट्रॅक्टरवरील लोखंडी पाईपचा विद्युत तारेशी संपर्क झाल्याने**

# ट्रॅक्टरमधील दोघांचा विजेचा शॉक लागून मृत्यू

### गुरुवारी दुपारची हत्तुर शिवारातील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

धावत्या ट्रॅक्टरवरील लोखंडी पाईपचा विद्युत तारेशी संपर्क झाल्याने ट्रॅक्टरमधील दोघांचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी दुपारची हत्तुर शिवारात घडली.

बसवराज चिदानंद पाटील (वय ३४) आणि रविकांत धोंडप्पा नाईकवाडे (वय ३७, दोघे. हत्तुर, ता. दक्षिण सोलापूर) अशी मरण पावलेल्या दोघांची नावे आहेत.

बसवराज पाटील व रविकांत नाईकवाडे हे त्यांच्याकडील ट्रॅक्टर ट्रॉलीमधून खत भरून आणून शेतामध्ये टाकण्याचा व्यवसाय आहे. गुरुवारी दुपारी पाटील व नाईकवाडे हे त्यांच्या ट्रॅक्टर ट्रॉलीमधून हत्तुर शिवारातील शेतात खत




टाकण्यासाठी जात होते. त्यावेळी ट्रॅक्टरवरील लोखंडी पाईपचा रस्त्यावरुन जाणाऱ्या विद्युत तारेशी संपर्क झाला.

त्यामुळे विद्युत तारेतील वीजेचा प्रवाह हा ट्रॅक्टरमध्यू उतरला आणि पाटील व नाईकवाडे या दोघांना वीजेचा शॉक लागला. यामध्ये दोघेही भाजून गंभीर जखमी झाल्याने त्यांना बेशुध्दावस्थेत उपचारासाठी सोलापूरातील मार्कडेंय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी डॉक्टरांनी त्या दोघांनाही मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.






# कुचन हायस्कूलच्या मैदानात साकारली श्री मार्कंडेय महामुनींची भव्य चित्रकृती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

अखिल भारत पद्मशाली युवजन संघमचे अध्यक्ष श्रीनिवास संगा व सचिव श्री महेश जिंदम यांच्या संकल्पनेतून तसेच चित्रकार श्री विपुल मिरजकर व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मेहनतीतून साकारण्यात आलेल्या भव्य श्री मार्कंडेय महामुनी यांच्या भव्य २६०X१६० फूट चित्रकृतीच्या उपक्रमाचा उद्घाटन सोहळा महाराष्ट्र राज्य पद्मशाली संघम, सोलापूर पद्मशाली ज्ञाती संस्था, सोलापूर पद्मशाली शिक्षण संस्था, सोलापूर पद्मशाली युवक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने अतिशय उत्साहात पार पडला.

ढोल ताशाच्या गजरामध्ये ध्वजारोहण तसेच मार्कंडेय पूजन करून पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दशरथ गोप तसेच पद्मशाली समाजातील प्रतिष्ठित श्री किशोर संगा यांच्या हस्ते व पद्मशाली न्याती संस्थेचे विश्वस्त मुरलीधर आरकाल, नरसय्या इप्पाकायल, रामचंद्र जन्नू, रामकृष्ण कोंड्याल, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, सचिव संतोष सोमा, कार्यकारी सदस्य श्रीधर सुरा महाराष्ट्र पद्मशाली संघमचे अध्यक्ष भूपती कमटम व




सचिव यशवंत इंदापुरे अखिल भारत पद्मशाली महिला संघमच्या उपाध्यक्षा सरिता वडनाल तसेच महाराष्ट्र पद्मशाली महिला संघमचे अध्यक्षा सौ संगीता इंदापुरे अखिल भारतीय पद्मशाली संघम चे सचिव प्रदीप संगा यंत्रमाग संघमचे अंबादास बिंगी पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष शेखर कटकम, सोमवंशी क्षत्रिय समाजाचे प्रतिष्ठित संतोष बसूदे यांच्या उपस्थितीत तसेच श्री संतोष चन्ना पंतुलु , वेणूगोपाल मालपुरी पण पंतुलु व सहकारी पुरोहित वृंदांच्या मार्गदर्शनाखाली हा उद्घाटन सोहळा पार पडला.

याप्रसंगी अखिल भारत पद्मशाली युवजन संघमचे अध्यक्ष श्रीनिवास भाऊ संगा यांनी पद्मशाली ऐक्याचे व गौरवाचे प्रतीक असलेल्या या ऐतिहासिक भव्य चित्रकृतीचे सोलापुरातील भाविकांनी दर्शन घेण्याचे आवाहन केले. ही भव्य चित्रकृती व हा उद्घाटन सोहळा पार पाडण्यासाठी पद्मशाली समाजातील युवक ॲड. संदीप संगा, पिंटू संगा, अमर बोडा, अशोक सामल नागेश जिगजारला, महेश कल्याणम, अंबादास कुडक्याल, प्रकाश सामल, श्रीनिवास यलगम, किसन पासकंटी, बालाजी श्रीचिप्पा, श्रीनिवास सब्बन, गोवर्धन पासकंटीं, विजय जटला, चिन्ना मंगळारम, रोहित कोंडा, अमोल पराळकर, उमाकांत बिटला, श्रीनिवास परकीपंडला, निखिल चेन्नुर यांनी परिश्रम घेतले... या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ रेणुका बुधारम व अँकर सौ नर्मदा यांनी केले..

## महत्वाचे...



### बुद्धिबळ स्पर्धेत एमआयटी विश्वशांती गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे यश

**सोलापूर, दि.८ ऑगस्ट**

विवेकानंद पब्लिक स्कूल, बार्शी रोड, सोलापूर येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल, सोलापूरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. १४ वर्षाखालील मुलांमध्ये आरुष दिवटे (इ.८वी), श्लोक गुंड (इ.८वी), रणवीर पवार (इ.७वी) १४ वर्षाखालील मुलींमध्ये मुक्ताई बोधले (इ.७वी), सई पाटील (इ.७वी), सृष्टी दिवटे (इ.६वी). १७ वर्षाखालील मुलांमध्ये सत्यम पवार (इ.८वी), तुकाराम जानगवळी (इ.१०वी). यशाबद्दल मुख्याध्यापिका सौ. रेखा पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच क्रिडाशिक्षक अजय पारीक, राहुल जाधव व अश्विनी पांढरे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.



### स्वराज्य माहिती अधिकार संघटनेतर्फे मार्गदर्शन शिबीर मेळावा

**सोलापूर, दि.८ ऑगस्ट**

स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटना सोलापूर जिल्ह्याचा ५१ नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार, म ार्गदर्शन शिबीर आणि मेळावा पार पडला. मेळाव्याचे उदघाटनप्रसंगी माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत, स्वराज्य चे संस्थापक तथा राष्ट्रीय महासचिव कमलेश शेवाळे, प्रदेशाध्यक्षा धनश्री उत्पात, विश्वस्त उमेश काशीकर, संचालक श्रीकांत देशपांडे, जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत नूतन जिल्हा कार्याध्यक्ष सुनील पंडित यांनी केले तर प्रास्ताविक स्वराज्यचे जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांनी केले. जिल्ह्यातील ११ तालुका व ११ शहरातील नूतन ५१ पदाधिकाऱ्यांचा सत्कार सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नूतन जिल्हा कार्याध्यक्ष सुनील पंडित, उपाध्यक्ष राजेंद्रकुमार रघोजी, सचिव सुधाकर शहाणे, सहसचिव दीपक कुरुलकर, सदस्य किशोर बेजगम, सहसंपर्क प्रमुख गजानन सोनार, जिल्हा समन्वयक रोहित उपलाई कर, ॲड. सुमित रघोजी, ॲड. राहुल गायकवाड, वैकुंठ जडल, डॉ. भालचंद्र निकम, दिलिप क्षीरसागर, प्रसिद्दी प्रमुख अशोक मैंदर्गीकर यांनी परिश्रम केले. यावेळी जिल्हा प्रभारी इफ्तेकार कामतीकर, जिल्हा महिला अध्यक्ष अर्चना कांबळे, उपाध्यक्ष सपना कांबळे, शहर अध्यक्ष विनोद भोसले, सचिव प्रकाश चव्हाण, शहर कार्याध्यक्ष दत्तात्रय दळवी, स्मिता पाठक आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन नीता रघोजी व किशोर बेजगम यांनी केले. आभार अशोक मैंदर्गीकर यांनी मानले.

### कुत्रा आडवा आल्याने तरुण जखमी

**सोलापूर, दि.८ ऑगस्ट**

मरीआई चौक ते बसवेश्वर नगरकडे जाताना दुचाकीच्या आडवा कुत्रा आल्याने दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तरुण जखमी झाला. हा अपघात बुधवारी रात्री ८ च्या सुमारास घडला. प्रविण नामदेव पवार (वय २१, रा.वसवेश्वर नगर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. बुधवारी रात्री आठच्या सुमारास प्रविण हा दुचाकी चालवित मरीआई चौक येथून दुचाकीवरून बसवेश्वर नगराच्या दिशेने जात होता. दरम्यान जगताप हॉस्पीटलसमोरील रस्त्यावर अचानक कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून तो खाली पडला. यात त्याच्या चेहर-याला जखम झाली. नातेवाईक अभिषेक पवार याने रात्री ८.४५ च्या सुमारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




# जिल्ह्यात ‘लम्पी’ने घेतला ५७ जनावरांचा बळी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. ८ ऑगस्ट-**

जिल्ह्यात जनावरांचा लम्पी त्वचारोगाचा फैलाव वाढत असून, आतापर्यंत एक हजार नऊशे ६५ जनावरांना या आजाराची लागण झाली आहे. जिल्हा पशूसंवर्धन विभागाकडून लसीकरण , उपचार व विलगीकरण यासह विविध उपाय राबविण्यात येत आहेत. पावसाळ्यात लम्पीवर नियंत्रण मिळविण्यासाठी येत्या काळात बाधित जनावरांची संख्या कमी करण्यासाठी पावले उचलण्यात येत आहेत. एकूण १ हजार नऊशे ६५ जनावरांपैकी १४६७ जनावरे उपचारानंतर बरी झाली आहेत, तर ५७ जनावरांचा मृत्यू झाला आहे.

सध्या ४४१ जनावरे या आजाराने बाधित असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पशुसंवर्धन विभागाकडून युद्धपातळीवर उपाययोजना राबवल्या जात आहेत. लम्पी हा विषाणूजन्य आजार डास आणि माश्यांद्वारे गाय व म्हैस यांना होतो. या आजारात जनावरांच्या त्वचेवर गाठी, ताप आणि दुधाचे उत्पादन कमी होणे अशी लक्षणे दिसतात. ज्या जनावरांचे लसीकरण बाकी आहे, त्यांना तातडीने लस देण्याचे काम सुरू आहे. यामध्ये बाधित क्षेत्रात जैवसुरक्षा उपाय, जनावरांचे विलगीकरण आणि लसीकरणावर भर दिला जात आहे. जनावरांमध्ये लम्पीची लक्षणे आढळल्यास पशूपालकांनी तातडीने नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधण्याचे आवाहन पशूसंवर्धन विभागांनी केली आहे.

जिल्ह्यातील जनावरांना प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मान्सूनपूर्व लसीकरण करण्यात आली आहे. जनजागृतीसाठी गावोगावी मोहिमा राबवल्या जात आहेत. लम्पीचे लक्षणे आढळल्यास शेतकऱ्यांनी घाबरून न जाता पशूसंवर्धन अधिकार्यांशी संपर्क साधावे. लसीकरण आणि वेळीच उपचार केल्यास हा आजार नियंत्रणात येऊ शकतो.

**- डॉ. विशाल येवले, उपआयुक्त , जिल्हा पशुसंवर्धन**

**माळशिरस तालुक्यात सर्वाधिक लम्पीग्रस्त जनावरे**

जिल्ह्यात लम्पीग्रस्त जनावरे माळशिरस तालुक्यात ११० बाधित तर १३ जनावरे मृत्यू असल्याने सर्वाधिक प्रमाण आहे. त्यानंतर पंढरपूर तालुक्यात ८३ बाधित तर ११ मृत्यू जनावर संख्या आहे.

| तालुकानिहाय लम्पीग्रस्त जनावरे | |
|---|---|
| अक्कलकोट | बाधित १७, मृत्यू ४ |
| बार्शी | बाधित १ |
| करमाळा | बाधित ३१, मृत्यू १० |
| माढा | बाधित ३२, मृत्यू २ |
| माळशिरस | बाधित ११०, मृत्यू १३ |
| मंगळवेढा | बाधित ६३, मृत्यू ७ |
| मोहोळ | बाधित ५, मृत्यू १ |
| पंढरपूर | बाधित ८३, मृत्यू ११ |
| सांगोला | बाधित ७७, मृत्यू ३ |
| उत्तर सोलापूर | बाधित ६, मृत्यू २ |
| दक्षिण सोलापूर | बाधित १६, मृत्यू ४ |
| एकूण बाधित | ४४१ |
| मृत्यू | ५७ |



# विष्णूपंत कोठे यांच्या जयंतीनिमित्त आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. ८ ऑगस्ट-**

स्व. विष्णूपंत कोठे मेमोरियल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर आणि डॉ. कोठेज गॅस्ट्रो, लिव्हर केअर सेंटर यांच्यावतीने स्व. विष्णूपंत कोठे यांच्या जयंतीनिमित्त गॅस्ट्रोएंट्रॉलॉजिस्ट डॉ. सूर्यप्रकाश राजेश कोठे यांच्या मार्गदर्शनानुसार पोलीस मुख्यालय येथे आरोग्य शिबिर संपन्न झाले.

शिबिर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते आणि उपायुक्त विजय कबाडे, गौर हसन, अश्विनी पाटील, सहाय्यक पोलीस उपायुक्त सुधीर कराडकर, डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्व विष्णूपंत कोठे स्व. महेश कोठे, स्व. राजेश कोठे यांच्या प्रतिमांचे पूजन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

प्रास्ताविक आयोजक डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी केले. यावेळी डॉ. विठ्ठल धडके, डॉ. अमजद सय्यद डॉ. अभिजीत चिचोंळी डॉ. लता पाटील डॉ. श्रीकांत पाटणकर डॉ. प्रभाकर होलीकट्टी, डॉ. दिगंबर गायकवाड, डॉ. अमृत बोल्ली, डॉ. कौस्तुभ कंदले, डॉ. दिनेश पडगीमल, डॉ. वेदीका पडगीमल, संतोष चिवडशेट्टी आदी डॉक्टरांचा देखील सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर सुवासिनी कोठे, श्रुती कोठे, डॉ. राधिका कोठे-चिलका, नगरसेवक प्रथमेश कोठे, श्रीनिवास चिलका, व्यंकटेश चिलका, विनायक कोंड्याल, वासुदेव इप्पलपल्ली यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ अमजद सय्यद, डॉ. विठ्ठल धडके यांनी मनोगत व्यक्त केले. आभार डॉ. राधिका चिलका यांनी मानले. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांचे मानसिक आरोग्य व आहार विहार याविषयी तज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी ४०० हून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शिबिराचा लाभ घेतला व शिबिराच्या आयोजनाबद्दल डॉ. सूर्यप्रकाश कोठे, कोठे परिवार व सर्व तज्ञ डॉक्टरांचे आभार व्यक्त केले. सूत्रसंचालन मंगेश लाम काने यांनी केले

## ड्रेनेजच्या मॅनहोलमध्ये पडून ९ वर्षीय मुलाचा मृत्यू

### देसाई नगरमधील वीटभट्टीजवळील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**



शहरातील एमआयडीसी परिसरातील देसाई नगरमधील सुनिल बळी यांच्या वीटभट्टीजवळील थोबडे यांच्या प्लॉटींगच्या कंम्पाऊंटमध्ये असलेल्या ड्रेनेजच्या मॅनहोलजवळ साचलेल्या घाण पाण्याच्या डबक्यामध्ये बुडून ९ वर्षीय बालकाचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली.

अहिल उस्मान शेख (वय ९, रा. देसाई नगर, मुजावर दवाखाना पाठीमागे, नई जिंदगी, सोलापूर) असे मरण पावलेल्या बालकाचे नाव आहे. गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास देसाई नगरमधील सुनिल बळी यांच्या वीटभट्टीजवळील थोबडे यांच्या प्लॉटींगच्या कंम्पाऊंटमध्ये असलेल्या ड्रेनेजच्या मॅनहोलजवळ साचलेल्या डबक्यातील घाण पाण्यामध्ये अहिल शेख हा बेशुध्दावस्थेत मिळून आला. याबाबत माहिती मिळताच एमआयडीसी पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार एस एन गायकवाड यांनी अहिल शेख यास पाण्यातून बाहेर काढून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. शितलकुमार यांनी अहिल यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### वीरशैव लिंगायत व जंगम समाजातील पोटजातींचा सोलापुरात वधू- वर मेळावा

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

अनुरूप वधू-वर सूचक केंद्राच्या वतीने वीरशैव लिंगायत व जंगम समाजातील सर्व पोटजातींचा रविवार दि. १७ ऑगस्ट रोजी शिवस्मारक सभागृहात राज्यस्तरीय प्रथम, घटस्फोटीत, विधवा, पुनर्विवाह, इच्छुक वधू-वरांचा राज्यस्तरीय मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

मेळाव्यातील नोंदणी धारकांना रंगीत पुस्तिका घरपोच देण्यात येणार आहे. मेळावा पुस्तिका प्रकाशन २५ ऑगस्ट रोजी होणार आहे. मेळाव्यातील नावनोंदणीसाठी कार्यक्रमाच्या ठिकाणी सकाळी दहा ते बारा या वेळेत नोंदणी करता येईल. पालकांनी उपवर मुला- मुलीसह एक फोटो व बायोडाटा सोबत घेऊन यावयाचा आहे. मेळाव्याची नोंदणी चालू असून पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, कोकण, तेलंगणा, कर्नाटक, येथील वधू-वरांनी नोंदणी केली आहे. अधिक माहितीसाठी अनुरूप वधु वर सुचक केंद्र,ए. डी. जोशी पेट्रोल पंपा जवळ, जुळे थील कार्यालयात किंवा ९८८११३३१२२ या नंबरवरती संपर्क साधावा, असे आवाहन राजेश मनगीरे यांनी केले आहे.

## पी.बी.ग्रुपच्यावतीने सामुदायिक रक्षाबंधन महासोहळा

**● राष्ट्रवादीचे काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांचा पुढाकार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**



प्रबुद्ध भारत चौक, मिलिंद नगर, बुधवार पेठ येथे शुक्रवारी सकाळी १० वाजता प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महानगरपालिकेचे उपायुक्त रवी पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये विविध शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या उपस्थितीमध्ये 'सामुदायिक रक्षाबंधन म हासोहळा' उत्साहात पार पडला.

मान्यवर आणि विविध शाळेतील विद्यार्थिनींच्या वतीने येथे जमलेल्या विद्यार्थ्यांना कुंकाचे तिलक लावून राखी बांधण्यात आले. यावेळी आवेक्षक शाम कन्ना यांची पदोन्नती होऊन विभागीय अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक गणेश पुजारी, इथास कंपनी संचालिका अंजली वाघमारे, श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेचे गांधी, डहाळे, संजय पंडित, रावजी सखाराम हायस्कूलचे मुख्याध्यापक केत, रावजी सखाराम प्राथमिक शाळेचे तेली, डांगे, अंजली प्रचंडे, कल्पना सर्वगोड, गोरे, शेख ,वडावराव, अंधारे, तकडे, दमाणी विद्या मंदिर प्रशालेचे शिंदे, बंडगर, जमखंडी, ईश्वरकट्टी, मनपा मुलांची शाळा क्रमांक ११ रीतपुरे, कुंभार, मनपा मुलांची २७ नंबर शाळेचे इंगोले उपस्थित होते. कार्यक्रमास मुख्य आरोग्य निरीक्षक नरसिंग बच्चू, मुख्य आरोग्य निरीक्षक नागेश मेंडगुळे, एस.आय. ताकभाते, भारत बाबरे, अविनाश भडकुंबे, चंद्रकांत सोनवणे, भारत केत, स्मिता फताटे, अश्विनी काळे, कल्पना सर्वगोड, स्नेहा पवार, कुंभार एस.एस., प्रिया व्यवहारे, ॲड. स्वाती मस्के, अमोल अंधारे, प्रकाश सावंत, श्याम कन्ना, बाळासाहेब जगताप, संजय पंडित, महेश जवंजाळ, सुनील गायकवाड, एच.टी. रणदिवे, तकडे ए.जी., ॲड. विशाल मस्के, धीरज वाघमोडे, गौतम नागटिळक मान्यवरांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन व आभार श्रीमंत जाधव यांनी केले.

### आहार: का, कसा, किती, केव्हा, कुठे ? यावर दुसरे व्याख्यान उद्या

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

दि. १० ऑगस्ट रोजी आहाराविषयी व्याख्यान मालेचे दुसरे व्याख्यान होणार आहे. योगसेवा मंडळातर्फे सकाळी ६ ते ७ या वेळेत शिवस्मारक येथे हे व्याख्यान होणार आहे.

या रविवारच्या सत्रात आहार कसा असावा व किती घ्यावा या विषयी माहिती देण्यात येईल. सर्वांना सहजतेने व नियमित अमलात आणता येईल आणि त्यातून हवा तो परिणाम कसा साधता येईल याचे मार्गदर्शन योगाचार्य मनमोहन भुतडा, योग थेरपिस्ट हे करणार आहेत. आरोग्याविषयी आस्था असणाऱ्या सर्वांनी याचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन योगसेवा मंडळाचे सर्वश्री सुनील आळंद, संतोष सासवडे, दत्तगुरू वेदपाठक, सुभाष जोशी व वासंती निंबाळकर व विद्या होनमोडे यांनी केले आहे

# आई : जन्मभराची शिदोरी

आई असते जन्मभराची शिदोरी ! ती सरतही नाही आणि उरतही नाही. आई असते, तोवर आपण खूप लहान असतो आणि ज्या क्षणी ती निघून जाते, तेव्हा आपण अचानकपणे खूप मोठे झालेलो असतो. अशीच एक आई. माझे भारतीय स्टेट बँकेचे सहकारी आणि जवळचे मित्र निवृत्त उप महा व्यवस्थापक (Deputy General Manager) श्री. रामदास नरसू वाडकर यांच्या मातोश्रींचे. कै. सौ. पद्मिनी नरसू वाडकर यांचे मागच्या वर्षी १९ ऑगष्ट २०२४ ला निधन झाले. त्यांचे आज प्रथम पुण्यस्मरण त्यानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस ही शब्दसुमनांजली. खरंच कुणीतरी सेलिब्रिटी वगैरे असलं ना की, त्यांच्याविषयी खूप खूप बोललं जातं लिहिलं जातं, पण सर्वांना, अगदी सामान्य वाटणाऱ्या व्यक्तीही किती असामान्य असतात ना? मात्र त्यांचा परिचय समाजाला होत नाही. तेच या मातोश्रींच्या परिचयातून जाणवतं आणि त्यांच्या विषयी कांहीं सेवा आधारित व त्याग आधारित लिखाण सादर करावं हाच विचार म्हणून हा लेख प्रपंच.

मातोश्री पद्मिनी यांचा जन्म तुळजापूर तालुक्यातील खंडाळकरवाडी येथे झाला. त्यांचे वडील सखाराम खंडाळकर हे स्वच्छ प्रतिमेचे कष्टाळू व प्रगतशील शेतकरी होते. त्यांना एकच मुलगा आणि एकच कन्या. पद्मिनीचा विवाह सोलापूर जवळील कासेगाव येथील श्री. नरसू काशिनाथ वाडकर यांच्याशी १९६० मधे झाला. त्यांना पुढे चार मुलं झाली. मोठे रामदास जे भारतीय स्टेट बँकेतून उच्चपदस्थ म्हणून निवृत्त झाले. दुसरे हरिदास प्रगतशील शेतकरी आहेत. तिसरे डॉ. लक्ष्मण सध्या विधी महाविद्यालायेच प्राचार्य आहेत. सर्वात लहान शिवदास जे पत्रकार व शेतकरी आहेत.

पद्मिनी निरक्षर असल्या तरीही त्यांच्यावर उत्तम संस्कार झाले होते. त्यामुळे सुशिक्षित नसल्या तरी सुसंस्कारीत होत्या. घरात एक स्त्री जर जागरूक असेल, तर संपूर्ण घर हे सुशिक्षित होतं. त्याचंच प्रत्यंतर पद्मिनीच्या आयुष्यात दिसते. त्यांची सगळी मुलं नुसतीच साक्षर किंवा सुशिक्षित झाली नाहीत तर उच्चपदस्थ झाली आणि मूल्याधिष्ठित जीवनाचे वलय त्यांनी निर्माण केले आहे. महिलांना खूप काबाडकष्ट करून संसाराचा गाडा ओढावा लागत असायचा. त्याला ही माऊलीही अपवाद नव्हती. रोज विहिरीतून पोहता येत नसतानाही पाणी काढणं. धुणी, भांडी, आंघोळी, स्वयंपाक, म्हणजे किती पाणी लागत असेल? त्यानंतर घरातली दैनंदिन अशी सगळी कामं करून शेताला जायचे. तीही जबाबदारी त्यांनी पूर्ण केली. शिवाय वारकरी संप्रदायाचं घराणं असल्याने घरात अतिशय धार्मिक वातावरण होतं. त्यामुळे रोज सायंकाळी पोथीला किंवा कीर्तनाला मंदिरात जायचं, हा त्यांचा नियमच होता. अगदी पहाटे चार साडेचारला उठून घरची सगळी कामे आटोपून शेतात पतीच्या मदतीला जात असताना, या माऊलीने खूप कष्ट सहन केले. माहेरी संपन्नता होती. पण त्या तुलनेत सासरी मात्र अतिशय काबाड कष्टाचं जीवन त्यांना जगावं लागलं. खेडं असल्यामुळे तिथे शाळा नव्हती आणि मुले सोलापूरला शिकत होती. तेव्हा रोज पहाटे साडेचार वाजता उठून नित्य कामासोबतच मुलांचे रोजचे डबे त्या तयार करायच्या व मुलांची आर्थिक व बौद्धिक तयारी करायच्या. हा नित्यनेम त्यांनी सतत तीस वर्षे अविरतपणे पूर्ण केला.



**इथे वेदना नद्या जाहल्या तिच्या व्यथांच्या**
**तरी न भरला स्त्री दुःखाचा सागर येथे**

स्त्री आणि दुःख हा कदाचित समानार्थी शब्द असावा. जन्मभर कष्ट, कष्ट आणि कष्टच त्यांनी उपसले. काही वेळा स्त्रीच्या वागण्याला वेडेपणा म्हटलं जातं. ही माऊलीही अशीच वेडी होती. कारण आयुष्यभर सासू-सासऱ्यांच्या आधी आणि नवऱ्याच्या आधी यांनी कधीही भोजन केलं नाही. मग त्या अनेक प्रसंगी कितीतरी वेळा उपाशी राहणार. हे त्यांच्या पाचवीला पुजलेलं होतं. पद्मिनी निरक्षर होती परंतु अशिक्षित नव्हती. त्यामुळेच संत ज्ञानेश्वर म हाराजांचे आणि तुकाराम महाराजांचे २०० हून अधिक अभंग त्यांना मुखोद्गत होते. संत ज्ञानेश्वर महाराजांचा हरिपाठ, ज्ञानेश्वरीचं त्यांना ज्ञान होतं. बरं, घरी धार्मिक वातावरण म्हणून अभंगापर्यंतच त्यांचं पाठांतर मर्यादित नव्हतं, तर माणिक वर्मापासून, लता मंगेशकर, आशा भोसले या सर्वांची गाणी त्यांना पाठ होती. त्या इथेच थांबल्या नाहीत तर कोणत्या गाण्याचे गायक आणि कवी कोण आहेत हेही त्यांना ठाऊक असे. ही गोष्ट वाटते तेवढी सोपी नाही यासाठी एक तर अभ्यास लागतो किंवा अतिशय तीक्ष्ण बुद्धिमत्ता लागते आणि मला असं वाटतं की, ही स्त्री विलक्षण बुद्धिमान होती. पण हे कुणाला सांगता येत नाही. यासंबंधीची एक गोष्ट रामदास ने मला सांगितली. ज्यावेळेस रामदास सर हैदराबादला स्टाफ कॉलेजला होते. तेव्हा आई पण तिथेच होती. मी सहज त्यांना विचारलं, आई तुमच्याकडे होती का ? तर ते म्हणाले, नाही ! मला आश्चर्य वाटलं. पण त्यांचं उत्तर होतं, मी आईकडे होतो. आईला मोठेपण देण्याचा, किती मुलं सुना असा विचार करतात? असो. हैद्राबादच्या रामोजी फिल्मीसिटीत त्यांची व रामदास यांची चुकामुक झाली. प्रसंगावधान राखून परक्या प्रांतात, भाषा येत नसतानाही एका निरक्षर स्त्रीने मुलाची भेट घडवून घेतली होती. दुसरा एक प्रसंग. आई त्यांच्या दुसऱ्या मुलासोबत नांदेड ते पुणे येथे आल्या. मुलगा टॅक्सी शोधायला जरा पुढे गेला. आईच्या स्वाधीन सर्व बॅगा होत्या. कोणीतरी ते बघत होतं. आणि मुलगा जरा दृष्टीआड झाला, तेवढ्यात तो माणूस आला आणि बॅगेला हात लावून चला म्हणू लागला. पण आई खमकी. तिने त्याला हिसडा देऊन सांगितलं की, खबरदार! बॅगेला हात लावायचा नाही. माझा मुलगा आला की मगच मी टॅक्सीत बसेन. हे प्रसंगावधान खूप मोठं होतं. कारण तो टॅक्सित बसा म्हणणारा नक्कीच चोर होता. अशा अनेक घटना घडल्या. पण विस्तार भयास्तव इथे सांगता येणार नाहीत. असो ! फक्त एवढंच सांगता येईल...

**मेंदीमध्ये तळहाताच्या रेषा लपल्या**
**कर्तृत्वाची उदास गाथा कुणास सांगू**

ही माऊली आपाल्या कर्तव्यापासून कधीच ढळली नाही. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत. गळ्यात तुळशीमाळ आणि मुखात कंठात हरिनाम. दारात तुळस आणि मनात पंढरीचा कळस घेऊनच ही माऊली जगली. पंढरपूरची आषाढीची पायी वारी कित्येकदा केलीय. शेवटपर्यंत निरोगी आयुष्य मातोश्री जगल्या. आयुष्यात कधीही त्या दवाखान्यात ॲडमिट झाल्या नाहीत किंवा मोठा असा कोणताही आजार त्यांना झाला नाही. अगदी चालता बोलता व फिरताना, सहज जरा बरं वाटत नाही म्हणून दवाखान्यात जात असताना वाटेतच हृदयविकाराच्या झटक्याने त्यांना मृत्यू आला. म्हणजे वृद्धापकाळत सहसा अंथरुणावर खितपत पडलेले जीव आपण बघतो. पण आपण असताना आणि नसतानाही कोणाला त्रास होऊ नये, हे जणू काही या माऊलीने ठरवलं होतं आणि म्हणून दवाखान्याची पायरीही न ओलांडता घरातून सजीवपणे बाहेर पडलेली ही व्यक्ती तेवढ्या सहजपणे घरातून, आपल्या चारही मुलांच्या खांद्यावरून कायमची बाहेर पडली. आज त्यांचं वर्षश्राद्ध. सर्व मुलांच्या, सुनांच्या, नातवंडांच्याच्या डोळ्यातले अश्रू अजूनही सुकलेले नाहीत. कारण या आठवणी अशाच असतात कायम मनावर कोरलेल्या. एकदा बोलत असताना माझे सहकारी व मित्र रामदास म्हणाले की, आईला मी आता माझ्याकडे घेऊन येणार आहे आणि तिच्या वृद्धापकाळात मी तिची सेवा करणार आहे. पण अचानक मला त्यांचा फोन आला आणि साश्रू डोळ्यांनी आणि गदगदलेल्या आवाजात त्यांनी बातमी दिली की आई गेली. आईचं हे कायमचं निघून जाणं मुलासाठी काय असतं, हे मी अनुभवलं आहे. माझी आई अशीच हिंडता फिरता, देवळातला घरी आलेल्या प्रसाद खाऊन स्वतःच्या हाताने माठातले पाणी पिऊन माझ्या भावाच्या खांद्यावर सहज मान टाकली आणि निघून गेली. मलाही तिची आठवण नेहमीच येते. मुली म्हणतात की, आई गेली आणि आमचं माहेर संपलं. तेच मुलांना वाटतं कारण मुलाची किंवा मुलीची आई ही फक्त आई असते. आईची जागा फक्त आईच घेते.' **स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी.** त्यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त विनम्र अभिवादन !

**शब्दांकन : प्रा. सुनंदा पाटील (मुंबई)**
मो.नं. ८४२२०८९६६६.
(माहिती स्त्रोत - श्री. रामदास नरसू वाडकर, उप महाव्यवस्थापक (निवृत्त), भारतीय स्टेट बँक, अहमदाबाद.)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ‘तरुण भारत’च्या वर्धापन दिनी मान्यवरांची उपस्थिती



सुनील पंडीत, चंद्रकांत वेदपाठक, राजेंद्रकुमार रघोजी, दत्तगुरू वेदपाठक | बंटी चंदनशिवे, अनिल वाघमारे, प्रशांत कटारे, श्रीशैल रणधिरे. | रसुल अत्तार, सरदार अत्तार, संदीप येरवडे, अरुण रोटे, अमोल साळुंखे | नितीन दिवाकर | गुरु वठारे



श्रीशैल भद्रशेट्टी | संतोष चंदेले | शरद येच्चे | संदीप जव्हेरी | शेखर फंड | महेश कुलकर्णी | विकास शेंड | ऐश्वर्या निंबाळकर | शोभना सागर | ओंकार बावडेकर | राहुल बावडेकर



रेवणसिद्ध मेंडगुदले | महेश मेंडगुदले | गौरव पिसे | दत्तात्रय मेनकुदळे | दत्ता माने | अमोल साळुंखे | आमसिद्ध व्हनकोरे | रामकृष्ण लांबतुरे | प्रा. शंकर नवले | तात्यासाहेब पवार | अविनाश कुलकर्णी



राहूल महाजन, चेतन चौधरी, कालिदास पवार, हर्षवर्धन कंडारकर, सुरेश चव्हाण. | मिलिंद कुलकर्णी | रमेश तावडे | ॲड. बसवराज सलगर | डॉ. उपासे | श्री. देशमुख | सज्जन निचळ | सतीश पाटील | विजय कुलकर्णी



धोंडप्पा रुपनर | श्रीकांत भरले | महेश आवताडे | विकास वाले | राजू राठी | प्रकाश वाले | श्री. गणेशकर | दत्तात्रय गणेशकर | मारुती कटकधोंड | गिरीष दुनाखे | चंद्रकांत कुलकर्णी | सुधाकर देशमुख



भाऊसाहेब वलेकर | बसवराज वाडे | श्रीधर खेडगीकर | ॲड. योगेश पवार | प्रा. गणेश देशमुख | ॲड. गोविंद पाटील | ॲड. बाबासाहेब देशमुख | प्रा. सुहास उघडे | विजय गायकवाड | रवि जक्का | धन्यकुमार देशमुख | विठ्ठल आहेरवाडी



श्री. जाधव | श्री. पोतदार | श्री. शिखरे | अमित पाटील | शंतनु गायकवाड | रविराज नष्टे | आरती अरगडे, स्मिता देशपांडे, प्रा. सौ. देशपांडे, वैभव कुलकर्णी, श्रीकांत कुलकर्णी व सहयोगचे सदस्य.



वर्षा कुलकर्णी | गोपीचंद व्हनमारे | दत्तात्रय पिसे | नितीन कवठेकर | गीता दंडी | लक्ष्मीकांत दंडी | सौ. एखंडे, वंदना कुलकर्णी व प्रा.श्रुती वडगबाळकर. | प्रभाकर क्षीरसागर आणि बार्शीच्या एकता महिला मंचच्या पदाधिकारी

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नारळी पौर्णिमानिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस अलंकार परिधान



**पंढरपूर, दि. ८ ऑगस्ट-**
नारळी पौर्णिमे निमित्त श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये श्री विठ्ठलास सोने मुकुट, नाम निळाचा, कौस्तुभ मणी, मोठ्या दंडपेट्या जोड, हि-याचा कंगन जोड, मोत्याची कंठी, मोत्याचा तुरा, लहान व मोठा शिरपेच, मत्स्य जोड, मोठी बोरमाळ, लक्ष्मीहार, तोडे जोड, मोहनमाळ, तुळशीची माळ तसेच श्री रूक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक राजेंद्र सुभेदार यांनी दिली.



**महत्वाचे...**

### हत्तरसंग येथे विवाहितेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग या गावी विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार गुरुवारी रात्री दहाच्या सुम ारास उघडकीस आला. ती विवाहिता शुध्दीवर असली तरी बोलत नाही अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. नागम्मा मल्लिनाथ शिंगे (वय २५, रा. हत्तरसंग ता द सोलापूर) असे विवाहितेचे नाव आहे. गुरुवारी रात्री दहाच्या सुमारा नागम्मा या त्यांच्या हत्तरसंगर येथील राहत्या घरी होत्या. त्यावेळी त्यांनी अज्ञात कारणातून घराच्या लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेण्याचा प्रयत्न केला. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी तिची गळफासातून सुटका करून मंद्रुप येथील सरकारी रुग्णालयात उपचारास दाखल केले. तेथून पुढील उपचाराकरीता शुक्रवारी रात्री एकच्या सुमारास पती मल्लिनाथ याने शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### छातीत दुखल्याने एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**
छातीत दुखू लागल्याने बेशुध्द झालेल्या व्यकतीचा मृत्यू झाला. हा प्रकार गुरुवारी रात्री दहाच्या सुमारास घडला. अनिल मल्लिकार्जुन लोखंडे (वय ४८, रा. न्यू लक्ष्मी चाळ, सोलापूर) असे मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. अनिल हे गुरुवारी रात्री १० च्या सुमारास छातीत दुखल्याने बेशुध्द झाले. त्यांना शुक्रवारी रात्री १.४५ वाजता भाऊ कैलास याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# तृतीयपंथींसाठी लवकरच बचतगट; नगरपालिकेचा पुढाकार

**पंढरपुरात वंचित समुहासाठी पायलट प्रोजेक्ट**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ ऑगस्ट -**
वंचित समूहाचा पायलट प्रोजेक्ट म्हणून पंढरपुरात तृतीयपंथीयांना जागा व घर मिळण्यासाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शासनस्तरावर पाठपुरावा केला जाणार आहे. येथील नगरपालिकेच्या कार्यालयात तृतीयपंथीयांच्या सोबत झालेल्या बैठकीत मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी तृतीयपंथी बांधवांच्या व्यथा जाणून घेऊन त्यांच्या बरोबर सकारात्मक चर्चा केली.


तृतीयपंथीयांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठी गुरुवारी येथील पालिकेतील मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात खास तृतीयपंथीयांच्या सोबत बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते. या बैठकीत मध्ये तृतीयपंथीयांचा बचत गट स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असून नगरपालिकेच्या वतीने त्यांना रोजगार देखील उपलब्ध करून दिला जाणार आहे. याचबरोबर वंचित समूहाचा पायलट प्रोजेक्ट म्हणून पंढरपुरात जागा व घर मिळणार असल्याची माहिती येथील आरपीआयचे दीपक चंदनशिवे, भाजपाच्या किसान सेलचे माऊली हळणवर यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. यावेळी मोठ्या संख्येने तृतीयपंथी बांधव उपस्थित होते. यावेळी माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव शिरसट, नगरसेवक विक्रम शिरसट, श्री यल्लमादेवी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष परसू पवार, रवी भोसले आदी उपस्थित होते. दरम्यान समाजातील या वंचित घटकाला न्याय मि ळवून देण्याच्या भावनेतून आरपीआयचे नेते दिपक चंदनशिवे तसेच भाजपाच्या किसान सेलचे जिल्हा प्रमुख माऊली हळनवर यांनी या तृतीयपंथी बांधवांना सोबत घेऊन काही दिवसांपूर्वी पालकमंत्री जयकुमार गोरे यांची देखील भेट घेतली होती. यावेळी तृतीयपंथी बांधवांनी आपल्या व्यथा पालकमंत्र्यांसमोर मांडल्या होत्या. त्यावेळी पालकमंत्री गोरे यांनी नगरपालिकेकडे सर्वांचे मागणी अर्ज द्या. बाकीचे मी स्वतः लक्ष घालून जागा व पंतप्रधान आवास योजनेंतर्गत तुम्हाला हक्काचे घर मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतो असे आश्वासन दिले होते.

त्यामुळे पालकमंत्र्यांच्या सूचनेवरून पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी तृतीयपंथीयांसोबत गुरुवारी बैठक बोलावून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांच्या सोबत सकारात्मक चर्चा केल्याने लवकरच पंढरपूरातील तृतीयपंथी बांधवाचे प्रश्न मार्गी लागणार असल्याच्या आशा निर्माण झाल्या आहेत.



**अत्यंत हिन दर्जाचे जीवन नशिबी :** तृतीयपंथी व्यक्तींकडे बघण्याचा दृष्टिकोन समाजात वेगवेगळा आहे. काही लोक त्यांच्याकडे सहानुभूतीने आणि समजूतदारपणे पाहतात, तर काही लोक अजूनही त्यांना स्वीकारायला तयार नाहीत. पंढरपूर नगरपालिका हद्दीत वास्तव्य असलेल्या अशा तृतीयपंथी मंडळींना भाड्याने घर मिळत नसल्याने घरच्या मंडळींकडून देखील त्यांना तिरस्कारची वागणूक मिळते. त्यामुळे तृतीयपंथीयांना आपल्या गुरुच्या घरी छोट्याशा खोलीत दहा ते पंधरा जण एकत्र राहून अत्यंत हिन दर्जाचे जीवन जगावे लागत आहे. रस्त्यावर व बाजारात मागून मिळेल त्यावर गुजराण करावी लागत असल्याचे विदारक चित्र या बैठकीच्या निमित्ताने अनेक तृतीयपंथीयांनी आपल्या व्यथा मांडताना समोर आले.






## संपूर्ण विश्वाचे मूळ परमसत्य होय : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**बार्शी, दि. ८ ऑगस्ट-**

श्रीमद्भागवतातील प्रथमच श्लोक हा एक दिव्य मंगलाचरण आहे. या श्लोकात भगवान वेदव्यासांनी ज्या स्वरूपाचे ध्यान करावे, असे सूचित केले आहे, त्याचा आशय असा- 'जे परमसत्यस्वरूप तत्त्व आहे, त्याचे आम्ही ध्यान करतो.' परंतु, येथे एक अत्यंत सूक्ष्म आणि महत्त्वपूर्ण प्रश्न उभा राहतो- हे परम सत्य कोण आहे?



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - १४

या प्रश्नाचे उत्तर श्लोकाच्या प्रारंभी आलेल्या सूत्रात दडलेले आहे- जन्माद्यस्य यतः - ज्याचा अर्थ असा की, 'ज्याच्यापासून या संपूर्ण चराचर जगाताची उत्पत्ती, स्थिती आणि लय घडते, ते जे मूलकारण आहे, तेच खरे परमसत्य तत्त्व होय.'

असे हे तात्त्विक विवेचन श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी श्रीमद्भागवत कथा चिंतनमालेच्या १४ व्या सत्रात प्रगट केले. घिमहि म्हणजेच ध्यान करतो, या शब्दात केवळ एक वैयक्तिक भावना नाही, तर वक्त्यासह श्रोत्यांनीही त्या परम सत्याचे स्मरण, चिंतन व नमस्कार करावा, असा संकेत आहे. तेच परम, तेच सत्य आणि तेच परमात्मस्वरूप, हेच या श्लोकाच्या माध्यमातून प्रकट होते. या ठिकाणी वस्तुनिर्देशक मंगलाचरण आहे. मंगलाची दिशा अमूर्त नसून, ती थेट एका विशिष्ट वस्तूकडे- परमात्म्याच्या स्वरूपाकडे निर्देश करते. या परम सत्याच्या संज्ञेच्या अनुषंगाने लक्षण या संकल्पनेचा विचार केला जातो. कारण कोणतीही वस्तू प्राप्त करण्याआधी, तिची ओळख करून घेणे आवश्यक असते आणि ही ओळख लक्षणाने घडते. उदाहरणार्थ, ती मुलगी स्वभावाने चांगली आहे- येथे स्वभाव हा शब्द तिच्या गुणाचे लक्षण ठरतो. या संदर्भात डॉ. जयवंत महाराज पुढे स्पष्ट करतात की, लक्षणे दोन प्रकारची असतात- तटस्थ लक्षण आणि स्वरूप लक्षण. तटस्थ लक्षण म्हणजे जे लक्षित वस्तूच्या ठिकाणी काही वेळ अस्तित्वात असते आणि काही वेळ नाही. उदा. एखाद्याच्या घराचा पत्ता सांगताना, 'ज्या घरावर पक्षी बसला आहे, ते घर त्यांचे आहे,' असे म्हटले, तर तो पक्षी तिथे तात्पुरता आहे- त्यामुळे हे लक्षण तटस्थ स्वरूपाचे आहे.

तर स्वरूप लक्षण म्हणजे जे नेहमीच त्या वस्तूशी निगडित असते. उदा.- 'गावातील पूर्वेकडील जे घर आहे, तेच त्यांचे आहे,' असे सांगितल्यास, दिशा ही कायम असते, त्यामुळे हे स्वरूप लक्षण ठरते. अशा प्रकारे लक्षणाचे तात्त्विक विश्लेषण महाराजांनी अत्यंत सुबोध भाषेत, उदाहरणांसह सप्रमाण उलगडले. यानंतर घट-पट, सुवर्ण व अलंकार यांसारख्या उपमांमधून त्यांनी कार्य-कारण सिद्धांताचे विश्लेषण केले. तसेच चर्मदृष्टी (इंद्रियनिष्ठ), तत्त्वदृष्टी (सत्त्वनिष्ठ), आणि समदृष्टी (ब्रह्मदृष्टी) या त्रिसूत्री माध्यमातून जगताचे मूळ कारण- जे एक अखंड, अजन्मा, सर्वव्यापक तत्त्व आहे- त्याचे सखोल विवेचन आजच्या प्रवचनात डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी भावपूर्ण पद्धतीने उकल केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस, रक्षाबंधन, ऑगस्ट क्रांतिदिन, जागतिक आदिवासी दिवस |
| दि. ९ ऑगस्ट २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८२ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४७ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - विश्वावसु | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - श्रावण | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| पौर्णिमा (१३.२४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वर्षा | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - श्रवण (१४.२३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - सौभाग्य (२६.१४) | |
| करण - बालव (२४.५०) | |

### राशीभविष्य

**मेष :** आर्थिक फायदा झाल्याने आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्यापिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**वृषभ :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नोकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**मिथुन :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वाहन चालवताना सावधानी बाळगली पाहिजे.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, मान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्यांची चिंता राहील. नोकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** उत्पन्न व खर्च याम ध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थिती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल. सुख समृध्दीत वाढ होईल.

**तुळ :** एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल. नोकरीत बढती मि ळण्याची शक्यता. प्रवासाचा योग आहे.

**वृश्चिक :** धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर.

**धनु :** कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल. सद्गुरुंची आराधनाने मन शांत होईल. मुलांच्या प्रगती मुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

**मकर :** घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे. आर्थिक देणेघेणे व्यवहारात सावधानी बाळगा. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कुंभ :** उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवू नका. आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. नोकरीतम ध्ये आपले महत्व वाढणार आहे. विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मीन :** आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. कोणाचाही राग करू नका. लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

# १९१ मिळकतींवर लवकरच चढविणार बोजा

### समितीने घेतला निर्णय

### मुदतीत थकबाकी न भरल्यास लिलावाची अंतिम प्रक्रिया होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

शहर आणि हद्दवाढ भागातील मिळकत कराच्या मोठ्या थकबाकीदारांची यादी महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडून तयार करण्यात आली आहे. या यादीतील १९१ मोठ्या थकबाकी मिळकतदारांची नावे निश्चित करण्यात आली असून या मिळकतींवर लवकरच बोजा चढविण्यात येणार आहे. या संदर्भातील निर्णय नुकतेच महापालिका आयुक्त अध्यक्ष असलेल्या आणि जिल्हा प्रशासनातील भूमी अभिलेख अधिकाऱ्यांसह आठ जणांच्या समितीने घेतला आहे. महापालिकेच्या थकीत मालमत्ता कर संदर्भात महापालिका प्रशासनाने कडक पावले उचलली असून या मिळकतदारांवर आता मोठी कारवाई करून त्यांच्याकडून थकीत कोणत्याही परिस्थितीत वसूल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मोठ्या थकबाकीदारांची १९१ मि ळकतदारांची यादी फायनल करण्यात आली असून प्रारंभी त्यामधील ६० बडे थकबाकी मिळकतदार यांच्यावर बोजा चढविण्याची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

येत्या आठवडाभरात १२ कोटी रुपयांच्या थकीत वसुलीसाठी त्या थकबाकी मिळकतदारांना नोटीस बजावण्यात येणार आहेत. यामध्ये इमारती आणि खुल्या जागांचाही सम वेश आहे. प्रथम त्यांना नोटीस देऊन संधी देण्यात येणार आहे तरीही थकीत न भरल्यास घेण्यात आलेल्या निर्णयानुसार त्यांच्या सातबारा उताऱ्यावर किंवा मालमत्ता पत्रिकेवर मिळकत कराचा बोजा चढविण्यात येणार आहे याउपरही थकित कर न भरल्यास पुढील आठवडाभरात मुदतीच्या नोटीसा बजावून लिलावाची प्रक्रिया पार पडली जाणार असल्याचे सहाय्यक



मालमत्ता कर मूल्य निर्धारण अधिकारी युवराज गाडेकर यांनी दिली. महापालिकेच्या मालमत्ता विभागाने बोजा चढविण्यासाठी काढलेल्या १९१ थकबाकी मिळकतदारांच्या यादीत औद्योगिक वसाहतीतील साईबाबा कॉटन वेस्ट स्पिनिंग मिल (५१ लाख ३४ हजार ६००), भीमाशंकर नगरातील ताजुद्दीन मोहियोदिन बेग व इतर (४१ लाख ७० हजार ६८०), राजहंस कॉम्प्लेक्स मधील सिद्धेश्वर इन्व्हेस्टमेंट पीव्हीटी लिमिटेड (११ लाख ४ हजार ५९७), खतीब कॉम्प्लेक्स मधील अर्फात बिल्डर, ए. आय. नदाफ (१८ लाख ४९ हजार ३२२), अनिरुद्ध ज्ञानेश्वर निरगुडे आणि महाराष्ट्र बँक (३४ लाख २५ हजार ४६०), रविकांत शंकरआप्पा पाटील (३१ लाख ४९ हजार ४३२), कुमठा नाका रोड इब्राहिम शब्बीर दुरगकर (१४ लाख ६६ हजार २६०), पाच्छापेठ येथील निलेश रामचंद्र उपाध्याय आणि इतर (१० लाख १९ हजार ९३०), भवानी पेठेतील एस व्ही एन प्रॉपर्टीज पार्टनर सुरेखा पंचप्पा कल्याणशेट्टी (२३ लाख ७५ हजार २१२) आणि (१२ लाख ४१ हजार १२७), जुळे सोलापुरातील लोकमान्य मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी (१४ लाख ८३ हजार ६५०), जुळे सोलापुरातील सुहास हुबरवाडी (२१ लाख ४३ हजार ४०८), अंबिका नगरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी महिला सहकारी कारखाना (३२ लाख ५५ हजार १९८), जय मल्हार नगर येथील श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण मंडळ (१० लाख १८ हजार ४२), मंगळवेढा रोडवरील नागप्पा एकनाथ कस्तुरे (१२ लाख १२ हजार १००), बसवेश्वर नगरातील शिवशंकर बसवेश्वर अक्कलवाडे- इंडियन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड (२० लाख ८० हजार ८४), सोरेगाव येथील दिशा रियालिटी अँड मल्टी कॉम राहुल बासुतकर (२१ लाख १५ हजार ६१०) यांच्यासह आदींचा समावेश आहे.

### १० हजार थकबाकी मिळकतदारांची प्रकरणे पुन्हा लोकअदालतीत

महापालिका प्रशासनाच्या वतीने शहर हद्दवाढ भागातील थकबाकी मिळकतदारांची आणखी एक यादी तयार करण्यात आली असून या यादीतील तब्बल १०० कोटी रुपयांची थकीत असलेल्या १० हजार थकबाकी मिळकतदारांची प्रकरणे दि. १३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या लोकअदालतीत ठेवण्यात येणार आहेत. यामध्ये थकबाकी मिळकतदारांना एकाच वेळी मिळकत कर भरताना दंड आणि शास्तीमध्ये ५० टक्के सूट देण्यात येणार असल्याची माहिती विभागाकडून देण्यात आली.

### मागील १७ थकबाकीदाराच्या मिळकतींची ई-लिलाव प्रक्रिया

दि. २८ जुलै २०२५ रोजी १७ मोठ्या थकबाकीदारांना त्यांच्या मालमत्ता विक्रीबाबत जाहीर नोटीस देण्यात आली होती त्याची मुदत संपली असून आता त्यांच्या एक कोटी दहा लाखाच्या थकबाकी वसुलीसाठी पुढील दोन दिवसात ई लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.



## दारुच्या नशेत गळफास लावून आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

शहरातील एमआयडीसी परिसरातील ताई चौक परिसरातील रविंद्र नगरात राहणारे संजय महादेव अलकुंटे (वय ४१) यांनी अज्ञात कारणातून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार बुधवारी दुपारी ४.४५ वाजता उघडकीस आला.

संजय हे बुधवारी दुपारी ४.४५ च्या सुमारास त्यांच्या रविंद्र नगरातील राहत्या घरी होते. त्यावेळी त्यांनी अज्ञात कारणातून दारुच्या नशेत राहत्या घराच्या लोखंडी अँगलला ओढणीने गळफास घेण्याचा प्रयत्न केला. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी त्यांना गळफासातून सोडविले. त्यानंतर सतिश दांगडे याने सायंकाळी ५.१५ च्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# व्यापाऱ्यांनी सवलतीच्या दरात सेवा द्यावी

### आ. सुभाष देशमुख यांचे आवाहन

### पर्यटन विकास कार्यशाळेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

चिंचणी गावाच्या पर्यटन विकासाचा यशस्वी अनुभव सांगत आई योजना अंतर्गत महिलांना व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याची ग्वाही आमदार सुभाष देशमुख यांनी दिली. तर त्यांनी जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्याचे आवाहन केले. कुडल येथील ८०० वर्षांपूर्वीच्या शिलालेखासारख्या ठिकाणांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच पर्यटन सप्ताहात व्यापाऱ्यांनी सवलतीच्या दरात सेवा देण्याचे आवाहन आ. देशमुख यांनी केली.

सोलापूर उपक्रमांतर्गत आयोजित पर्यटन विकास कार्यशाळेचे



उद्घाटन आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या कार्यशाळेत जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले, पुणे विभागाचे पर्यटन समन्वयक अधिकारी सूर्यकांत भुजबळ, पर्यटन उपसंचालक कुंभार, पर्यटन प्रकल्प अधिकारी मयूर नांगरे, सहाय्यक पर्यटन अधिकारी गुणवंत पवार, जिल्हा उपनिबंधक सहाय्यक आबासाहेब गावडे, पर्यटन विभाग महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त कृषी पर्यटन केंद्र संचालक समिती अध्यक्ष लहू अवताडे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वरखडे उपस्थित होते. पर्यटन समन्वयक भुजबळ यांनी प्रास्ताविक केले. यात २७ सप्टेंबर २०२५ रोजी जागतिक पर्यटन दिवस साजरा करण्याच्या अनुषंगाने २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान पर्यटन सप्ताह साजरा केला जाणार असल्याची माहिती दिली. या सप्ताहात सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळांना भेटी देण्यात येणार असून, पर्यटन दिंडीचे आयोजनही करण्यात येणार आहे. कृषी पर्यटन केंद्रांमुळे ग्रामपंचायतींना आर्थिक लाभ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. सोलापूर जिल्ह्यासह धाराशिव जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# शहरातून तीन दुचाकींची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

शहर परिसरातून चोरट्यांनी तीन दुचाकी चोरून नेल्या. मोहसीन नजीरअहमद शेख (वय ३७, रा. अकबर अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ बीएच ७३९३ क्रमांकाची दुचाकी ही ३१ जुलै रोजी रात्री बाराच्या सुमारास घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरून नेल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार कांबळे पुढील तपास करीत आहेत.

पवन रविंद्र गेंट्याल (वय ४२, रा. नॉर्थ सदर बझार, संत तुकाराम चौक, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ सीजी ३७३२ क्रमांकाची दुचाकी ही ३१ जुलै रोजी घरासमोर हॅन्डल



लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत. प्रकाश नरसप्पा गेंट्याल (वय ६८, रा. नॉर्थ सदर बझार, संत तुकाराम चौक, सोलापूर) यांनी त्यांची केए ०५ जेएक्स ४९८७ क्रमांकाची दुचाकी ही ३१ जुलै रोजी रात्री घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मुलानी पुढील तपास करीत आहेत.



## जिल्हा सरकारी वकिल प्रदिपसिंग राजपूत यांना पदवी मिळाल्याबद्दल सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा सरकारी वकिल प्रदिपसिंग राजपूत यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्याकडून घटस्फोटाचे म्हणजेच विवाह विच्छेदनाचे होणारे परिणाम या विषयावर सखोल संशोधनासाठी विद्यावाचस्पति डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही पदवी मिळाल्याबद्दल छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संदीप चेळेकर, पवन आलुरे, सँम विराजदार, राहुल दहीहंडे, सौदागर क्षीरसागर, वीरेश कलशेट्टी, सूरज काळे उपस्थित होते.

## छत्रपती भोसले राजे प्रतिष्ठानतर्फे आज मार्कंडेय रथोत्सवनिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

छत्रपती भोसले राजे प्रतिष्ठानतर्फे पद्मशाली समाजाचे कुलदैवत मार्कंडेय महामुनी रथोत्सवात सहभागी होणाऱ्या मंडळांचा सन्मान व प्रतिमा वाटप कार्यक्रम शनिवार दि. ९ ऑगस्ट रोजी होणार आहे, अशी माहिती प्रतिष्ठान संस्थापक लक्ष्मण भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा कार्यक्रम शनिवार दि. ९ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता पद्मशाली चौक येथे प्रतिष्ठानचे संस्थापक लक्ष्मण भोसले, कार्याध्यक्षा वंदना भिसे, सल्लागार जे.एम. शिकलगार यांच्या नेतृत्वाखाली तसेच छत्रपती शिवाजी महाराज मुस्लिम ब्रिगेडचे अध्यक्ष मतीन बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. हा कार्यक्रम पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली व महेश साठे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, आमदार विजयकुमार देशमुख, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील त्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या विविध क्षेत्रातील मान्यवर व पदाधिकाऱ्यांचा सत्कार तसेच शांतता व सुव्यवस्था व सर्वधर्म समभाव राखण्याकामी चांगली कामगिरी बजावणारे जेल रोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस रिझवान शेख, मुस्ताक लालकोट, आनंद बिरू, वंदना भिसे, चंद्रकांत पवार आदी उपस्थित होते.

## पोलिसांनी तक्रार न घेतल्याने तरुणीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

कौटुंबिक कारणातून झालेल्या वादाची पोलिसांनी तक्रार दाखल करून न घेतल्याने तरुणीचे गोचीड मारण्याचे औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार शुक्रवारी सकाळी दहा वाजता मोहोळ तालुक्यातील पाटकूल येथे घडला. पूजा रंगनाथ जाधव (वय २१, रा. पाटकूल ता. मोहोळ) असे तरुणीचे नाव आहे. पूजा हिच्या पाटकूल येथील घरी कौटुंबिक कारणातून वाद झाला होता. त्याबाबतची तक्रार देण्यासाठी तिने मोहोळ पोलीस ठाणे गाठले होते. परंतु तेथील पोलिसांनी तिची तक्रार नोंदवून घेतली नाही. यानंतर तिने गोचीड मारण्याचे औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. यात तिला त्रास होऊ लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून दुपारी १.१० वाजता वडील उत्तम माने यांनी दाखल केले. पूजा हि शुध्दीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# बँकेच्या अधिवेशनात ४०० सभासदांचा सहभाग

### युनायटेड वेस्टर्न, आयडीबीआय बँक सेवानिवृत्त कर्मचारी अधिवेशन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

युनायटेड वेस्टर्न बँक व आयडीबीआय बँक सेवा निवृत्त कर्मचारी संघटनेचे २८ वे वार्षिक अधिवेशन जुळे सोलापूर येथे ४०० सदस्यांच्या सहभागाने उत्साहात पार पडले.

अधिवेशनाचे उद्घाटन पंचांगकर्ते मोहन दाते व भारतीय मजदूर संघाचे केन्द्रीय सहप्रभारी विराज टिकेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष अनंत कुलकर्णी, जनरल सेक्रेटरी सुधाकर चौधरी, मोकाशी, वरीष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष रवी रमत्रा, जनरल सेक्रेटरी सुधाकर चौधरी, गुरुराज देशपांडे, चंद्रशेखर धर्माधिकारी,




सुर्यकांत वझे, जनरल सेक्रेटरी सुधाकर चौधरी, उपाध्यक्ष राजेन्द्र अष्टेकर, ऑफीस सेक्रेटरी चंद्रकांत सोमण, ट्रेझरर अशोक कुलकर्णी, जयंत कुलकर्णी, जॉईन्ट जनरल सेक्रेटरी नरेश बिंदू, अरूण परांजपे, रिजनल सेक्रेटरी दत्तराज कुलकर्णी उपस्थित होते. जनरल सेक्रेटरी सुधाकर चौधरी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन संस्थेचे सभासद चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी केले. आभार गुरुराज देशपांडे यांनी मानले. मागील वर्षात निधन पावलेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहून दुसरे सत्र सुरू झाले. ७५ वर्षे पूर्ण झालेल्यांचा सत्कार शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व चांदीचे स्मृती चिन्ह व सन्मानपत्र देऊन केला. सुर्यकांत वझे यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. जनरल सेक्रेटरी श्री चौधरी, उपाध्यक्ष श्री. अष्टेकर, ऑफीस सेक्रेटरी सोमण, ट्रेझरर अशोक कुलकर्णी, जयंत कुलकर्णी यांनी अहवाल वाचन ऑडिटेड बॅलन्स शीट, ऑडिटर नेमणुक ठराव, पुढील वर्षाचे बजेट आदी ठराव मांडले. ते एकमताने संमत झाले. नवीन कार्यकारिणी घोषीत झाली. द्वीतीय सत्राचे सुत्रसंचालन नरेश बिंदू यांनी केले. अरूण परांजपे यांनी श्रमगीत गायन केले.

## महिलेला मारहाण करणाऱ्यांविरूद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

महिलेस फरशीने मारहाण करून जखमी करणाऱ्या दोघांविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रेश्मा इस्माईल शेख (वय ४०, रा. विजयालक्ष्मी नगर, मजरेवाडी रोड, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून युसूफ सय्यद, जैबुन सय्यद (रा. विजयालक्ष्मी नगर, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. रेश्मा शेख या घरासमोर थांबल्या असताना युसूफ सय्यद व जैबुन सय्यद हे दोघे तिथे आले. त्यांनी रेश्मा यांना तुझा मुलगा अल्लाउद्दीन हा माझ्या पत्नीकडे का बघतो असे म्हणून म ारहाण केली. भांडण सोडवणाऱ्या रेश्मा यांना फरशीने डोक्यास म ारहाण केली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.



## 'सिंहगड'मध्ये 'कॉर्पोरेट करिअर रेडिनेस' प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रशिक्षण व रोजगार मार्गदर्शन कक्षाच्या वतीने आयोजित 'कॉर्पोरेट करिअर रेडिनेस-तीन दिवसीय इंटर्नशिप प्रशिक्षण कार्यक्रम' उत्साही प्रतिसादात पार पडला.

५ ते ७ ऑगस्ट दरम्यान विश्वेश्वरय्या हॉल येथे झालेल्या या प्रशिक्षणात महाविद्यालयाच्या सर्व शाखांतील ३०० हून अधिक द्वितीय वर्ष बी.टेक. विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. यात सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. विकास मराठे, प्रथम वर्षाचे विभाग प्रमुख के. एस. पाटील यांच्या उपस्थितीत झाले. समन्वयक म्हणून प्रा. शशिकांत हिप्परगी यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. अर्शद सय्यद (आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट ट्रेनर) यांनी तीन दिवस विद्यार्थ्यांना उद्योगजगतातील वास्तव, करिअर नियोजन, संवाद कौशल्य, आत्मविश्वास वृद्धी, सादरीकरण कौशल्य, आणि नोकरीसाठी आवश्यक व्यक्तिमत्व विकास यावर प्रभावी सत्रे घेतली. शिबिर कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### परिट समाजाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी राजू ननवरे यांची निवड

**टेंभुर्णी, दि.८ ऑगस्ट-**

येथील जयप्रकाश उर्फ राजु ननवरे यांची महाराष्ट्र परीट धोबी सेवा मंडळाच्या वरिष्ठ प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी प्रदेशाध्यक्ष राजेंद्र खैरनार, माजी प्रदेशाध्यक्ष एकनाथ बोरसे, कार्याध्यक्ष सनतजी वाढई, महासचिव सुनिलजी फंड, महीला प्रदेशाध्यक्ष रेखाताई कदम, युवक प्रदेशाध्यक्ष श्रीरंग मोरे, लॉन्ड्री प्रदेशाध्यक्ष गोविंदजी राऊत तसेच सोलापूर व महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीतील सर्व जेष्ठ नेते उपस्थित होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष खंडेराव काढलख यांचा हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी बोलताना एक सामान्य कार्यकर्ता म्हणून तसेच समाज आणि संघटना माझ्यापेक्षा मोठी आहे. या भावनेने, समाजातील समाज बांधव केंद्रस्थानी ठेवून, समाज उन्नतीसाठी अहोरात्र काम करणार आहे. समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी मी कटीबद्ध असल्याचे राजू ननावरे यांनी सांगितले. त्यांचा निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.





### स्वेरीच्या प्रा. सचिन खोमणे यांना पीएच.डी.

**पंढरपूर, दि.८ ऑगस्ट-**

येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातील प्रा. सचिन खोमणे यांना भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे मधून अभियांत्रिकीमधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागात 'डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ मायक्रोचॅनेल फॉर सॉईल टेस्टिंग इन लॅब ऑन चिप अँप्लिकेशन' या विषयात पीएच.डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी आपला शोध निबंध भारती विद्यापीठामध्ये सादर केला होता. भारती विद्यापीठ, पुणे मधील डॉ. प्रदीप व्ही. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या प्रेरणेने प्रा. सचिन खोमणे यांनी पीएच.डी. पूर्ण केली. प्रा. सचिन खोमणे यांनी मायक्रोफ्ल्युडिक्स या क्षेत्रात महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे. ज्यामध्ये मातीतील पोषणतत्व शोधण्यावर भर दिला आहे. संस्थेचे नूतन सचिव प्रा. सुरज रोंगे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, डिप्लोमाचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, सोलापूर विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञानचे अधिष्ठाता डॉ. पी.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, प्रा. सचिन गवळी, डॉ. करण पाटील उपस्थित होते. दरम्यान संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव प्रा. सुरज रोंगे, पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी डॉ. सचिन खोमणे यांचे अभिनंदन केले आहे.



### निंबाळकर अध्यापक विद्यालयाचा प्रथम व द्वितीय वर्षाचा निकाल जाहीर

**बार्शी दि. ६ ऑगस्ट-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी या अध्यापक विद्यालयाचा प्रथम व द्वितीय वर्षाचा जून २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये प्रथम वर्षाचा ७२ टक्के तर द्वितीय वर्षाचा ८५ टक्के निकाल लागला आहे. यामध्ये प्रथम वर्षातील कु. अनंतकवळस रूपाली हिला ८८.४० टक्के गुण मिळाले व अध्यापक विद्यालय प्रथम क्रमांक आला.कु. कलाश्री पवार हिला ८७.४० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला तर कु. श्वेता इंगोले हिने ८७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. तर द्वितीय वर्षातील राजनंदिनी गाडेकर हिने ८९.६० टक्के गुण मिळवून अध्यापक विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला तर प्रियंका मिरगणे हिने ८७.९० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला तर वैष्णवी मुके हिने ८७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. या सर्व विद्यार्थ्यांचे अध्यापक विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले व त्यांचा सन्मान करण्यात आला. अध्यापक विद्यालयात विद्यार्थ्यांना सातत्याने यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. TET, CTET, तसेच TIT यासारख्या स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन देखील अध्यापक विद्यालयात दिले जाते. त्यामुळे विद्यार्थी यशस्वी होतात. त्यांच्या या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे तसेच सहसचिव अरुण देबडवार, शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाच्या शालेय समितीचे चेअरमन डॉ. गुलाबराव पाटील, प्राचार्य डॉ. डी.पी. गुंड यांनी अभिनंदन केले.

### माहिती अधिकार महासंघ तालुकाध्यक्षपदी श्रीकांत पाटील

**अक्कलकोट, दि. ८ ऑगस्ट-**

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या अक्कलकोट तालुकाध्यक्षपदी श्रीकांत पाटील यांची निवड करण्यात आली. सदर नियुक्ती तीन वर्षाकरिता राहील. माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे राज्य अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी नियुक्तीपत्र दिले .श्री पाटील हे सामाजिक राजकीय क्षेत्रात काम करत आहेत. जिल्हा अध्यक्ष योगेश सुळे, शहराध्यक्ष श्रीकांत कोळी, महिला जिल्हाध्यक्ष वैशाली हावनूर, जिल्हा उपप्रमुख स्वामीनाथ हेगडे, शहर संपर्कप्रमुख माने गोसावी, शहर संघटक भीमाशंकर पटणे, शहर महिला आघाडी संघटक लक्ष्मी यादव यांनी निवडीबद्दल श्री. पाटील यांचे अभिनंदन केले आहे.



# पंढरपुरात केंद्राच्या नक्शा प्रकल्पाची अंमलबजावणी

## ड्रोन सर्व्हेक्षणाद्वारे मिळकतींचे नकाशीकरण

## अप्पर जमाबंदी आयुक्त खिलारी यांचे नागरिकांना सहकार्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ ऑगस्ट -**

केंद्र शासनाच्या 'नक्शा' प्रकल्पांतर्गत पंढरपूर नगरपरिषद हद्दीत ड्रोनद्वारे सर्वेक्षण सुरू असून प्रत्येक मिळकतीचे नकाशीकरण व माहिती संकलनाचे काम प्रगतीपथावर आहे. नागरिकांनी स्वतःच्या जमिनीचे सातबारा उतारे, खरेदीखत व मिळकत पत्रिका आदी दस्तऐवज सादर करून सहकार्य करावे, असे आवाहन अप्पर जमाबंदी आयुक्त तथा भूमि अभिलेख अतिरिक्त संचालक ज्ञानेश्वर खिलारी यांनी केले आहे.

केंद्र शासनाच्या नक्शा प्रकल्पांतर्गत पंढरपूर नगरपरिषद हद्दीतील मिळकतींची नगर भूमापन मोजणी अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे करून मिळकत पत्रिकेच्या स्वरूपात अधिकार अभिलेख तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले असून, नक्शा प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या कामाचा आढावा अप्पर जमाबंदी आयुक्त तथा भूमि अभिलेख अतिरिक्त संचालक, ज्ञानेश्वर खिलारी यांनी घेतला. यावेळी भूमी अभिलेख उपअधीक्षक पुजा आवताडे, परिक्षण भुमापक नवनाथ राऊत, सायबर स्विफ्ट इन्फोटेक कंपनीचे ऋषीकेश देशमुख, भूमी अभिलेख विभागाचे अक्षय यादव उपस्थित होते. पंढरपूर नगरपरिषद व भूमी अभिलेख विभाग संयुक्तपणे प्रकल्पाची अंमलबजावणी करीत असून, नागरिकांच्या सहकार्यामुळेच ही प्रक्रिया यशस्वी होणार आहे , असेही भूमि अभिलेख अतिरिक्त संचालक, ज्ञानेश्वर खिलारी यांनी यावेळी सांगितले.



या प्रकल्पामुळे भूमालकीबाबतची स्पष्टता वाढेल, भूविकास प्रक्रियेत पारदर्शकता येईल आणि अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवता येईल. तसेच कर आकारणी अधिक अचूक होईल, मालमत्ता व्यवहार सुलभ होतील आणि शहरी नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

'नक्शा' प्रकल्प केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भू-संसाधन विभागामार्फत देशभरातील १५२ शहरांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येत आहे. महाराष्ट्रातील १० नगरपालिकांमध्ये या उपक्रमाची अंमलबजावणी सुरू असून, त्यामध्ये पंढरपूरचा समावेश आहे. पंढरपूर शहरातील मिळकतीचे ड्रोन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हवाई सर्वेक्षण करून अचूक नकाशे तयार केले जात आहेत. त्यानंतर प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन मिळकतींची पडताळणी करण्यात येणार आहे.

**- ज्ञानेश्वर खिलारी, अतिरिक्त संचालक, भूमि अभिलेख.**

# तालुक्यातील दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.८ ऑगस्ट-**

तालुक्यात दोन अल्पवयीन मुलींच्या अपहरणाच्या घटनांनी खळबळ उडवली आहे. दोन गावांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांनी आपल्या मुलींना अज्ञात व्यक्तींनी फूस लावून पळवून नेल्याची तक्रार स्थानिक पोलिस ठाण्यात नोंदवली आहे. पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करुन तपास सुरु केला आहे.

पहिली घटना- तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या ४४ वर्षीय शेतकऱ्याने ५ ऑगस्ट रोजी तक्रार नोंदवली की, त्यांची १७ वर्षीय मुलगी २ ऑगस्टच्या रात्री ते ३ ऑगस्टच्या रात्री दरम्यान बेपत्ता झाली. बारावीचे शिक्षण पूर्ण केलेली ही मुलगी घरीच होती आणि नेहमीप्रमाणे तिच्या आजीसोबत झोपली होती. रात्रीच्या सुमारास आजीला जाग आल्यानंतर मुलगी खोलीत आढळली नाही. कुटुंबीयांनी परिसरात आणि नातेवाइकांकडे शोध घेतला, परंतु मुलगी मिळाली नाही. तक्रारीत अज्ञात व्यक्तीने मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला आहे.

**दुसरी घटना: तालुक्यातील १५ वर्षीय मुलीचे अपहरण**

मोहोळ तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या ३५ वर्षीय मजूर महिलेने ६ ऑगस्ट रोजी तक्रार नोंदवली की, त्यांची १५ वर्षीय मुलगी ४ ऑगस्ट रोजी सकाळी बेपत्ता आहे. ही मुलगी गेल्या अनेक वर्षांपासून बार्शी तालुक्यातील दुसऱ्या गावात आजीकडे राहत होती. ४ ऑगस्ट रोजी दुपारी तक्रारदाराच्या आईने फोनवर मुलगी घरी नसल्याचे सांगितले. मुलीचा फोन बंद असल्याने संपर्क होऊ शकला नाही. कुटुंबीयांनी अनेक गावांमध्ये, तसेच वैरागच्या बसस्थानक आणि बाजारपेठेत शोध घेतला, परंतु मुलगी मिळाली नाही. तक्रारीत अज्ञात व्यक्तीवर अपहरणाचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपासाला सुरुवात केली आहे.

या घटनांनी स्थानिक समाजात चिंता निर्माण झाली आहे. वैराग पोलिसांनी दोन्ही प्रकरणांमध्ये तातडीने तपास सुरु केला असून, अज्ञात व्यक्तींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके स्थापन केली आहेत.



# पोलीस बांधवांना राख्या बांधत रक्षाबंधन साजरे

**सांगोला,दि.८ ऑगस्ट -**

रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून सांगोल्यातील फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्यु.कॉलेज मधील मुलींनी सामाजिक बांधिलकी जपत सांगोला शहर पोलीस ठाण्यात जाऊन चेकपोस्टवर असणा-या पोलीस बांधवांना राखी बांधत अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन सण साजरा केला.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने बहिण भागाकडे जाऊन भावाला राखी बांधून आपले रक्षणासाठी साकडे घालत असते. मात्र, कायदा सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या पोलीस बांधवाना रक्षाबंधन दिवशी देखील आपल्या बहिणीला वेळ देता येत नाही. यासाठी सांगोला शहराच्या नजीक असलेल्या फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्यु.कॉलेज मधील मुलीनी सांगोला पोलीस ठाण्यात जाऊन कर्तृत्वावर असलेल्या पोलीस बांधवांना राखी बांधत रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात साजरा केला. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक पवन मोरे, विनायक माहुरकर, श्रीकांत जाधव, पोपट काशिद, सहा.फौजदार मोहन भुजबळ, अनिल बनसोडे, पोलीस अंमलदार रुपेश खटकाळे, कैलास खटकाळे, राजु आवटे, बबलू पाटील, गणेश कुलकर्णी यांना राख्या बांधल्या. हा कार्यक्रम फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा.प्राजक्ता रूपनर, स्कूलच्या सीईओ सारीका रूपनर, प्राचार्य सिकंदर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

# देशसेवेतील सैनिकांना राखीची मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि . ८ ऑगस्ट-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील शहीद निवृत्ती जाधव प्रतिष्ठानच्या माध्यमातून सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांना राखी पोर्णिमेचे औचित्य साधून पोष्ट ऑफिस मधून राख्या पाठविणेत आल्या. गेल्या १५ वर्षा पासून प्रतिष्ठानचा हा उपक्रम चालू आहे.

लष्कराच्या माध्यमातून देशांच्या सीमावर आपल्या प्राणांची बाजी लावून कुटुंबापासून दूर राहून जवान सदैव सेवा देत आहेत . विविधतेने नटलेल्या या भारत देशात अनेक महत्वाचे सण , उत्सव साजरे होतात . परंतू सैनिकांना हे आनंदोत्स साजरा करता येत नाहीत . अशा कर्तव्य कठोर सैनिक, सामाजीक शांतता प्रस्थापित करणारे पोलिस , आरोग्य सेवक डॉक्टर यांचे प्रति स्नेह भावनेतून प्रतिष्ठानचा हा उपक्रम म्हणूनच महत्वाचा व अनुकरणीय आहे . यासाठी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुरेखा जाधव, उपाध्यक्षा सविता नाईकनवरे, सचिव सारिका नाईकनवरे, सदस्य विजया नाईकनवरे, कांचन देवडकर, सारिका मोहिते, रंजना अडसूळ, मनीषा खिलारे, सुप्रिया खांडेकर, निकिता राऊत, शितल माने, निर्मला बुद्धिबळे, रूपाली वाघ, जयश्री बुद्धिबळे या महिला भगिनींनी राख्या एकत्रित करून श्रीपूर पोस्टा मधून नवी दिल्ली, गडचिरोली, हरियाना, लेहलडाख, तळेगाव पुणे, भोपाळ, मद्रास, पोलीस स्टेशन या ठिकाणी राख्या पाठविल्या.



राख्या बरोबरच एक शुभेच्छा संदेश पाठवून रक्षाबंधन उत्सवाच्या शुभेच्छा देवून बहिण-भावाचे नाते अधिक घट्ट करण्याच्या निर्धार व्यक्त केला . याप्रसंगी श्रीपूर पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर लक्ष्मण फड, असि.पोस्टमास्तर अश्विनी शेटे, पोस्टमन शितल मिसाळ, यांनी उपकमांचे कौतुक करत आपल्या भावना व राख्या वेळेत पोहोचतील असे सांगितले .

# पिलीव परीसरात पावसामुळे पिकांना जिवदान

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि ८ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरात गुरुवारी रात्री व शुक्रवारी सकाळी आश्लेषा नक्षत्रातील पावसाने जोरदार हजेरी लावली. यामुळे बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी, शिंगोर्णी व पिलीव भागातील पिकांना विशेषतः मका,बाजरी ,ऊस व इतर पिकांना दिलासा मिळाला आहे.

गेल्या दीड महीन्यापासुन पावसाने चांगलीच ओढ दिली होती. यामुळे बळीराजा चांगलाच संकटात सापडला होता. हातातोंडाला आलेला घास हिसकावून घेतला जातोय की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. पण अखेर वरुणराजाने हजेरी लावल्यामुळे बळीराजा सुखावला असुन यंदाच्या हंगामातील बाजरी ,मका व इतर पिके आता हाती लागतील असे चित्र सध्या पिलीव परीसरात आहे. कधी नव्हे ते यंदा वरुणराजाने मे महीन्यातच जोरदार हजेरी लावली होती यामुळे पिक पाणी जोमदार आहेत.पण जुन पासून वरुणराजाने चांगलीच ओढ दिल्यामुळे बळीराजा चांगलाच चिंतेत होता .पण सध्या गणपती - गौरी यामध्ये समाधानकारक पाऊस होईल असा अंदाज वर्तवला जात आहे. पिलीव परीसरात अजुनही जोरदार पावसाची अपेक्षा आहे.

# लोकसेवा विद्यामंदिरची श्रावण सोमवारनिमित्त मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगष्ट ..**

दुसर्या श्रावण सोमवार निमित्त लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने काढण्यात आलेल्या ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवाच्या भक्ती दिंडीमध्ये विविध कलागुण प्रदर्शनाने व मल्लिकार्जुन महाराज की जयजयकाराने दुमदुमून गेली.

सालाबादाप्रमाणे श्रावणाच्या दुसऱ्या सोमवारी गावातून श्री मल्लिकार्जून देवाच्या पालखीचे प्रशालेच्या वतीने मिरवणूक निघते. त्यामुळे यावर्षीही या मिरवणुकीमध्ये शिवप्रतिमेची रांगोळी,



शंकर, पार्वती, गणपती, नंदी, अहिल्यादेवी होळकर आदींच्या रुपाने सजलेली मुले, दिंडी ,महाकाल अघोरी शिव तांडव नृत्य, भरतनाट्यम्, फुगडी,ढोल, झांज, टिपरी नृत्य, बहारदार लेझीम, वीरभद्र पुरवंत, कुंभमेळा, नंदीध्वज तसेच शासनाच्या उपक्रमांतर्गत 'एक पेड मॉ के नाम' वृक्षदिंडी, साक्षरता घोषवाक्याद्वारे प्रचार प्रसार, पारंपारिक टाळ, सनई, हलगी, संबळ वाद्य आणि शालेय बँड पथक तथा छउउ टिम आदी सर्वांगीण घटकांच्या माध्यमातून भक्तिमय वातावरणात हुतात्मा चौकापासून महात्मा बसवेश्वर चौकापर्यंत मिरवणूक काढण्यात आली . यात लोकांचे आकर्षण ठरले ते लहान मुलांनी अतिशय सुंदरतेने केलेले महाकाल शिवतांडव अघोरी नृत्य. यावेळी माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे, सहसचिव अप्पासाहेब म्हेत्रे, नागनाथ म्हेत्रे, माजी केंद्रप्रमुख शंकर म्हेत्रे, वाघेश म्हेत्रे, राजकुमार कुंभार, वेदमूर्ती करबसय्या स्वामी, प्राचार्य बसवराज कुमठेकर, पर्यवेक्षक मदगोंडा मलकारी, माजी ग्रा. पं. सदस्य बसप्पा घाटे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दयानंद घाटे आदी उपस्थित होते.




# यशकल्याणी जीवन गौरव पुरस्काराने डॉ. कुंभार सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.७ ऑगस्ट-**

ज्येष्ठ पक्षी व पर्यावरण अभ्यासक प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार यांना पुणे येथील यशकल्याणी सेवाभावी संस्थेतर्फे पुण्यातील ख्यातनाम भूलतज्ज्ञ, संशोधिका व माजी मिस युनिव्हर्स प्रचिती पुंडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या वेळी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, स्त्रीरोग तज्ञ डॉ. वसंतराव पुंडे, गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे, उपस्थित होते. पुरस्काराचे हे सहावे वर्ष असून स्मृतीचिन्ह, मानपत्र व शाल असे पारितोषिकेचे स्वरूप होते.

डॉ. कुंभार यांनी गेल्या तीन दशकांपासून पक्षी निरीक्षण, पर्यावरण अभ्यासातून निसर्ग संवर्धनाचे काम करतात. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, शोधप्रबंधाचे प्रकाशन, पक्ष्यांची दुनिया या पुस्तकांबरोबर अन्य पुस्तकांचे प्रकाशन, पक्षी व पर्यावरण विषयक उद्बोधन, वृक्ष लागवड, बुलेटवरून महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, केरळ, तमिळनाडू राज्यांतील पक्षी धाम व गडकिल्ल्यांवरील भ्रमंती, रस्त्यावर वाहनांच्या धडकेने किंवा अन्य कारणाने अपघातग्रस्त पक्षी व वन्यजीवांवर उपचार करून जीवदान देणे इत्यादी बहुआयामी व्यक्तिमत्त्वामुळे सदर पुरस्काराने सन्मानित केल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष गणेशभाऊ करे-पाटील यांनी माध्यमांना दिली.

# होम मिनिस्टर स्पर्धेत तृतीयपंथी पल्लवी जाधव विजेती

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ ऑगस्ट-**

शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित 'होम मिनिस्टर' कार्यक्रमात तृतीयपंथी पल्लवी जाधव हिने दुसरा क्रमांक पटकावत विजय मिळवला. तिला वॉशिंग मशीन भेट म्हणून देण्यात आली. सामाजिक समावेशन आणि लैंगिक समानतेच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

पल्लवीने विविध प्रश्नांची उत्तरे देणे, कोडी सोडवले. 'पल्लवी, तू चल पुढे, मी आहे,' या प्रेरणादायी वाक्याला बळ दिले. तृतीयपंथी समुदायातील पल्लवीच्या या यशाने एक नवा आदर्श निर्माण केला आहे. शशिकांत शिंदे युवा मंच आणि इनरव्हील क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. तृतीयपंथीयांना स्पर्धेत सहभागीसाठी विकी खलसे आणि बाबा वाघमारे यांनी प्रयत्न केले. पल्लवी जाधवच्या या यशाने तृतीयपंथी समुदायाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नवे दार खुले केले आहे. आम्ही




यापुढेही अशा उपक्रमांद्वारे समावेश आणि समानतेचा संदेश पसरवत राहू, असे सचिन वायकुळे यांनी ठामपणे सांगितले. बार्शीच्या या ऐतिहासिक घटनेने तृतीयपंथी समुदायाच्या हक्कांसाठी आणि स्वीकारार्हतेसाठी एक नवा अध्याय सुरु केला आहे.

CMYK

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारतला शुभेच्छा देताना आनंद चंदनशिवे, राजेश जगताप, नेताजी खंडागळे, श्रीमंत जाधव.



दैनिक तरुण भारतचे मुद्रक-प्रकाशक दिलीप दुलंगे.



# ‘तरुण भारत’च्या वर्धापन दिनी मान्यवरांची उपस्थिती



वेणुगोपाल गाडी, नागेश सरगम, यशवंत पाथरुट, यश करजगी, अक्षय चिडगुंपी, प्रकाश डोंगरे, सुरेखा पाटील, सचिन गायकवाड, महेश रायखेलकर, प्रा. नरेंद्र काटीकर, अजित उंब्रजकर, मनोज जवळेकर



श्रीरंग बनसोडे, मिलिंद गोरे, अनिता माळगे, योगेश माळगे, श्री.माळगे, विश्व हिंदू परिषद टीम, पद्माकर कुलकर्णी, डॉ. श्रीकांत येळेगावकर, सुगतरत्न गायकवाड



विठ्ठल मोरे, अजय मस्के, श्री. कोंडा, सुनिल भालेराव

नंदकुमार येच्चे, चन्नवीर वीरभद्रेश्वरमठ, विक्रम खेलबुडे, जयप्रकाश अभंगे, हरीशचंद्र कदम, अप्पासाहेब गंचिनगोटे, राजकुमार माने.

प्रा. अरुण सोनकांबळे, प्राचार्य अरुण मित्रगोत्री, दत्ता भोसले



नर्मदा कनकी, ॲड. अथर्व अंदोरे, ॲड. अरविंद अंदोरे, ॲड. आल्हाद अंदोरे, रामदास काटकर, संजय जाधव, हेमा चिंचोळकर, ॲड. मंगला चिंचोळकर, अमीर शेख, अनिल चव्हाण, आरिफ शेख



प्रेम मोटे, विद्या लोळगे, सी.ए. बिराजदार, श्रुतिका पाटोळे, गीता पाटोळे, उमेश कदम, तेजस मुद्दे



संभाजी आरमार संघटनेचे श्रीकांत डांगे, शिवाजी वाघमोडे, शशीकांत शिंदे, मनिष काळे, सागर ढगे, राज जगताप,
अजिंक्य पाटील, प्रविण मोरे, तेजस चौधरी, राजू आखाडे, प्रदीप मोरे, सुधाकर करनकोट, अविनाश विटकर, रोहन तपासे.



संगीता जोगदनकर, सायरा शेख, हाजीमलंग नदाफ, एम. शफी, केतन शहा, योगिन गुजर, रमेशसिंग वाधवाणी, नागेश दंतकाळे, विजय भोईटे, संजय घोडके, प्रितम शिंदे



श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानाचे सदस्य शुभांगी लचके, अक्षता कासट, महेश कासट, श्रीरंग रेगोटी, मनुश्री कासट, कृष्णा लड्डा, अर्चना बंडगर, शिला तापडीया.



संभाजी ब्रिगेडचे संघटनेचे अध्यक्ष श्याम कदम, शिरीष जगदाळे, दिलीप निंबाळकर, शत्रुघ्न माने, संभाजी भोसले, मीनल दास, माधुरी चव्हाण, मनीषा कोळी.



धनराज पारेकर, सुनील काळे, मनोज देवकर, राम हुंडारे



अजमल शेख, अश्वजीत गायकवाड, पुष्पा गायकवाड

बाबा बाबरे, सिध्दांत बाबरे, अकबर शेख, जकीर शेख, संतोष काळे

साईराज मिरजी, वर्धराज मिरजी

शशिकांत कांबळे, सचिन अक्कलकोटे, महेश जाधव, अमर शिंदे.